## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११३०
निर्णय दिनांकः ०४-०५-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. दुधाटे मोहन शिवराज,<br>रा.अहमदपूर, जि.लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक,<br>राज्य उत्पादन शुल्क, लातूर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी,<br>राज्य उत्पादन शुल्क कार्यालय,लातूर | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क कार्यालय,लातूर.

जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, लातूर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०६.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना विहित मुदतीत प्राप्त झालेली नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दुष्ट हेतूने माहिती नाकारली असल्यामुळे, त्यांना माहिती देईपर्यंत प्रत्येक दिवसाला रु.२५०/- याप्रमाणे शास्ती लावावी व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, लातूर यांची खातेनिहाय चौकशी करण्यात यावी व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या विभागाविषयी काही माहिती एकूण तीन मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी सन २००७-०९ असा होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शहरी व ग्रामीण भागामध्ये बिअर शॉपी परवाना, बिअर बार परवाना व परमीट रुम परवाना मिळण्यासाठी शासनाच्या विहित केलेल्या अटी, जी.आर.सह व अर्जांच्या प्रतीसह, अहमदपूर तालुक्यातील बिअर शॉप परवाना, परमीट रुम परवाना यासाठी प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या, त्यापैकी परवानगी देण्यात आलेल्या अर्जांची संख्या व त्यांना परवानगी देताना घेण्यात आलेल्या अटी व तसेच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून कोणकोणत्या प्रकारचे परवाने दिले जातात - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.०७.२००९, ०३.१०.२००९ व २५.११.२००९ रोजी सुनावणी ठेवली असता, अपिलार्थी या सुनावणीस गैरहजर राहिले व यापूर्वीच दि. १०.०६.२००९ रोजी त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. ०६.०६.२००९ रोजी साध्या पोस्टाने पाठविली आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी त्यांनी अपिलार्थीस पाठविलेली माहिती आयोगास अवलोकनास्तव सादर केली.अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाबाबतचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीचा अर्ज दि. ०५.०५.२००९ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी एक महिन्यात ही माहिती अपिलार्थीस पुरविली आहे.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे अपरिपक्व असे द्वितीय अपील सादर केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम १९(६) मध्ये विहित केलेल्या मुदतीत सुनावणी न ठेवता, ती विलंबाने ठेवली आहे. तसेच अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज अधीक्षक,राज्य उत्पादन कार्यालयामध्ये दि. १३.०४.२००९ रोजी प्राप्त होऊनही तो संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षकाकडे दि. ०५.०५.२००९ रोजी प्राप्त झालेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेली कथित माहिती ही अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी साध्या टपालाने ही माहिती पुरविली. अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज प्राप्त झाल्यापासून फार तर एक ते दोन दिवसांच्या फरकाने हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे प्राप्त होणे सर्वसाधारण परिस्थितीत अभिप्रेत होते, तथापि या प्रकरणी मूळात अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाल्यापासून तो संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे

पोहोचण्यासाठी एकूण २१ दिवसांचा विलंब लागलेला आहे. हा विलंब, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या व कलम ७(१) च्या तरतुदीमधील कालमर्यादेचे गांभीर्य लक्षात घेता, निश्चितपणे संबंधित विभागास भूषणावह नाही. इतःपर त्यांनी अशाप्रकारचा विलंब टाळावा व माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत त्यांच्या कार्यालयात प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जास सर्वोच्च प्राधान्य देऊन अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती पुरविली जाईल, याकडे लक्ष द्यावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने रजिस्टर्ड पोस्टाद्वारे माहिती मागितली असताना, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस साध्या पोस्टाने माहिती पाठविली. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या अशाप्रकारच्या चुकीमुळे आता संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क कार्यालय,लातूर यांना असे सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी मागणी केलेली माहिती ही त्यांच्यापासून जन माहिती अधिकारी यांनी दुष्ट हेतूने दडविली असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची अपिलार्थीची विनंती आयोग मान्य करीत नाही. परंतु या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज हाताळताना झालेल्या विलंबाबाबत संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, लातूर यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येऊन इतःपर त्यांनी अशाप्रकारची पुनरावृत्ती टाळावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

३) संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, लातूर यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०४-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दुधाटे मोहन शिवराज,महात्मा फुले कॉलनी, अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११३१
निर्णय दिनांक: ०४-०५-२०१०

१. श्री. अशोक उत्तमराव कांबळे, : अपिलार्थी
रा.परभणी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, परभणी.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, परभणी.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, परभणी

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना वेळेत माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १७.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राथमिक आरोग्य केंद्र, पाथरगव्हाण, ता. पाथरी, जि. परभणी या इमारतीच्या पुनर्विद्युतीकरणाच्या संदर्भात काही माहिती व्यक्तिशः किंवा टपालाद्वारे अशी मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २१.०३.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. या प्रकाराने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. ०४.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे दि.२२.०४.२०१० रोजीचे आयोगाच्या कार्यालयात दि. २८.०४.२०१० रोजी पोस्टाद्वारे प्राप्त झालेले पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २२.०६.२००९ रोजी आवश्यक ती माहिती मिळाली असल्याचे व प्राप्त माहितीने त्यांचे समाधान झाले असल्याचे नमूद केले आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने आयोगाकडे त्यांनी सादर केलेला विचाराधीन अपील अर्ज निकाली काढण्याची आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने, त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झ ाल्याने, त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्याची केलेली विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ११३१/०९, दिनांक २२.०६.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०५-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक उत्तमराव कांबळे, लहुजीनगर,सुपर मार्केटरोड,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम),जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम),जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११३२
निर्णय दिनांकः ०४-०५-२०१०

१. श्री. मोहम्मद खमरुल इसलाम, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्राचार्य,
इंदिरा गांधी ऊर्दू डी.एड. कॉलेज, नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक,लातूर विभाग,लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३०.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या डी.एड. विद्यालयात सन २००५ ते २००९ या शैक्षणिक वर्षामध्ये आरक्षित जागेवर किती विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला, प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या १२ वीच्या गुणपत्रिका, जात प्रमाणपत्र, वैध प्रमाणपत्राच्या छायाप्रती आणि ज्या विद्यार्थ्यांना आरक्षित जागेवर प्रवेश देण्यात आला आहे, त्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत संस्थेने खात्री करुन घेतली आहे काय की यासंदर्भात संबंधित विद्यार्थ्यांनी दाखल केलेले जात प्रमाणपत्र बोगस नाही, याबाबत संपूर्ण माहिती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास प्राचार्य, इंदिरा गांधी ऊर्दू डी.एड महाविद्यालयाने त्यांच्याकडील दि. १५.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाकडून पैसे भरुन घेऊन जाण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे निश्चित किती शुल्क भरावयाचे हे या पत्राद्वारे कळविले नसल्यामुळे व हे पत्र दिशाभूल करणारे वाटल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०७.०३.२००९ रोजी शिक्षण उपसंचालक, लातूर यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर शिक्षण उपसंचालक, लातूर यांनी त्यांच्या दि.२१.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना कळवून अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविण्याच्या जन माहिती अधिकारी यांना सूचना दिल्या. शिक्षण उपसंचालक यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व शिक्षण उपसंचालक,लातूर यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या ऊर्दू डी.एड. महाविद्यालयाकडून माहिती मागितली आहे, ते महाविद्यालय, कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता असलेले आहे व या महाविद्यालयास शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अर्थसहाय्य होत नाही. तसेच सदरचे कॉलेज हे आयडीयल एज्युकेशन सोसायटी या संस्थेमार्फत चालविले जाते.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता असलेल्या इंदिरा गांधी ऊर्दू

डी.एड. महाविद्यालय या संस्थेकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन माहितीची मागणी केल्याचे दिसून येत आहे. तथापि या प्रकरणी निर्णय घेण्यापूर्वी, मा. उच्च न्यायालय,मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांच्याकडील रिट याचिका क्र.५१३२/२००८, नगर युवक शिक्षण संस्था आणि यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय, वनडोंगरी,नागपूर विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यासंदर्भात दि. २०.०८.२००९ रोजी दिलेला निर्णय प्रथमतः विचारात घेणे गरजेचे आहे असे आयोगास वाटते. या निर्णयाद्वारे मा. उच्च न्यायालयाने या संस्थांना शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नसल्याने आणि शासनाचे कोणत्याही स्वरुपाचे त्यांच्यावर प्रत्यक्ष नियंत्रण नसल्यामुळे अशाप्रकारच्या संस्थांना माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्याचा निर्णय देऊन राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ यांचे या संस्थेला माहिती देण्याचे दिलेले आदेश रद्दबातल ठरविले आहेत. या प्रकरणी देखील हाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे, विशेषतः अपिलार्थीने ज्या महाविद्यालयाकडे माहितीची मागणी केली आहे, ते महाविद्यालय कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता असलेले आणि शासनाकडून त्यांना प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे कोणतेही भरीव अर्थसहाय्य होत नसलेले असल्यामुळे विचाराधीन प्रकरणातील इंदिरा गांधी ऊर्दू डी.एड.महाविद्यालय, नांदेड या संस्थेला माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदी लागू करता येणार नाहीत.

या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०५-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोहम्मद खमरुल इसलाम,दै. तहेलका टाईम्स, चावलावाला कॉम्प्लेक्स,देगलूर नाका,नांदेड

२. प्राचार्य,इंदिरा गांधी ऊर्दू डी.एड. कॉलेज,टायर बोर्ड, नांदेड-४३१ ६०४ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,लातूर विभाग,गांधी चौक,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११३३
निर्णय दिनांकः ०४-०५-२०१०

१. श्री. संजय जवाहरलाल गुप्ता, : अपिलार्थी
रा.पिंपळगाव (रे.), ता.भोकरदन,जि.जालना

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामविकास अधिकारी,
पंचायत समिती, भोकरदन, जि.जालना
२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, भोकरदन, जि.जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक, ग्रामपंचायत,सिरसगाव (वा.),ता.भोकरदन,जि.जालना
जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती,भोकरदन,जि.जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १७.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन यांच्याकडे ग्रामपंचायत सिरसगाव, तालुका भोकरदन यांना संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मिळालेल्या ६ लक्ष रकमेच्या खर्चाबाबत बाबनिहाय

माहिती, एम.बी.ची झेरॉक्स, अंदाजपत्रक व खर्चाचा तपशील, मजूरांची हजेरीपत्रके व पगारपत्रकाच्या झेरॉक्स प्रती व नमुना नं.१५ व ५ च्या झेरॉक्स प्रती, ही माहिती सत्य माहितीच्या स्वरुपात मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती गट विकास अधिकारी यांच्या प्रत्यक्ष ताब्यात नसल्यामुळे ही माहिती ज्या ग्रामसेवकाच्या कार्यक्षेत्राशी संबंधित आहे, त्या सिरसगाव (वा.) ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाकडे, अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झ ााल्यानंतर त्या अर्जाची प्रत त्यांनी दि. २१.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पाठविली. तदनंतर ग्रामसेवकाने सदरची माहिती तयार करुन दि. २१.०२.२००९ रोजी गट विकास अधिकारी,पंचायत समिती,भोकरदन यांच्याकडे सादर केली. तथापि गट विकास अधिकारी, भोकरदन यांनी ग्रामसेवकाकडून प्राप्त झालेल्या या माहितीवर कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांच्याकडे दि.१६.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावरही कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत सिरसगाव (वा.) यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार करुन गट विकास अधिकारी यांच्याकडे दि. २१.०२.२००९ रोजी सादर केली होती. त्यांच्या या विधानापुष्टयर्थ त्यांनी सादर केलेली माहिती गट विकास अधिकारी कार्यालयास दि. २१.०२.२००९ रोजी प्राप्त झाल्याचा पुरावा आयोगास सादर केला.

विस्तार अधिकारी (पं.)तथा सध्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणाशी संबंधित सर्व कागदपत्रे पंचायत समिती कार्यालयातील कक्ष अधिकारी, श्री. आव्हाड यांच्या ताब्यात असून अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर गट विकास अधिकारी यांनी निर्णय का घेतला नाही, याची कारणे त्यांना आयोगास सांगता येणार नाहीत. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, संबंधित सर्व कागदपत्रे श्री. आव्हाड यांच्या ताब्यात आहेत. वारंवार मागणी करुनही ही कागदपत्रे त्यांनी हस्तांतरित न केल्यामुळे त्यांना ती उपलब्ध होऊ शकली नाहीत.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी संबंधित ग्रामसेवकाची धारणा की, अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज गट विकास अधिकारी यांच्याकडे केला असल्यामुळे, गट विकास अधिकाऱ्यानेच अर्जदारास माहिती देणे भाग आहे, पूर्णपणे चुकीची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीकरिता ग्रामपंचायत स्तरावरील ग्रामसेवक यांना जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले आहे. अपिलार्थीने जरी गैरसमजुतीने गट विकास अधिकाऱ्याकडे प्रथमतः अर्ज केला असला तरी त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर ५ दिवसांच्या आत कार्यवाही करुन अपिलार्थीचा मूळ अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवकाकडे पाठविला असला तरीही त्यांनी या पत्राची प्रत अपिलार्थीस दिल्याचे आढळून येत नाही. तसेच या पत्रामध्ये त्यांनी ग्रामसेवकाला अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार करुन परस्पर अपिलार्थीस पुरविण्याच्या सूचना देखील दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. एवढेच नव्हेतर ग्रामसेवकाकडून अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भातील माहिती दि.२१.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे गट विकास अधिकाऱ्याकडे प्राप्त झाल्यानंतरही त्यांनी ही माहिती अपिलार्थीस जशीच्या तशी देण्यासंदर्भात कोणतीही हालचाल केली नाही. त्याचबरोबर

यानंतर अपिलार्थीने दि. १६.०३.२००९ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी कोणताही निर्णय दिलेला नाही. या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, सिरसगाव (वा.),ता.भोकरदन, जि.जालना यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्याकरिता संबंधित गट विकास अधिकारी यांच्याकडे सादर केलेली माहिती ही, सकृतदर्शनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आढळून येत आहे. त्यामुळे ग्रामसेवकाकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर एकतर गट विकास अधिकाऱ्याने ही माहिती जशीच्या तशी अपिलार्थीकडे पाठवून द्यावयास हवी होती किंवा ग्रामसेवकास अपिलार्थीस परस्पर माहिती पुरविण्याचे सूचित करावयास हवे होते. तथापि यापैकी कोणतीही एक कृती संबंधित गट विकास अधिकारी,श्री. इंगळे यांनी न केल्यामुळे अपिलार्थी हे त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आणि अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न देऊन श्री. इंगळे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे, अशी आयोगाची पूर्ण खात्री झाली आहे. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना संबंधित गट विकास अधिकारी,पंचायत समिती,भोकरदन, श्री. इंगळे यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घेण्याचे, सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत, सिरसगाव (वा.) यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य व साक्षांकित स्वरुपात उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती, भोकरदन यांनी केलेल्या युक्तिवादावरुन अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी पंचायत समिती,भोकरदन कार्यालयातील कक्ष अधिकारी,श्री. आव्हाड हे देखील जबाबदार असल्याचे

आयोगास आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना देखील 'माहिती अधिकारी' समजावे, अशी तरतुद आहे. हे पाहता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना पंचायत समिती,भोकरदन कार्यालयातील कक्ष अधिकारी,श्री.आव्हाड यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती साक्षांकित स्वरुपात त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना संबंधित कक्ष अधिकारी,पंचायत समिती,भोकरदन यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०४-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय जवाहरलाल गुप्ता,रा.पिंपळगाव (रेणुकाई), ता.भोकरदन,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत,सिरसगाव (वा.),ता. भोकरदन,

जि.जालना  यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती, भोकरदन, जि.जालना  यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११२५

निर्णय दिनांक ०४-०५-२०१०

१ श्री. राहुल कुंडलिक पगारे, : अपिलार्थी
हु. मु. पो. जायकवाडी (उत्तर), ता. पैठण, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण, जि. औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिली नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणून ही माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी आणि अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून वंचित ठेवल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांना जास्तीत जास्त दंड आकारण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, नगर परिषदेतील सर्व विभागाशी संबंधित व्यापक व्याप्ती असलेली माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -

नगर परिषदेला सन २००० ते दि. ०६-०३-२००९ या कालावधीमध्ये वर्षनिहाय प्राप्त झालेला निधी व तो आजपर्यंत वापरलेल्या प्रयोजनाचे ठिकाण, विविध कामांची यादी, नगर परिषदेला या कालावधीत विविध करापोटी मिळालेली रक्कम करांच्या माहितीसह व ती वसूल झाल्यावर निधीचा विनियोग केलेल्या प्रयोजनाची माहिती, या कालावधीमध्ये सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची यादी, त्यांना गटविमाद्वारे दिलेल्या रकमेची यादी, प्रत्येकाचे नाव, शिल्लक राहिलेली रक्कम प्रत्येकांच्या नावासह, त्यांना देण्यात आलेली रक्कम चेकद्वारे दिल्याचे व त्या चेकच्या झेरॉक्स प्रती, सेवानिवृत्त झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिकांची पडताळणी केली असल्यास त्यांच्या प्रती, ज्यांच्या सेवापुस्तिकाची पडताळणी केली नाही ती न करण्याची कारणे, पडताळणी न करता पेंन्शन दिले असल्यास त्याचे निकष व शासन नियमांची माहिती, संबंधित शासन परिपत्रकाची प्रत, सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना विविध देय रकमा दिल्या असल्यास त्यांच्या रकमेसह माहिती, थकीत असलेल्या दिनांकासह व थकीत असल्याचे सविस्तर स्पष्टीकरण - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन, सोबत ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे स्वतःच्या स्वाक्षरीचे घोषणापत्र जोडले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न मिळाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण यांच्याकडे दिनांक १५-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०५-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे, श्री. पापुलवार, माहिती अधिकारी, नगर परिषद, पैठण, श्री. वंगळ, लेखा विभाग प्रमुख, नगर परिषद, पैठण, श्री. पारीख, आस्थापना विभाग, नगर परिषद, पैठण व श्री. खंडागळे वसुली विभाग, नगर परिषद, पैठण यांना सूचित केले असल्याचे अपिलार्थीस अवगत

केले. तथापि या आदेशानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, उपस्थित आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे व या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगास स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती ही व्यापक स्वरुपाची व ९ वर्षाशी संबंधित आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ मधील, "सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना देय असलेल्या रकमेपोटी त्यांना दिलेल्या चेकच्या झेरॉक्स प्रती" ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. कारण चेकच्या झेरॉक्स प्रती या जन माहिती अधिकारी यांच्याकडे असणे संभवत नाही. या प्रती, सदरची रक्कम ज्या व्यक्तीला दिली गेली त्या व्यक्तीकडेच मूळ स्वरुपात असणे अभिप्रेत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती नगर परिषदेच्या उपरोक्त कालावधीतील कॅश बुकच्या तपासणीनंतर प्राप्त करुन घेता येईल. तथापि याकरिता त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडील अभिलेख्याची तपासणी करण्यासाठी वेगळा अर्ज करावा लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ मध्ये अपिलार्थीने "सेवानिवृत्त झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिकेची पडताळणी न करण्याची कारणे" अशी माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दलचे कोणतेही कारण अथवा स्पष्टीकरण अर्जदारास देणे अभिप्रेत नाही.

अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी विसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ मधील या भागावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ मध्ये, "ज्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिकेची पडताळणी केल्याशिवाय त्यांना पेन्शन लागू केले असेल तर त्याची माहिती" अशाप्रकारची माहिती मागितली आहे. तथापि या संदर्भात अपिलार्थीस माहिती पाहिजे म्हणजे नेमकी कोणत्या मुद्यावर माहिती पाहिजे हे त्यांनी स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे मुद्दा क्रमांक ५ मधील या भागावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. परंतु याच मुद्यामधील "सेवापुस्तिकांची पडताळणी न करता पेंन्शन दिले जाण्याचे नियम जर शासनाच्या परिपत्रकात असतील तर त्या परिपत्रकाची प्रत" या भागावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. याचबरोबर अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ द्वारे त्यांनी मागणी केलेल्या सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या थकबाकी थकीत असल्यास सविस्तर स्पष्टीकरण या भागावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. या बाबतचे कारण या परिच्छेदामध्ये मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात दिलेल्या निर्णयामध्ये स्पष्ट केलेले आहे, तेच कारण या मुद्याबाबत लागू होते.

अशाप्रकारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली व अपिलार्थीस देय असलेली माहिती याचे वरील परिच्छेदात दिलेले पृथक्करण पाहता, सर्व जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांना वर स्पष्ट केल्याप्रमाणे देय असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागताना स्वतःच्या सहीचे, ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे

घोषणा पत्र दिले आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाबरोबर ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा सबळ पुरावा जोडला आहे किंवा कसे हे आयोगास संबंधित जन माहिती अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे कळण्यास मार्ग नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राची वैधता तपासून घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर माहितीसाठीच्या अर्जाच्या पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने हे उत्तरदायित्व पार पाडले असल्याचा कोणताही पुरावा आयोगास सादर केलेला नाही. त्यामुळे जर अपिलार्थीकडे ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा कोणताही सबळ पुरावा नसेल तर त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क प्राप्त करुन घ्यावी लागेल. तसेच ही माहिती त्यांना वरील कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये स्वतः उपस्थित राहून त्यांच्याकडून वर दिलेल्या निर्णयाप्रमाणे हस्तगत करुन घ्यावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राहुल कुंडलिक पगारे, मु. पो. जायकवाडी (उत्तर), ता. पैठण, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११२६

निर्णय दिनांक ०४-०५-२०१०

१ श्री. विवेक पंढरीनाथ बेंद्रे, : अपिलार्थी
रा. प्लॉट नंबर ४३, गट नं. ८९, हायकोर्ट कॉलनीजवळ,
सातारा परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : सहायक धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १५-०४-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न दिल्याने व कोणत्याही प्रकारची लेखी माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी

विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी सहायक धर्मादाय आयुक्तांच्याकडे काही माहितीकरिता केलेल्या पत्रव्यवहारासंदर्भात आणि त्रयस्थ पक्ष विश्वस्त भजनी मंडळ यांच्या संदर्भात काही माहिती एकूण ४ मुद्यांद्वारे टपालाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात हजर राहून माहिती प्राप्त करुन घेऊन जाण्याचे सूचित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर अधिनियमातील विहित मुदतीत निर्णय प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित व जन अपिलीय अधिकारी आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी प्रथमतः अपिलार्थीस त्यांनी माहितीच्या अधिकाराखाली मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयातून घेऊन जाण्याचे त्यांच्या दिनांक २१-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने त्याप्रमाणे कार्यवाही न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक २०-०७-२००९ रोजी दिलेल्या

निर्णयाप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ३१-०७-२००९ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविली. ही माहिती अपिलार्थी त्यांच्या कार्यालयातून दिनांक ०३-०८-२००९ रोजी व्यक्तिशः हस्तगत करुन घेऊन गेले आहेत. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीची माहिती मिळाल्याची पोचसही आयोगास दाखवली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रथम प्रतिसाद हा चुकीचा आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांचा माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविणे अभिप्रेत होते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे माहिती मागितली असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क मूळात टपालाने कळविणे भाग होते. परंतु त्यांनी अशाप्रकारची कृती न करता अपिलार्थीस स्वतः माहिती घेऊन जाण्यासाठी त्यांच्या कार्यालयात बोलाविले, ही त्यांची कृती चुकीची आहे. या कृतीच्या समर्थनार्थ जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्टीकरण दिले की, त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीखाली माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर ते प्रथमतः माहिती तयार झाल्यानंतर अर्जदाराला त्यांच्या कार्यालयात बोलावितात आणि नंतर प्रतिपृष्ठ रु.२ या दराने आकारणी करुन प्रकरणनिहाय अर्जदारास सशुल्क अथवा निशुल्क माहिती पुरवितात. अर्जदाराना माहिती पुरविण्याची जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची ही कृती चुकीची आहे. माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत त्यांनी अर्जदारास त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची अंदाजे पृष्ठ संख्या व माहितीसाठीचा प्रतिपृष्ठ दर आणि अर्जदाराने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात

भरावयाचे अंदाजे शुल्क हा तपशील त्यांनी अर्जदारास देणे हे अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. तेव्हा इतःपर अशाप्रकारच्या कृतीची पुनरावृत्ती न करता अर्जदाराने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहून जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारांना प्रथमतः अंदाजे शुल्क, त्या शुल्काच्या सर्व तपशीलासह अर्जदारास कळविण्याची दक्षता घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांनी त्यांनी मागणी केलीली माहिती विनामूल्य पुरविली असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. तसेच अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर सुनावणी घेऊन निर्णय दिल्याने आणि अपिलार्थीस तदनंतर माहिती पुरविली गेली असल्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. परिणामी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विवेक पंढरीनाथ बेंद्रे, रा. प्लॉट नंबर ४३, गट नं. ८९, हायकोर्ट कॉलनीजवळ, सातारा परिसर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११२७

निर्णय दिनांक ०४-०५-२०१०

१ श्री. सुर्यकांत चंद्रकांत कांबळे, : अपिलार्थी

जय हनुमान, मु. वरुड, पो. उळूप, ता. भूम, जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वरुड, ता. भूम,

जि. उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम,

जि. उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न पुरविता नंतर मुदतबाह्य अपूर्ण माहिती पुरविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, ग्रामपंचायत वरुडकडून केल्या गेलेल्या शासकीय निधीच्या विनियोगासंदर्भात दि. १ जानेवारी २००५ ते ३१ डिसेंबर २००८ या कालावधीशी संबंधित व्यापक व्याप्ती असलेली काही माहिती एकूण १७ मुद्यांद्वारे नोंदणीकृत टपालाने मागितली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम यांच्यामार्फत ग्रामसेवक ग्रामपंचायत वरुड यांना केला होता. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम यांनी दिनांक १९-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे हा अर्ज ग्रामसेवक, वरुड यांना पाठविला. तथापि यानंतर मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्याचे सूचित केले. तथापि या निर्णयामध्ये व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रामध्ये अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांनी यापूर्वी माहिती दिल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस विस्तार अधिकाऱ्यामार्फत दिनांक ३०-०५-२००९ रोजी एकूण २८७ पृष्ठांची माहिती दिली आहे. तथापि या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५, ६ व ७ या मुद्यावरील माहितीचा समावेश नाही. या संदर्भात त्यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, या मुद्यांद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मूळात त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले

नाहीत. आता मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असून ही माहिती ते अपिलार्थीस १० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. डावरे सचिन मधुकर (सध्या ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय उमाची वाडी, ता. भूम या पदावर कार्यरत) यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीने त्यांच्याकडे मूळ अर्ज केल्यानंतर त्यांनी १५ दिवसाच्या आत तयार करुन ते ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी स्वत: गेले असता, अपिलार्थीने ही माहिती घेण्यास टाळले व अपिलार्थी हे त्यांनी अर्ज केलेल्या पत्त्यावर राहत नसून त्यांचे वास्तव्य कायम-स्वरुपी पुणे येथे आहे. अपिलार्थीस माहिती टाळण्याचा त्यांचा कोणताही उद्देश नव्हता.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीचे म्हणणे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाली, हे या प्रकरणी सिध्द होत आहे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, ५, ६ व ७ शी संबंधित माहिती अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणे बाकी असल्याचे दिसून येत आहे. त्यापैकी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भातील माहिती सध्याचे जन माहिती अधिकारी हे १० दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भात या ग्रामपंचायतीकडे नष्ट केलेल्या अभिलेख्यांची नोंदवही ठेवलेली नाही आणि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील दिनांक ०१-०१-२००५ ते ३१-१२-२००८ या कालावधीमध्ये या ग्रामपंचायतीने कोणतेही अभिलेखे नष्टही केले नाहीत. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व ७ च्या संदर्भात ग्रामपंचायतीने कोठेही गुंतवणूक केली नसल्यामुळे त्याची नोंद ग्रामपंचायतीने त्यांच्याकडच्या नोंदवहीमध्ये घेतलेली नाही. परिणामी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ६ व ७ च्या

संदर्भात माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे आता कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. अशाप्रकारे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५, ६ व ७ च्या संदर्भात माहितीची वस्तुस्थिती पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे मूळात अस्तित्वात नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी ती आता देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी या वस्तुस्थितीची कल्पना अपिलार्थीस वेळेत देणे त्यांना भाग होते. परंतु त्यांनी अशी कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ , ६ व ७ शी संबंधित माहिती अद्यापपावेतो अप्राप्त असल्याचे अपिलार्थीस वाटत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ द्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व तसेच याच माहितीबरोबर त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५,६ व ७ शी संबंधित माहितीची वस्तुस्थिती त्यांना उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १,५,६ व ७ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाद्वारे पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुर्यकांत चंद्रकांत कांबळे, जय हनुमान, मु. वरुड, पो. उळूप, ता. भूम, जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वरुड, ता. भूम, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११२८

निर्णय दिनांक ०४-०५-२०१०

१ सौ. ललीता सुधाकर व्हटे, : अपिलार्थी
रा. खरोळा, ता. रेणापूर, जि. लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रेणापूर, जि. लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद, लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रेणापूर, जि. लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुदतीत पूर्ण माहिती न मिळाल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयामार्फत मदतनीस, कार्यकर्ती व सुपरवायझर इत्यादी पदावर केल्या गेलेल्या भरती संदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे व्यक्तिशः माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील पृष्ठांची संख्या १५०० इतकी असल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात येऊन अवलोकन करण्याचे सूचित केले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०२-२००९ रोजी निर्णय देऊन दिनांक २८-०२-२००९ पर्यंत जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन घेण्याचे त्यांना सूचित केले. या निर्णयाप्रमाणे अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २६-०२-२००९ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती घेऊन गेल्या. तथापि या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहितीचा समावेश नसल्यामुळे, अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याच्या कारणास्तव त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २६-०२-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातर्फे नेमल्या गेलेल्या मदतनीस, कार्यकर्ती, सुपरवायझर या पदावर कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीच्या वेळी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास सादर केलेल्या कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती व या सर्व कर्मचाऱ्यांच्या त्यांची निवड करताना प्राप्त झालेल्या गुणांच्या प्रती अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही स्पष्ट स्वरुपात आहे. परंतु अपिलार्थीस ही माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस नेमकी कोणत्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भात माहिती हवी आहे, असे त्यांच्या दिनांक २६-०२-२००९ रोजीच्या माहितीपोटी दिलेल्या पत्रामध्ये विचारले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या संदर्भात माहिती मागितली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना नेमकी कोणत्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भात माहिती हवी आहे हे अपिलार्थीस विचारणे तथ्यहीन ठरते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही स्पष्ट आहे त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना आता त्यांच्याकडे कार्यरत असलेल्या मदतनीस, कार्यकर्ती, सुपरवायझर या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांची नेमणूक करताना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केलेल्या कागदपत्राच्या प्रती आणि त्यांच्या नियुक्तीचा अहवाल, त्यांना प्राप्त झालेल्या गुणांच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरीही ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे, ही उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष यांना कोणताही प्रत्यवाय असू नये. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी

संबंधित मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात या कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून, जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. ललीता सुधाकर व्हटे, रा. खरोळा, ता. रेणापूर, जि. लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रेणापूर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११२९

निर्णय दिनांक ०४-०५-२०१०

१ श्री. आर. एम. पाटील, : अपिलार्थी

रा. ऑईल मिलजवळ, डॅम रोड, उदगीर, ता. उदगीर, जि. लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर विभाग, लातूर

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर

त्रयस्थ पक्ष : श्री. बागवान ए. एस.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती शिक्षणाधिकारी यांच्याकडे उपलब्ध असूनही त्यांनी त्यांच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडे पाठविला व त्यांना ३० दिवसाच्या आत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही व कायद्याचा भंग केला त्यामुळे त्यांना कायद्यानुसार दंडात्मक शिक्षा करण्यात येऊन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन

द्यावी.  तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी देखील माहिती अधिकाऱ्याशी  संगनमत करुन त्यांच्या प्रथम अपिलावर मुदतीत निकाल न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, हजरत मिया शॉ खादरी उर्दू (प्राथमिक) शाळा, वाढवणा बु., तालुका उदगीर या शाळेच्या संदर्भात एकूण १२ मुद्यांद्वारे काही माहिती नोंदणीकृत टपालाने मागितली होती.

तथापि ही माहिती अपिलार्थीस मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी,   शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर यांच्याकडे दिनांक ०२-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०३-२००९ रोजी निर्णय दिला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती   व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने  असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी आता बरोबर आणली असून, ही माहिती ते अपिलार्थीस देण्यासाठी तयार आहेत.  त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीचा दिनांक १६-१२-२००८ रोजीचा मूळ अर्ज त्यांनी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडे दिनांक ३०-१२-२००८ रोजी पाठविल्यानंतर त्या शाळेच्या मुख्याध्यापकाने दिनांक १३-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस काही माहिती पुरविली आहे.  तथापि ही माहिती त्रोटक वाटल्याच्या

कारणावरुन त्यांनी आता अपिलार्थीस देण्यासाठी सर्व १२ मुद्यांवरील माहिती त्यांच्याबरोबर आणली असून, ही माहिती ते अपिलार्थीस त्वरित देण्यास तयार आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही विस्तृत प्रमाणात असून, अपिलार्थीने यातील काही मुद्यांद्वारे मोघम व जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकण अपेक्षित करणारी माहिती मागविली आहे. अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्यामुळे, या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. तसेच अपिलार्थीने काही मुद्यांद्वारे मोघम स्वरुपात माहिती मागितली असल्यामुळे ती देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अशाप्रकारची अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २, ७, १० व ११ या मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र उर्वरित मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. एवढे जरी असले तरीही सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी आता अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण १२ मुद्यांवरील माहिती तयार केली असून, ही माहिती ते अपिलार्थीस आता विनामूल्य पुरविण्यास तयार आहेत. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात असतानाही त्यांनी अपिलार्थीस ती स्वतःच्या पातळीवर देण्याच्या ऐवजी अपिलार्थीचा अर्ज संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडे पाठवून त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब शिक्षण संचालक, पुणे यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. साळूंके (सध्या जिल्हा परिषद, रत्नागिरी येथे शिक्षणाधिकारी या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

३. शिक्षण संचालक, पुणे यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर श्री. साळूंके (सध्या जिल्हा परिषद, रत्नागिरी येथे शिक्षणाधिकारी या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. आर. एम. पाटील, रा. ऑईल मिलजवळ, डॅम रोड, उदगीर, ता. उदगीर, जि. लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर यांना या निकाल-पत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटलजवळ, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११३४

निर्णय दिनांक ०४-०५-२०१०

१ श्रीमती खुजिस्ता सिद्दीकी, : अपिलार्थी
डी. आर. टी. २०, लेबर कॉलनी, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा वैद्यकीय प्रशासन अधिकारी,
आयुक्त, रा. का. वि. योजना, प. म. वि., पंचदीप भवन,
बिबवेवाडी, पुणे - ३७

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा आयुक्त, रा. का. वि. योजना, एम. जी. एम. हॉस्पिटल
बिल्डींग, एस. एम. राव रोड, परेल, मुंबई

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : संचालक (प्रशासन), राज्य कामगार विमा योजना, मुंबई

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना ग्रॅच्युईटीची रक्कम देण्याकरिता महालेखापाल यांनी अधिकारपत्र देऊन दीड वर्षाचा कालावधी व्यपगत झाल्यानंतरही त्यांना ग्रॅच्युईटीची रक्कम संबंधितांकडून न मिळाल्याने व माहिती अधिकार अधिनियमातील

तरतुदी-नुसार त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो प्राप्त न झाल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमानुसार दंडाची व शिस्तभंगविषयक कार्यवाही आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अपिलार्थी यांच्या ग्रॅच्युईटीसंदर्भात ऑगस्ट २००७ ते दिनांक २५-०२-२००९ या कालावधीमध्ये त्यांना दिलेल्या महालेखापाल, मुंबई यांच्या दिनांक १०-०८-२००७, ०८-१०-२००८, अपिलार्थीच्या दिनांक २६-१०-२००७, ०७-०२-२००८, ११-०९-२००८ व दिनांक २९-१०-२००८ रोजीच्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही आणि महालेखापाल, मुंबई यांच्या दिनांक १०-०८-२००७ रोजीच्या पत्राची प्रत वैद्यकीय अधीक्षक, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, चिकलठाणा, औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडे पाठविण्याचे कारण, दीड वर्षाचा प्रदीर्घ कालावधी लोटून सुध्दा जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही कार्यवाही न करण्याचे कारण, ग्रॅच्युईटीची रक्कम अदा करण्यासाठी आता अपेक्षित कालावधी, या विलंबासाठी जबाबदार असणा-या व्यक्तींची नावे, हुद्दा आणि त्यांना देय असलेली व्याजाची रक्कम ज्या व्यक्तीकडून वसूल केली जाणार आहे, त्या व्यक्तींची नावे व पत्ते आणि अपिलीय अधिका-याचा पत्ता, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्याकडील दिनांक १६-०३-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या अर्जाची तत्कालीन स्थिती अपिलार्थीस कळविली, तथापि यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-

०३-२००९ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी गैरहजर व अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील विनंतीशी सुसंगत युक्तिवाद आयोगासमोर केला.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने, अपिलार्थीच्या प्रलंबीत देयकाची आयोगास थोडक्यात कल्पना देऊन अपिलार्थीस जी कथित देय ग्रॅच्युईटी रक्कम देणे बाकी होती ती ग्रॅच्युईटीची रक्कम पूर्वीच देण्यात आली असल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या एकूण ११ मुद्दयांपैकी, मुद्दा क्रमांक १ ते ६ व मुद्दा क्रमांक ११ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे, कारण ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या पत्रांवर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही म्हणजे, अपिलार्थीने संदर्भित केलेल्या प्रत्येक पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जातील विनंती-वर संबंधित प्राधिकरणाकडे केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती आणि या विनंतीवर जन माहिती अधिकारी यांच्याकडील अभिलेख्यावर उपलब्ध असलेल्या टिपणीच्या प्रती, ही होय. या सर्व कागदपत्राच्या प्रती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपर्यंत प्राप्त झालेल्या नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त संक्षिप्त स्वरुपातील, अपिलार्थीच्या या

अर्जातील विनंतीवर चालू असलेली कार्यवाही अपिलार्थीस कळविली आहे, याला माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ' माहिती ' म्हणता येणार नाही. अपिलार्थीस अशा प्रकारची अवगत करुन दिलेली वस्तुस्थिती एवढेच त्याला म्हणता येईल. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ६ मध्ये, अपिलार्थीने संदर्भित केलेल्या अर्जांवर जन माहिती अधिकारी यांनी विविध प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या संबंधित अभिलेख्यांवरील टिपणीच्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत रजिस्टर्ड टपालाव्दारे विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ११ व्दारे, जन अपिलीय अधिकारी यांचा हुद्दा व पूर्ण पत्ता अशी माहिती जन माहिती अधिकारी यांना विचारली आहे, ही माहिती देखील, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांना ती अपिलार्थीस द्यावी लागेल. ही माहिती त्यांनी अपिलार्थीस वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या कालावधीमध्ये त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७, ८, ९ व १० व्दारे, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबद्दलची कारणे आणि भविष्यकाळातील व जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात अस्तित्वात नसलेली माहिती मागितली होती. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्ती-बाहेरची असल्यामुळे, ती माहिती अपिलार्थीस देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये, अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास उपलब्ध करुन देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे, इतपत सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७, ८, ९ व १० शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.

अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती आणि अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देय असलेली माहिती, याचे वरील परिच्छेदात केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस देय असलेली त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ६ व ११ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असल्यामुळे व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्यापासून कोणत्याही असद्हेतूने दडवून ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची केलेली विनंती, आयोग अमान्य करीत आहे.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे आढळून आले आहे की, या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन, स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाची व बेपवाईची मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी त्यांच्या स्तरावर यथायोग्यरित्या दखल घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ६ व ११ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती खुजिस्ता सिद्दीकी, डी. आर. टी. २०, लेबर कॉलनी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय प्रशासन अधिकारी, रा. का. वि. योजना, प. म. वि., पंचदीप भवन, बिबवेवाडी, पुणे - ३७ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक (प्रशासन), राज्य कामगार विमा योजना, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११३५

निर्णय दिनांक ०४-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बद्रिनारायण रामेश्वर उपरे,<br>जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे, म्हाडा कॉलनी ऑ. नं.<br>२७, जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)<br>उपविभाग, भोकरदन, जिल्हा जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)<br>विभाग, जालना | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांचे दिनांक १९-०४-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रासोबत त्यांनी अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक १२-०४-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, भोकरदन यांनी, त्यांनी मागितलेली संपूर्ण सविस्तर माहिती अपिलार्थीस समक्ष दाखविली असून, ती पाहून त्यांचे समाधान झाले आहे व त्यांची जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाबद्दल कोणतीही तक्रार नाही. तसेच त्यांनी मागणी केलेल्या माहितीची त्यांना आता आवश्यकता नसल्यामुळे, त्यांचे अपील निकाली काढावे, अशी विनंती त्यांनी आयोगास या पत्राच्या अखेरीस केली आहे. खुद्द अपिलार्थीचे आवश्यक ती माहिती पाहून समाधान झाले असल्याने आणि विशेषत: त्यांना आता या माहितीची आवश्यकता नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बद्रिनारायण रामेश्वर उपरे, जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे, म्हाडा कॉलनी ऑ. नं. २७, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११३६

निर्णय दिनांक ०४-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बालाजी प्रल्हादराव उबाळे,<br>लहुजीनगर, सुपर मार्केट रोड, परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी |
| | जन अपिलीय अधिकारी | : | कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, परभणी जिल्हा परिषदेमध्ये चालू असलेल्या आय. एस. ओ. अंतर्गत

पुर्नविद्युतीकरणाचे काम कुठल्या अभियंत्याच्या अधिनस्त होत आहे, त्या कामाचे अंदाजपत्रक व संचिकाच्या साक्षांकीत प्रती, अशी माहिती व्यक्तिशः किंवा टपालाव्दारे मागितली होती. तथापि ही माहिती विहीत मुदतीत प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे दिनांक २१-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. परंतु यानंतरही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती तथा अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच, अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २२-०४-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २२-०६-२००९ रोजी प्राप्त झाली असल्याचे नमूद केले आहे आणि आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याने, त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्याची त्यांनी या पत्राव्दारे आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्याची केलेली विनंती आयोग मान्य करत आहे आणि अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बालाजी प्रल्हादराव उबाळे, लहुजीनगर, सुपर मार्केट रोड, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११३७

निर्णय दिनांक ०४-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अशोक उत्तमराव कांबळे,<br>लहुजीनगर, सुपर मार्केट रोड, परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद,<br>परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,<br>परभणी | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद,<br>परभणी |
| | जन अपिलीय अधिकारी | : | कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद,<br>परभणी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने, बहुविध प्रशाला या शाळेचे पूर्नविद्युतीकरणाचे काम कोणत्या अभियंत्याच्या अधिनस्त करण्यात आले, या संदर्भातील व इतर अनुषंगीक माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती तथा अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच, अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २२-०४-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २२-०६-२००९ रोजी प्राप्त झाली असल्याचे नमूद केले आहे आणि या पत्राच्या अखेरीस समाधान व्यक्त करुन, त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने, त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्यामुळे त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्याची केलेली विनंती आयोग मान्य करत आहे आणि अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अशोक उत्तमराव कांबळे, लहुजीनगर, सुपर मार्केट रोड, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२८८

निर्णय दिनांक ०४-०५-२०१०

१ श्री. सदाशिव केरबा रसाळ, : अपिलार्थी

रा. लोहारा खु., तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप विभागीय अधिकारी, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हाधिकारी, उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहारा, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : उप विभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडे, खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

' लोहारा खु. एथील फे. क्र. १३, १५ व ३१० ही जमीन मूळ मालक सदाशिव केरबा रसाळ यांची असताना शासनाने फे. १३, १५ दर्शवून कोणत्या आधारे ताब्यात घेतले व या फेरप्रमाणे कोणते स. नं. घेतले याची माहिती व कोणते इ. स. घेतले याची माहिती मिळणे (२) ३१० फे. क्र. मध्ये जो फेर आहे तो फेर काणते आधारे व कोणाचे आदेशाने व कोन घेतले व त्यात सर्टीफिकेट नंबर कोणते आहे. '

अपिलार्थीच्या या अर्जास उप विभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, तहसीलदार, लोहारा यांच्या कार्यालयातील संबंधित लिपीक अथवा अव्वल कारकून यांना त्यांच्या कार्यालयात दिनांक १३-१०-२००८ रोजी उपस्थित राहण्याची सूचना दिली व दिनांक १७-१०-२००८ रोजीच्या निर्णयाव्दारे अपिलार्थीस त्वरीत माहिती देण्याचे तहसीलदार, लोहारा यांना सूचित केले. तथापि यानंतर अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक १०-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जिल्हाधिका-याने, व्दितीय अपील चालविण्याचा अधिकार त्यांच्या कार्यालयास नसल्याने अपिलार्थीचे अपील अस्वीकृत करण्याचा निर्णय दिनांक ०२-१२-२००८ रोजी दिला. अशा प्रकारे तहसीलदार यांनी माहिती दिली नाही व जिल्हाधिका-याने अपिलार्थीचे प्रथम अपील स्वीकृत केले नाही. परिणामी अपेक्षित माहितीपासून वंचित राहिल्यामुळे व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी गैरहजर व अपिलार्थी आणि जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सर्वसाधारण परिस्थितीत तहसीलदार, लोहारा यांच्याकडे उपलब्ध असल्याने अपिलार्थीचा अर्ज उपविभागीय अधिका-यास प्राप्त झाल्यानंतर त्यांनी तहसील कार्यालयातील संबंधितांना बोलावून अपिलार्थीस माहिती देण्याचे तहसीलदार, लोहारा यांना आदेशित केले होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित "जन माहिती अधिकारी", तहसीलदार लोहारा हे आहेत आणि या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा मूळ माहितीसाठीचा अर्ज उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांना उद्देशून केला आहे. त्यांनी अशा वेळी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार तहसीलदार, लोहारा यांच्याकडे, अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठवून त्याची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कृती न करता, त्यांनी तहसीलदार, लोहारा यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. तसेच या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी हे उपविभागीय अधिकारी असतानाही अपिलार्थीने जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. जिल्हाधिका-याने अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांच्या-कडे प्राप्त झाल्यानंतर ते उपविभागीय अधिका-याकडे पाठवून यासंदर्भात निर्णय देण्याचे त्यांना सूचित करणे अपेक्षित होते, तथापि त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्जच स्वीकृत केला नाही. अशा प्रकारे अपिलार्थीच्या मूळ अर्जाची व अपिलाची हाताळणी, माहिती अधिकार अधिनियमा-तील तरतुदीप्रमाणे न झाल्याने अपिलार्थी त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले असे आयोगास आढळून आले आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्याची जबाबदारी उपविभागीय अधिकारी यांच्यावर सोपविण्यात येत आहे. तेव्हा आता अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांना असे

आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २२-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी उप विभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी उप विभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. उप विभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सदाशिव केरबा रसाळ, रा. लोहारा खु., तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहारा, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११४३

निर्णय दिनांक : ०५.०५.२०१०

१. श्री. कदम नामदेव गणपतराव, : अपिलार्थी
रा. चौकी महाकाया, पो.कौठा,ता.कंधार,जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
प्रादेशिक साखर संचालक कार्यालय,
नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
संचालक (प्रशासन),
साखर आयुक्तालय,पुणे

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड

जन अपिलीय अधिकारी : संचालक साखर (अर्थ), साखर आयुक्तालय,पुणे.

त्रयस्थ पक्ष : व्यवस्थापक, जय अंबिका सहकारी साखर कारखाना,कुंटूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.०४.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली असून, गाळप हंगाम, २००७ ते २००८ सालच्या ऊसाच्या दराच्या प्रतींची मागणी केल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. ०४.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

"जय अंबिका सह.सा.का.कुंटूर ने एसएमपी प्रमाणे सभासदांना भाव दिला नसल्याने त्यांचेवर ऊस नियंत्रण आदेश 1966 कलम 3(4) अधिनियम 1955 चे कलम 7 व 10 नुसार कार्यवाही केली का? असल्यास केंव्हा? कोणती? त्याचा परिणाम काय? केली नसल्यास का केली नाही? "

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०७.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे एकूण रु.२/- अधिक टपालखर्च रु.२५/- असे एकूण रु.२७/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१९.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.११.२००८ रोजीच्या (जे प्रत्यक्षात पोस्टामध्ये दि. ०१.१२.२००८ रोजी टाकले) पत्राद्वारे विनामूल्य माहिती पुरविली. अपिलार्थीच्या दि. १९.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.०२.२००९ रोजी आदेश पारीत करुन अपिलार्थीस S.M.P. च्या आदेशाच्या प्रती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी S.M.P.च्या आदेशाच्या प्रती दि. १९.०४.२०१० रोजी टपालाद्वारे पुरविल्या तथापि यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी त्रयस्थ पक्षासह उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस प्रथमत: दि. १८.११.२००८ रोजी व तदनंतर दि.१९.०४.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे. त्यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणले आहे की, अपिलार्थीस त्यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कळवूनही त्याप्रमाणे अपिलार्थीने शुल्काचा भरणा त्यांच्याकडे कधीही केला नाही.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम,जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, मूळात अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या दि. ०४.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमान्वये मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २(च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

**“ ‘माहिती’ याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके,आदेश,रोजवहया,संविदा,अहवाल,कागदपत्रे,नमुने,प्रतिमाने(मॉडेल),कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.”**

वरील व्याख्येचे अवलोकन केले असता, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने त्यांच्याकडे माहितीची मागणी केल्यास सदरची माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे, इतपतच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत

असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या निर्णयाची कारणे अथवा त्यांच्या कृतीचे स्पष्टीकरण मागणे आणि माहिती अधिकाऱ्याने अर्जदारास त्याप्रमाणे त्यांच्या निर्णयाचे अथवा कृतीचे स्पष्टीकरण देणे अशाप्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. विचाराधीन प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्पष्टीकरण व खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागविली असल्याचे दिसून येत आहे. अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये वर स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येत समाविष्ट होऊ शकत नसल्याने, मूळात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी विचाराधीन प्रकरणाच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली कोणतीही माहिती देय होत नाही. तथापि एवढे असूनही अपिलार्थीच्या मनातील शंकांचे निरसन करण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी वेळोवेळी केल्याचे दिसून येत आहे. हे पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०५.०५.२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कदम नामदेव गणपतराव, रा.चौकी महाकाया,पो.कौठा ता.कंधार,जि.नांदेड-४३१७४६

२. जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक साखर (अर्थ), साखर आयुक्तालय,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११४४
निर्णय दिनांक: ०५-०५-२०१०

१. श्री. लोंढे रमेश सोपानराव, : अपिलार्थी
रा.कन्हेरी, ता.औसा, जि.लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. निलंगा,
जि.लातूर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. निलंगा,
जि.लातूर.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कनिष्ठ अभियंता, महावितरण, निलंगा, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, महावितरण, निलंगा, जि.लातूर
त्रयस्थ पक्ष : मे. श्याम इलेक्ट्रीकल्स, परळी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती पुरवून पूर्ण माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १७.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष मे. श्याम इलेक्ट्रीकल्स,परळी वै. या कंत्राटदाराने दि. ०१.०४.२००७ ते २८.०२.२००९ या कालावधीमध्ये केलेल्या कामाची माहिती एकूण २ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्रयस्थ पक्षाने या कालावधीमध्ये केलेल्या कृषी पंप कनेक्शनची तालुकानिहाय यादी, ट्रान्सफॉर्मर, एच.टी. लाईन, एल.टी लाईन कामासाठी वापरलेल्या साहित्याची तपासणी केल्याबाबत सक्षम अधिकाऱ्याच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत व या कामासाठी झालेला तालुकानिहाय खर्च विवरणासह - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस  दि. ३०.०४.२००९ पर्यंत माहिती देण्याचे आश्वासित केले व तदनंतर दि. २१.०४.२००९ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २८६/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे या शुल्काचा भरणा न करता, दि. ३०.०४.२००९ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार कार्यकारी अभियंता तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या दोन मुद्यांवरील माहितीपैकी त्यांना अद्यापपावेतो त्यांच्या मूळ

अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून येणे बाकी आहे. ती माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्वरित प्राप्त व्हावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१३६/- इतके त्यांच्या कार्यालयात दि. १०.०६.२००९ रोजी भरणा केल्यानंतर, त्याच दिवशी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पुरविली आहे.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाशी संबंधित काही माहिती एकूण दोन मुद्यांद्वारे विचारली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरीही या माहितीचे स्वरुप सार्वजनिक असल्यामुळे सदर माहिती अपिलार्थीस उघड करण्यास जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय असू नये. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एकूण २ मुद्यांपैकी मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आयोगासमोर कबूल केले आहे. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ शी संबंधित माहिती त्यांना मिळाली नसल्याचे त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये आयोगास स्पष्ट केले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ मध्ये, 'साहित्य तपासणी केल्याबाबतच्या प्रमाणपत्राची प्रत' जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविली. ते ही प्रत अपिलार्थीस त्वरित द्यावयास तयार आहेत. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ मधील त्रयस्थ पक्षाच्या दि. ०१.०४.२००७ ते २८.०२.२००९ या कालावधीमध्ये झालेल्या कामावरील खर्च, ही माहिती मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. यासंदर्भात स्पष्टीकरण देताना जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील या मुद्यावर थोडीशी संदिग्धता असल्यामुळे ते ही माहिती

दि. १०.०६.२००९ रोजी पुरवू शकले नाहीत, असे आयोगास स्पष्ट केले. आता अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे निश्चित स्वरुप त्यांना कळले असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून दहा दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

प्रसंगावशात आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे संपूर्ण शुल्क घेऊनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती पुरविली असल्यामुळे, त्यांना आता अपिलार्थीकडून त्यांनी स्वीकारलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १३६/- अपिलार्थीस परत करावे लागेल. हे शुल्क त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून दहा दिवसांच्या आत परत करावे, असे त्यांना पुढे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून स्वीकारलेले माहितीपोटीचे शुल्क रु. १३६/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०५-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. लोंढे रमेश सोपानराव,रा.कन्हेरी, ता.औसा, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, महावितरण, निलंगा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महावितरण, निलंगा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११४५
निर्णय दिनांकः ०५-०५-२०१०

१. श्री. सचिन रामकिशन पोलास, : अपिलार्थी
रा.जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपआयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने ते संतुष्ट नाहीत, असे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १६.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे घेतल्या गेलेल्या शिक्षण सेवक भरतीपूर्व परीक्षा, २००८ च्या संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद मार्फत प्राथमिक शिक्षण सेवक केंद्रीय भर्ती पूर्व निवड परीक्षा- ३१ ऑगस्ट २००८ घेण्यात आले होते त्यामध्ये विविध चार प्रश्न पत्रिकेचे संच होते त्यापैकी A प्रश्नपत्रिकेची संचाची छायांकित प्रत व त्याची उत्तरसूची सह माहिती देण्यात यावी."

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २६.०३.२००९ रोजीच्या (प्रत्यक्षात दि. ३१.०३.२००९ रोजी पाठविलेल्या) पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, परीक्षा परिषदेच्या सक्षम समितीने घेतलेल्या क्र. ६६२ या ठरावाप्रमाणे, देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०२.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.०६.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील अर्जावर रु.२०/- चे न्यायालयीन मुद्रांक न चिकटविल्यामुळे व जन माहिती अधिकारी यांच्याशी ते सहमत असल्याने त्यांनी या निर्णयाद्वारे अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, परीक्षा परिषदेच्या शासनाने नियुक्त केलेल्या तदर्थ समितीने क्र.६६२ च्या ठरावाद्वारे निर्णय घेतला असून, मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या प्रश्नपत्रिकेच्या संचाच्या व उत्तराच्या प्रती न देण्याचा, या ठरावामध्ये उल्लेख असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्याचे नाकारले. तसेच त्यांच्या कार्यालयामार्फत एका वर्षात साधारणतः १४ वेगवेगळ्या परीक्षा घेतल्या

जातात. या सर्व परीक्षांसाठी अंदाजे ३० लक्ष विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त होत असतात. अशाप्रकारच्या त्यांच्या कामाच्या व्याप्तीमुळे त्यांचे कार्यालय ज्या परीक्षा घेते त्या परीक्षेशी संबंधित कागदपत्रे परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर पाच ते सहा महिन्याच्या कालावधीमध्ये नष्ट केले जातात. या प्रकरणी देखील अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जरी अपिलार्थीस आता द्यावयाची ठरली तरी त्या माहितीशी संबंधित कागदपत्रे कार्यालयाने आता नष्ट केली असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस देता येणे शक्य नाही, असे त्यांनी आयोगास अवगत केले.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून जरी आयोगाने आदेशित केले तरीही प्राप्त होऊ शकणार नाही, असे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीस ही माहिती उघड करण्याचे नाकारताना जन माहिती अधिकारी यांनी परीक्षा परिषदेच्या तदर्थ समितीच्या ठराव क्र.६६२ चा संदर्भ दिला आहे. या ठरावामध्ये प्रश्नपत्रिकेची प्रतही कोणासही देऊ नये, असे ठरल्याचे आढळून येत आहे. तदर्थ समितीचा हा ठराव माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी पोषक नाही. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेताना विचारलेल्या प्रश्नांची प्रश्नपत्रिका आणि अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेली उत्तरपत्रिका, यांचे मूल्यांकन Optical mark reading पध्दतीने केले जात असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास कोणताही प्रत्यवाय असू नये. ही माहिती उघड न करण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी संदर्भित केलेला, त्यांच्याकडील ठराव क्र. ६६२ मध्ये, व्यावसायिकांकडून गैरवापर करण्याची शक्यता आहे, असे कारण समितीने दर्शविले असल्याचे दिसून येत आहे. तदर्थ समितीने माहिती उघड करण्याचे नाकारताना दिलेले हे कारण योग्य नाही. त्यामुळे राज्य परीक्षा परिषदेशी संबंधित

तदर्थ समितीने त्यांच्या ठराव क्र.६६२ चे पुनर्विलोकन करावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. तदर्थ समितीने ठराव क्र. ६६२ मध्ये व्यक्त केलेली भीती पूर्णत: काल्पनिक आहे. या ठरावाच्या उलट त्यांनी जर वेगवेगळया परीक्षांना विचारलेल्या प्रश्नांच्या प्रश्नपत्रिका आणि त्यांच्या आदर्श उत्तरसूची प्रसिध्द केल्या तर विद्यार्थ्यांना त्याचा अभ्यास करुन स्वत:च्या गुणवत्तेमध्ये वाढ करण्यास वाव मिळेल, असे आयोगास वाटते. आयोगाच्या या सूचनेचा परीक्षा समितीने गांभीर्याने विचार करुन आपली या संदर्भातील धारणा बदलावी, असे त्यांना येथे अधिनियमातील कलम १९(८)(क)(चार) मधील तरतुदीनुसार सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०५-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सचिन रामकिशन पोलास,रा.पोलास गल्ली, काद्राबाद,जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११४६
निर्णय दिनांक: ०५-०५-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. बलभीम लक्ष्मणराव जाहेर पाटील,<br>रा.बीड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>निवडणूक निर्णय अधिकारी तथा<br>तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था,बीड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, बीड | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक निबंधक (प्रशासन), कार्यालय,जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, बीड यांचे कार्यालय

त्रयस्थ पक्ष : सचिव, जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली असल्याने आणि जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत सुनावणी न घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील छत्रपती राजर्षी शाहू अर्बन को.ऑपरेटीव्ह बँकेच्या निवडणूकीतील कागदपत्रे पुरविण्यासंदर्भात दि. १५.०७.२००८ ते १५.०९.२००८ या कालावधीशी संबंधित असलेली काही माहिती एकूण सहा मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अपिलार्थीने दि. ३०.०७.२००८ रोजी दिलेल्या आक्षेप अर्जाची सत्यप्रत, जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव यांनी त्यांच्या शिक्षिकेस निवडणूकीस उभे राहण्यासाठी दिलेल्या परवानगी पत्राची प्रत व त्यासंदर्भात त्या संस्थेच्या ठरावाची नक्कल, सचिव यांनी दाखल केलेल्या जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाच्या घटनेची सत्यप्रत, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने दिलेल्या आक्षेप अर्जावर तयार केलेली टिपणी व अपिलार्थीच्या आक्षेपावर घेतलेल्या निर्णयाची प्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०३.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरवली. तथापि अपूर्ण माहिती मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२६.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दि. २४.०१.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली व त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ

माहितीसाठीच्या अर्जामध्ये संदर्भित केलेल्या निवडणूकीकरिता उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या उमेदवारास मान्यता देण्याप्रकरणी करावयाच्या छाननी प्रक्रियेअंतर्गत त्यांना तात्पुरत्या कालावधीकरिता जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाने त्यांच्या घटनेची सत्यप्रत जन माहिती अधिकारी यांचेकडे दिली होती. तथापि या घटनेतील तरतुदींचे अवलोकन केल्यानंतर या घटनेची प्रत त्यांनी संबंधित शिक्षण संस्थेस परत केली आहे. तसेच निवडणूकीमध्ये उमेदवाराची उमेदवारी निश्चित करताना शिक्षण संस्थेच्या ठरावाची नक्कल उमेदवाराच्या अर्जासोबत असणे अनिवार्य नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ द्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे कधीही उपलब्ध नव्हती. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ द्वारे अपिलार्थीने मागणी केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या आक्षेप अर्जावर त्यांनी कोणतीही टिपणी तयार केली नसल्यामुळे, या मुद्यावरील माहिती देखील मूळात त्यांच्याकडे अस्तित्त्वात नाही, त्यामुळे ती अपिलार्थीस पुरविता आली नाही. अपिलार्थीच्या अर्जातील उर्वरित सर्व मुद्यांवरील त्यांना देय असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाहीत.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे निवडणूक निर्णय अधिकारी या नात्याने काही माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी हे सहायक निबंधक, सहकारी संस्था या पदावर कार्यरत आहेत व ते सहकारी बँकांच्या निवडणूकीसंदर्भात पदसिध्द निवडणूक निर्णय अधिकारी आहेत. बँकांच्या निवडणूकी घेण्याबाबत इच्छूक उमेदवाराच्या उमेदवारी अर्जाची छाननी करणे आणि अंतिमतः त्यांच्या उमेदवारीस मान्यता देणे, हे जन माहिती अधिकारी यांचे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून या प्रकरणी कर्तव्य होते. त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीने संदर्भित केलेल्या निवडणूका पार पाडताना

संबंधित उमेदवारांच्या कागदपत्रांची छानननी केली. छाननीच्या वेळी पुरावा म्हणून आवश्यक असलेली इतर पूरक कागदपत्रे त्यांनी उमेदवाराकडून अवलोकनार्थ प्राप्त करुन घेतली व नंतर ती संबंधितांना परत केली. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती मागविली आहे, ती माहिती त्यांच्याकडे स्थायी स्वरुपात उपलब्ध असणे कोणत्याही प्रकारे संभवत नाही. त्यामुळे अपिलार्थीस आता जर जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाच्या, त्यांनी त्यांच्या शाळेतील शिक्षिकेला निवडणूकीसाठी उभे राहण्याकरिता परवानगी देण्यासंदर्भात जर काही ठराव घेतला असेल तर, त्यांना या ठरावाची प्रत व या संस्थेच्या घटनेच्या प्रतीची माहिती देखील त्यांना संबंधित संस्थेकडून अथवा धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार स्वतंत्र अर्ज करुन ती प्राप्त करुन घेता येईल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संदर्भित निवडणूकीच्या उमेदवारांच्या अर्जांची छाननी करताना त्यांनी दिलेल्या आक्षेप अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या टिपणीची प्रत मागितली आहे. या संदर्भात उमेदवारांच्या अर्जाची छाननी करुन यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी लागलीच निर्णय देणे अपेक्षित आहे. त्याप्रमाणे त्यांनी या प्रकरणी संबंधित शिक्षिकेच्या उमेदवारीस मान्यता दिली आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ शी संबंधित माहिती मूळात अस्तित्त्वात नसल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. थोडक्यात या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या पूर्णपणे ताब्यात असलेली स्थायी स्वरुपाची माहिती मागितलेली नाही, असे दिसून येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती विनामूल्य पुरविली असल्यामुळे व उर्वरित माहिती प्राप्त करण्यासाठी त्यांच्याकडे वैकल्पिक पर्याय स्वतंत्रपणे उपलब्ध असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य

असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०५-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बलभीम लक्ष्मणराव जाहेर पाटील, लक्ष्मण व्हिला, पांगरी रोड,शाहुनगर,बीड

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन),कार्यालय जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांचे कार्यालय यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११४७
निर्णय दिनांकः ०५-०५-२०१०

१. श्री. सय्यद जहिरोद्दीन, : अपिलार्थी
राउस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
औरंगाबाद ऊर्दू प्राथमिक शाळा, औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०७.२००९ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जाची कोणतीही दखल घेतलेली नाही, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १७.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे,त्यांच्या शाळेच्या मुख्याध्यापकांच्या मूळ सेवापुस्तकाची छायाप्रत, त्यांच्या शाळेतील शिक्षकांच्या ज्येष्ठता सूचीची प्रत, या ज्येष्ठता सूचीमध्ये इतर मागासवर्गीय जात असलेले शिक्षक आणि मागास जातीतील असणाऱ्या शिक्षकांच्या मूळ जातीची प्रमाणपत्रे व या

प्रमाणपत्राची पडताळणी केल्याचे प्रमाणपत्र आणि त्यांच्या शाळेतील शिक्षकांनी शैक्षणिक वर्षात महाराष्ट्र दर्शन सवलतीच्या देयकासंबंधी दिलेल्या संबंधितांच्या अर्जाच्या प्रती, त्या अर्जासंदर्भात मुख्याध्यापकांचे मंजूरीचे आदेश, संबंधितांच्या कुटुंबाचा तपशील, पतीपत्नीच्या सेवेच्या प्रमाणपत्राची प्रत, अशी माहिती रजिस्टर्ड टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे दि.१२.११.२००८, २८.०१.२००९, ०७.०३.२००९, १६.०५.२००९ व दि.३०.०६.२००९ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि या सुनावणीस अपिलार्थी गैरहजर राहिले आणि यापूर्वीच त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, औरंगाबाद ऊर्दू प्राथमिक शाळा, औरंगाबाद यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे मूळात प्राप्त झाला नसल्याने त्या ही माहिती अपिलार्थीस पुरवू शकल्या नाहीत. अपिलार्थीस त्या ओळखत नाहीत. त्यामुळे अपिलार्थी मूळात अस्तित्त्वात आहे किंवा कसे याबाबत त्यांनी शंका व्यक्त केली.त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीच्या अर्जासंदर्भात त्या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी पाच वेळा सुनावणी ठेवूनही अपिलार्थी एकाही सुनावणीस हजर न राहिल्याने त्यांना अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेणे शक्य झाले नाही.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा मूळ अर्ज खरोखरीच सादर केला होता किंवा कसे, याबाबत आयोग साशंक आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर,'यु.पी.सी.' असे नमूद करुन त्यावर पोस्टाची तिकीटे चिकटविली आहेत, या अर्जावर पोस्टाचा शिक्का आहे, परंतु जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे त्यांना अपिलार्थीचा हा अर्ज मूळात प्राप्त झाला नाही, हे त्यांचे विधान नाकारताही येणार नाही अथवा असत्य असल्याचे सिध्द होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये मूळात अपिलार्थी हे अस्तित्त्वात आहेत किंवा कसे हे कळण्यास कोणताही मार्ग नाही, असे म्हटले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर पाच वेळा सुनावणी ठेवूनही अपिलार्थी एकाही सुनावणीस उपस्थित झाले नाहीत, यावरुन अपिलार्थीस खरोखरीच माहितीची आवश्यकता आहे किंवा कसे, याबाबत आयोग साशंक आहे.

अपिलार्थीचे या प्रकरणातील एकूण वर्तन पाहता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये त्यांना फारसे स्वारस्य नसावे, असा निष्कर्ष काढण्यात येऊन व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद मान्य करुन अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०५-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सय्यद जहिरोद्दीन,रा.खाजानगर, गल्ली नं.१५,उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, औरंगाबाद ऊर्दू प्राथमिक शाळा,रशिदपुरा, हिनानगर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११३९

निर्णय दिनांक ०५-०५-२०१०

१ श्री. त्र्यंबक सुखदेव इंगळे, : अपिलार्थी

रा. "त्रिशरण निवास", रांजणीकर यांचे दुकानासमोर,

शिवनगर, जुना जालना, जि. जालना, पिन कोड -४३१२०३

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

प्राचार्य, आरोग्य व कुटूंब प्रशिक्षण केंद्र, सिडको, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, सिडको,

औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, सिडको, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय देताना त्यांचे म्हणणे एकून घेण्यात आले नाही, त्यांच्याकडून अवाजवी रक्कम चलनाद्वारे भरुन घेतली, जन माहिती अधिकाऱ्याने माहिती देण्याचे नाकारले, अपुरी व दिशाभूल करणारी माहिती पुरविली आणि उमेदवाराच्या लेखी परीक्षा, तोंडी मुलाखत, गट चर्चा व विषय

सादरीकरणाची मुलाखत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात आली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २१-११-२००८ च्या मुलाखत पत्रामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीचे पालन केले नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, आरोग्य व कुटूंब प्रशिक्षण केंद्र, सिडको यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातर्फे नोकर कर्मचारी भरतीकरिता दैनिक सकाळमध्ये दिनांक ७ नोव्हेंबर २००८ रोजी दिलेली जाहिरात नोकर भरती संदर्भात व्यापक व्याप्ती असलेली माहिती टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कंत्राटी वैद्यकीय अधिकारी, शाखा सदस्य, भरतीसाठी शासनाचे आदेश, भरती प्रक्रिया मार्गदर्शिका, अटी व शर्तीच्या प्रती, कार्यालयीन नस्ती, कंत्राटी पध्दतीने शाखा सदस्य भरती दिनांक २१-११-२००८ च्या भरती प्रक्रियेची कार्यवृत्तांत टिपणी व कार्यालयीन आदेशाच्या छायांकित व साक्षांकित प्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने माहितीसाठीच्या केलेल्या अर्जावर फक्त ५ रुपयांचे तिकीट लावल्याचे अपिलार्थीच्या निदर्शनास आणले आणि त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे प्रतिपृष्ठ रु. २ या प्रमाणे ३०० रु. इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने दिनांक १४-०१-२००९ रोजी जालना येथील कोषागारात त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३००/- इतके चलनाद्वारे भरले आणि त्यांच्या दिनांक १५-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे उर्वरित ५ रुपयांचे तिकीट जन माहिती अधिकारी यांना सादर केले. यानंतर दिनांक ०९-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एकूण ४३ पृष्ठांची माहिती दिली. तथापि माहिती अप्राप्त असल्याच्या कारणास्तव अपिलार्थीने

अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे परत एकूण ५० पृष्ठांची माहिती दिली. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या या पत्राने समाधान न झाल्याने व अपिलार्थीस पुरविण्यात आलेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी वाटल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०२-२००९ रोजी त्यांनी आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर, त्यांना एकूण ४३ पृष्ठांची माहिती दिली व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर दिनांक १८-०३-२००९ रोजी एकूण ५० पृष्ठांची माहिती पुरविली. या माहितीकरिता त्यांनी अपिलार्थीकडून ३००/- रु. इतके शुल्क स्वीकारले आहे. अपिलार्थीस सुरुवातीलाच एकूण ९३ पृष्ठांची माहिती का देण्यात आली नाही व माहिती दोन टप्प्यात का देण्यात आली असे जन माहिती अधिकारी यांना आयोगाने विचारले असता, जन माहिती अधिकारी आयोगाच्या या प्रश्नावर समाधानकारक खुलासा करु शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी आयोगाकडे अपील करण्यासाठी ५ कारणे उद्‌भवली असल्याचा उल्लेख केला आहे. यापैकी क्रमांक ५ ची कारणे - मुलाखत घेण्यात आली नाही, यादी बोर्डावर लावली नाही इ.- ही प्रशासकीय बाबीशी संबंधित

असल्याने व या बाबीत हस्तक्षेप करण्याची अधिकारिता आयोगास नसल्यामुळे अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जातील मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भात त्यांना माहिती अधिकाऱ्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे या मुद्यासंदर्भात दाद मागावी लागेल. अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जातील उर्वरित ४ मुद्यांपैकी अपिलार्थीचे प्रथम अपील करण्यासाठीचे म्हणणे ऐकून घेतले नाही, अवाजवी रक्कम चलनाद्वारे भरुन घेतली हे अपिलार्थीचे मुद्दे या प्रकरणी सिध्द होत आहेत. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकारी व अपिलार्थी यांना त्यांच्याकडे सुनावणीसाठी बोलावून घेऊन त्यांचे म्हणणे नोंदवून त्यावर आपला निर्णय देणे अभिप्रेत होते. तथापि असे करण्याऐवजी ते अपिलार्थीस त्यांच्या स्तरावर पत्रव्यवहार करीत राहिले, ही त्यांची कृती चुकीची आहे. येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयात बोलावून घेऊन, दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकून ते नोंदवून त्यावर आपला निर्णय अधिनियमातील कलम १९ (६) मध्ये विहित केलेल्या मुदतीत द्यावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक १५-१२-२००८ रोजी अर्ज केल्यानंतर व दिनांक १५-०१-२००९ रोजी उर्वरित ५ रुपयांचे तिकीट जोडल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती दिनांक १०-०२-२००९ रोजी सशुल्क देय होते. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०२-२००९ रोजी आवश्यक ती ४३ पृष्ठांची माहिती पुरविली आहे व तदनंतर सशुल्क माहिती देण्याची मुदत व्यपगत झाल्यानंतर दिनांक १८-०३-२००९ रोजी ५० पृष्ठांची माहिती दिली आहे. अपिलार्थीस देण्यात आलेल्या माहितीपैकी ५० पृष्ठांची माहिती ही सशुल्क माहिती देण्याची मुदत व्यपगत झाल्यानंतर दिली गेली असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक १८-०३-२००९ रोजी पुरविलेली माहिती ही विनामूल्य पुरवावी लागेल. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी एकूण २ टप्प्यामध्ये माहिती पुरविली आहे. यापैकी पहिल्या टप्प्यातील एकूण ४३ पृष्ठांच्याकरिता

लागणारे शुल्क रु. ८६ इतकेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरणे या प्रकरणी देय होत आहे. त्यामुळे अपिलार्थीस देण्यात आलेल्या माहितीपोटी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडून माहितीपोटीच्या घेतलेल्या शुल्कातून २१४/- रु. इतके त्यांना आता अपिलार्थीस परत करावे लागतील. या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दिनांक १८-०३-२००९ रोजीच्या दिलेल्या पत्रामध्ये अपिलार्थीस उर्वरित रक्कम परत करण्याचे आश्वासन देऊन आजतागायत या संदर्भात संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही केल्याचे आयोगास आढळून येत नाही. वास्तविक पाहता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी एकूण ९३ पृष्ठांची माहिती दिली असल्याने किमान ९३ पृष्ठांच्या माहितीकरिता लागणारी रक्कम वजा करता उरलेली रक्कम जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्वरित परत करावयास हवी होती. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही या प्रकरणी केल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेले माहितीपोटीचे शुल्क परत करण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणताही न दिलेला प्रतिसाद हा त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाचे द्योतक आहे, असे आयोग मानत आहे. इत:पर त्यांनी आपली अशाप्रकारची कार्यशैली बदलून आपल्या कार्यशैलीत सकारात्मक सुधारणा घडवून आणावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे व या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्याकडून माहितीपोटीचे स्वीकारलेल्या शुल्कातील उर्वरित शुल्क परत न केल्यामुळे त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना अपुरी व दिशाभूल करणारी माहिती पुरविली आणि जन माहिती अधिकाऱ्याने त्यांना माहिती देण्याचे नाकारले असे नमूद केले आहे. तथापि या संदर्भातील आवश्यक तो सबळ पुरावा त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही अथवा या संदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी ते

आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीच्या अर्जातील हे दोनही मुद्दे आयोग फेटाळून लावत आहे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती मिळाली असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले जादाचे शुल्क रु. २१४/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत मनीऑर्डरद्वारे परत करावे. (या मनीऑर्डरकरिता लागणारा खर्च जन माहिती अधिकारी यांनी स्वत: सोसावा.)
३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. त्र्यंबक सुखदेव इंगळे, रा. "त्रिशरण निवास", रांजणीकर यांचे दुकानासमोर, शिवनगर, जुना जालना, जि. जालना, पिन कोड -४३१२०३

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, सिडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, सिडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११४०

निर्णय दिनांक ०५-०५-२०१०

१ श्री. रामनाथ गणपतराव खोड, : अपिलार्थी

रा. शनि मंदीर गल्ली, बीड, ता. जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

सहायक धर्मादाय आयुक्त, बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

सहायक धर्मादाय आयुक्त, बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड

त्रयस्थ पक्ष : शनि मंदिर ट्रस्ट

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केल्यानंतर विहित मुदतीत कोणताही निर्णय न दिल्याने व सुनावणी न घेतल्याने संबंधितांवर दंडात्मक कारवाई करुन योग्य ती माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, बीड यांच्याकडे, बीड जिल्ह्यातील शनि मंदिर ट्रस्टच्या स्थापनेपासून ते दिनांक २०-०१-२००९ पर्यंतच्या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण २० मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीकरिता त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः येऊन नक्कल फीस (झेरॉक्स शुल्क) भरुन माहिती घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांच्याकडे दिनांक २५-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांना आयोगापुढे कोणताही युक्तिवाद करता आला नाही अथवा त्यांना या प्रकरणाशी संबंधित कोणतीही माहिती नसल्याचे आयोगास आढळून आले आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप, व्याप्ती व तांत्रिक बाबी लक्षात घेता अपिलार्थीच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी प्रथमतः सुनावणी घेणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय

अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रामनाथ गणपतराव खोड, रा. शनि मंदीर गल्ली, बीड, ता. जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११४१

निर्णय दिनांक ०५-०५-२०१०

१ श्री. इकबाल अहमद खाँ, अब्बास अ. खाँ., : अपिलार्थी
रा. मुमताज नगर, धार रोड, परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, शिक्षण
विभाग, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी

त्रयस्थ पक्ष : मुख्याध्यापक, सुहेब उर्दू हायस्कूल, श्री. शे. चाँद शे. अब्दुल

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून निर्णय प्रलंबित असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, नथ मॉडेल एज्युकेशन ॲन्ड वेल्फेअर सोसायटी औरंगाबाद यांनी

जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास सादर केलेल्या प्रस्तावासंदर्भात एकूण ८ मुद्यांद्वारे व्यक्तिशः माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - संस्थेचे पत्र क्रमांक ७०/२००५ दिनांक २५-१०-२००५ च्या पत्राची सत्यप्रत व संस्थेने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्रयस्थ पक्ष शेख चाँद शे. अब्दुल यांच्या वैयक्तिक मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावाची सत्यप्रत, त्रयस्थ पक्षाचा नोकरीसाठीचा अर्ज जॉयनिंग रिपोर्टसह व प्रथम प्रस्तावाची सत्यप्रत इ. अनुषंगिक माहिती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित राहिले नाहीत, उलट त्यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०८-२००९ रोजीच्या पत्राद्वारे माहिती देऊ केली असता, अपिलार्थीने ही माहिती घेण्याचे नाकारले. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ शिक्षणाधिकारी यांनी या बाबीच्या केलेल्या पंचनाम्याची प्रत त्यांनी आयोगास दाखविली. अपिलार्थीने माहिती स्वीकारण्याचे नाकारले असल्यामुळे त्यांनी नंतर दिनांक ३०-०४-२०१० रोजी अपिलार्थीस साध्या पोस्टाने माहिती पाठविली असल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येत आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ८ मुद्यांद्वारे माहिती मागितल्याचे दर्शविले आहे. यापैकी दोन मुद्यांवरील माहिती त्यांनी अर्जाच्या मूळ प्रतीत नमूद केली असून, उर्वरित ६ मुद्दे त्यांनी एका कोऱ्या कागदावर लिहून त्याची प्रत त्यांच्या प्रथम अर्जाच्या प्रतीसोबत जोडलेली आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या त्यांच्या अर्जामध्ये उर्वरित ६ मुद्यांचा समावेश नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून आले आहे. या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेली माहिती ही अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ केलेल्या माहितीमध्ये त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित ६ मुद्यांवरील माहितीचा समावेश नाही. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीच्या अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीमध्ये या ६ मुद्यांचा समावेश आहे किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही किंवा या संदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी प्रथमतः अपिलार्थीच्या माहिसाठीच्या मूळ अर्जासोबत जोडलेल्या पुरवणीचा शोध घेऊन अपिलार्थीस उर्वरित ६ मुद्यांवरील माहिती, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वरील कालावधीत कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधितांच्याकडून व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित ६ मुद्यांवरील पुरवणी त्यांनी जर

जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात सादरच केली नसेल तर ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या माहिसाठीच्या मूळ अर्जासोबत जोडलेल्या पुरवणीच्या उपलब्धतेच्या आधीन राहून अपिलार्थीस उर्वरित ६ मुद्यांवरील माहिती, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. इकबाल अहमद खाँ अब्बास अ. खाँ., रा. मुमताज नगर, धार रोड, परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११४२

निर्णय दिनांक ०५-०५-२०१०

१ श्री. गोवर्धन उत्तमराव कोल्हे, : अपिलार्थी

रा. म्हाडा कॉलनी, घर नं. २१, रेल्वे स्टेशन रोड, मल्टीपर्पज

हायस्कूलच्या पाठीमागे, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

अतिरिक्त जिल्हाधिकारी, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २५-०३-२००९ रोजीच्या अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण ३ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या

कार्यालयाच्या दिनांक ०१-०२-२००९ ते ०४-०३-२००९ या कालावधीच्या जावक रजिस्टरच्या छायांकित प्रती, दिनांक ०१-१०-२००८ ते ०३-०३-२००९ या कालावधीतील जिल्हा वार्षिक योजना, २००८-०९ अंतर्गत वार्षिक योजना पर्यटन व ग्रामीण तिर्थक्षेत्र योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता व निधी वितरीत आदेशाच्या प्रती आणि सन २००८-०९ पर्यटन व वार्षिक योजनेअंतर्गत तिर्थक्षेत्राच्या विकासासाठीच्या मंजूर निधीचे तालुकावाईज व गाववाईज वाटप - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडे दिनांक २९-०४-२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०५-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिल्याचा पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध आहे काय असे आयोगाने विचारले असता, अपिलार्थीने त्यांच्याकडे अशाप्रकारचा कोणताही पुरावा उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले.

अपिलार्थीने पुढे असाही युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून तालुकानिहाय व विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे आयोगाने आदेशित करावे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे. तथापि माहिती प्राप्त करुन घेताना अपिलार्थीने ही माहिती प्राप्त झाल्या-पृष्ठ्यर्थ त्यांच्याकडील कागदपत्रावर स्वाक्षरी केली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ते ही माहिती अपिलार्थीस कधीही देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २५-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती देणे त्यांना अधिनियमातील कलम ७ (१) मधील तरतुदीनुसार अनिवार्य आहे. याचबरोबर येथे असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केलेली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर या अर्जाच्यासंदर्भात पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे अशाप्रकारचे उत्तरदायित्व पार पाडल्याचा कोणताही सबळ पुरावा आयोगास सादर केलेला नाही व तसा तो त्यांच्याकडे उपलब्धही नाही. त्यामुळे अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती सशुल्क प्राप्त करुन घेणे भाग आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरील युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार आहे. ही माहिती ते अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत देण्यास तयार आहेत. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे

आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, त्यांनी वरील कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून ही माहिती संबंधितांच्यांकडून सशुल्क उपलब्ध करुन घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत सशुल्क व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गोवर्धन उत्तमराव कोल्हे, रा. म्हाडा कॉलनी, घर नं. २१, रेल्वे स्टेशन रोड, मल्टीपर्पज हायस्कूलच्या पाठीमागे, जालना

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, जालना यांना या निकाल-

पत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११४८

निर्णय दिनांक ०५-०५-२०१०

१ श्री. दापकेकर हरिनारायण रामचंद्र, : अपिलार्थी
एन. ७, ए ११५, आय/१४/०१, शास्त्रीनगर, सिडको,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा विशेष भूसंपादन अधिकारी (लसिका), नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विशेष भूसंपादन अधिकारी (लसिका), नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : अव्वल कारकून, कार्यालय विशेष भूसंपादन अधिकारी (लसिका), नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या दिनांक १०-१०-२००८ च्या

नोटीसीच्या संदर्भात एकूण पाच मुद्दयाव्दारे सन २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

' १. **नोटीस**-आपले पत्र जा. नं. १९९७/विभूसंअ/लसीका/सीआर-३ दि. १०/१०/२००८ हे पत्र प्रत्यक्षात जावक रजिष्टरला नोंद केल्यानंतर प्रतक्षात किती दिवसांनी पोष्टात टाकले आहे त्याचा दिनांक कळविण्यात यावा.

२. **सदर** आपण पाठविलेली नोटीस मला मिळाली आहे हे ज्या पुराव्यावरुन गृहीत धरले आहे, त्या पुराव्याची नक्कल मला देण्यात यावी.

३. **कोणतेही** कायदेशीर नोटीस संबंधीतांस वेळेवर मिळाली आहे याची शहानिशा झाल्यानंतर तो संबंधीत व्यक्ती हजर न झाल्यास एकतर्फी पुढील कार्यवाही करणेचा नियम व प्रथा आहे त्याप्रमाणे मला नोटीस वेळेवर मिळाली आहे याची शहानिशा झाली असे ज्यावरुन आपण ठरविले त्या पुराव्याची प्रमाणीत नक्कल देण्यात यावी.

४. मी हजर नसताना आपण जो निकाल दिला आहे, तो ज्या पुराव्याच्या आधारे दिला आहे, ते पुरावे व निकालाची एक प्रमाणीत प्रत देण्यात यावी.

५. माझे विरुध्द असधारे प्रतिवादी यांनी आपणाकडे दिनांक २४/१०/०८ रोजी सादर केलेले पुरावे, व त्यांचे म्हणने आपण लिखीत स्वरुपात नोंदविले आहे का ? असल्यास त्याची प्रत्येकी एक प्रत देण्यात यावी व नसल्यास तसे कळवावे.

५. माझा औरंगाबाद येथील राहाणेचा पत्ता (पोष्टल अर्डेस) आपण कश्यावरुन घेतला आहे, म्हणजेच आपल्या कार्यालयात उपलब्ध असलेला माझा पत्ता जो आहे त्याची एक प्रमाणीत झेरॉक्स देण्यात यावी. '

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पीड पोस्टाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्रोटक स्वरुपात काही माहिती पुरविली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार परत जन अपिलीय अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी (लसिका), नांदेड यांच्याकडे दिनांक ०२-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेतला असता आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीने त्यांचा दिनांक १२-१२-२००८ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज आणि त्यावरील दिनांक ०२-०२-२००९ रोजीचा प्रथम अपील अर्ज विशेष भूसंपादन अधिकारी (लसिका), नांदेड यांना उद्देशून केला आहे. विशेष भूसंपादन अधिकारी (लसिका), नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीचे प्रथम अपील विनाकार्यवाही तसेच ठेऊन घेतले व परिणामी अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिले. अपिलार्थीने या प्रकरणी मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी (लसिका), नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमत: निर्णय घेणे आयोगास आवश्यक वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी (लसिका), नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०२-२००९ रोजीच्या प्रथम

अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत ते राज्य माहिती आयोगाकडे अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी (लसिका), नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दापकेकर हरिनारायण रामचंद्र, एन. ७, ए ११५, आय/१४/०१, शास्त्रीनगर, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, कार्यालय विशेष भूसंपादन अधिकारी (लसिका), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी (लसिका), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११४९

निर्णय दिनांक ०५-०५-२०१०

१ श्री. कांबळे गुरुदत्त पुंडलिक, : अपिलार्थी
सुभेदार रामजीनगर, नगरपरिषद शाळा क्रमांक २३ समोर,
लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हा समादेशक, होमगार्ड कार्यालय, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा समादेशक, होमगार्ड कार्यालय, लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रशासिक अधिकारी, जिल्हा समादेशक, होमगार्ड कार्यालय, लातूर

जन अपिलीय अधिकारी : जिल्हा समादेशक, होमगार्ड, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली असल्यामुळे व सत्य माहिती दडविली असल्यामुळे, त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार शास्ती लावावी आणि अपिलार्थीस सत्य माहिती देण्यासाठी

त्यांना सूचित करावे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा प्रशासिक अधिकारी, जिल्हा समादेशक, होमगार्ड कार्यालय, लातूर यांच्याकडे, होमगार्ड वर्धापनदिन जादा कवायतीसंदर्भात सन २००८ या कालावधीशी संबंधित, काही माहिती एकूण सात मुद्दयाव्दारे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०४-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व ती अर्धवट आणि चुकीची असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०६-२००९ रोजीच्या पत्राव्दारे निर्णय देऊन, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती, या माहितीची कार्यालयीन अभिलेख्याशी तुलना करुन तपासणी केली असता ती बरोबर व सत्य असल्याचे अपिलार्थीस कळविले आणि जन माहिती अधिकारी यांच्या भूमिकेशी सहमती दर्शविली. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या पत्राने समाधान न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत सत्य माहिती पुरविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीची कार्यालयीन अभिलेख्यावरुन पडताळणी केली असता, त्यांना अपिलार्थीस पुरविलेली माहिती बरोबर असल्याचे आढळून आलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली असल्याने व्दितीय अपील केल्याचे नमूद केले आहे, तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती ही चुकीची कशी आहे याचे कोणतेही स्पष्टीकरण त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये दिलेले नाही अथवा यासंदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. आयोगाकडे केलेल्या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी मूळ माहिती नष्ट करुन सत्य माहिती दडविली आहे, तथापि या त्यांच्या विधानापुष्ट्यर्थ त्यांनी आयोगाकडे कोणताही सबळ पुरावा सादर केलेला नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप आणि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेली माहिती यांची तुलना करता, आयोगास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती सकृतदर्शनी अपिलार्थीच्या मागणीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आढळून आले आहे, त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील सबळ पुराव्याअभावी फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कांबळे गुरुदत्त पुंडलिक, सुभेदार रामजीनगर, नगरपरिषद शाळा क्रमांक २३ समोर, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासिक अधिकारी, जिल्हा समादेशक, होमगार्ड कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समादेशक, होमगार्ड, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५११

निर्णय दिनांक ०५-०५-२०१०

१ श्री. उध्दव रंगनाथराव रासकर, : अपिलार्थी
व्दारा ' विशाल ', खोसे निवास, डॉ. गिरी हॉस्पिटलमागे,
आदर्शनगर, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, नुतन कोळेश्वर विद्यामंदिर, कोळगांव,
तालुका गेवराई, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना दंडीत करण्याची व जन अपिलीय अधिकारी यांनी जाणीवपूर्वक त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देण्यासाठी उशीर लावल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या शाळेशी संबंधित सन १९८४ ते १९९८ या कालावधीतील वेगवेगळ्या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण आठ मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सन १९८४ ते ८७ या शैक्षणिक वर्षातील पाचवी ते दहावी या वर्गाच्या विद्यार्थ्यांची यादी, सन १९८४ ते १९९० पर्यंत कार्यरत असलेल्या शिक्षकांची यादी, त्यांच्या संस्थेला ऑर्डर व शिक्षण विभागाने दिलेले अप्रूव्हल, या कालावधीमध्ये शाळा कुठे भरत होती, सदर जागा मालकाचे नाव, त्यांना भाड्यापोटी दिलेली रक्कम, या कालावधीमध्ये कार्यरत असलेले मुख्याध्यापक यांची ऑर्डर व अप्रूव्हल, या कालावधीत शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाची रक्कम, सन १९९८ या वर्षाच्या शिक्षकांच्या हजेरीपटाची सत्यप्रत, सदर शाळा संस्था चालकाच्या मालकीच्या जागेत कधी आली, शाळा स्थलांतर करण्यास परवानगी घेतली होती का, घेतली असल्यास परवानगीचे पत्र - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०९-२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी त्यांच्या वकिलासह हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या-कडे ही माहिती त्रास देण्याच्या उद्देशाने मागितली असून, अपिलार्थी हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीचा दुरुपयोग करुन वारंवार त्यांच्या व तसेच इतर शैक्षणिक संस्थांकडे अशा प्रकारची जुन्या काळातील विस्तृत व्याप्तीची माहिती मागवून संबंधित संस्थांना वेठीस धरत असतात व त्यांच्याकडून नियमितपणे पैशाची मागणी करत असतात. अपिलार्थीने या प्रकरणी मागणी केलेली माहिती ही जुन्या काळातील असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांना वेळ लागणार आहे, तथापि आज अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने मा. उच्च न्यायालयामध्ये या संस्थेविरुध्द दोन रिट अर्ज दाखल केले असून या रिट अर्जाशी संबंधित कागदपत्रे तयार करण्यासाठी त्यांना कालावधी लागल्यामुळे, ते अपिलार्थीस ही माहिती वेळेत पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या वकिलांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार द्यावी लागेल. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीप्रमाणे त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गीमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्तीची व शिस्तभंगाची कारवाई करण्याची विनंती आयोगास केली आहे.

यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न पूरवून, त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० (२) मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब, अध्यक्ष, बालाजी व्यंकटेश शिक्षण प्रसारक मंडळ, परभणी यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची अधिकारिता आयोगास नसल्यामुळे, अपिलार्थीची जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची विनंती आयोग अमान्य करत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत स्पीड पोस्टाव्दारे विनामूल्य पुरवावी.

३. अध्यक्ष, बालाजी व्यंकटेश शिक्षण प्रसारक मंडळ, परभणी यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. उध्दव रंगनाथराव रासकर, व्दारा ' विशाल ', खोसे निवास, डॉ. गिरी हॉस्पिटल-मागे, आदर्शनगर, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नुतन कोळेश्वर विद्यामंदिर, कोळगांव, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अध्यक्ष, बालाजी व्यंकटेश शिक्षण प्रसारक मंडळ, परभणी, शिवाजी चौक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२८९

निर्णय दिनांक ०५-०५-२०१०

१ श्री. विजय सितारामपंत खारकर, : अपिलार्थी
१८, ' पितृकृपा ', आदर्शनगर, सेलू, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे, मानवत नगरपरिषदेच्या संदर्भात नगरपरिषदेस शासनाकडून मिळालेल्या सर्व प्रकारच्या निधीची सविस्तर माहिती, जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रशासकीय

मान्यता दिलेल्या रकमेची माहिती, अंदाजपत्रकातील दरापेक्षा जास्त दराच्या निविदा, जादा दराने स्वीकारल्यामुळे नगरपरिषदने अदा केलेल्या जादा रकमेची माहिती व अंदाजपत्रकातील प्रशासकीय आदेशानुसार कामे न करता दहा टक्के कमी कामे करुन १०० टक्के बिले अदा केलेल्या रकमेची माहिती, अशी माहिती विचारली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन २००१ ते २००८ असा होता.

अपिलार्थीस ही माहिती जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १०-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे ते प्राधिकरण आणि या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी हे आयुक्त कार्यालयाशी संबंधित नसल्यामुळे, त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, जिल्हा परभणी व अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २०-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पाठवून दिला व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. परंतु यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी, आणि मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत हजर आहेत.

या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी हे तत्कालीन मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत हे आहेत. त्यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही आठ वर्षांशी संबंधित असल्यामुळे, ही माहिती काढण्यासाठी त्यांना वेळ लागला व त्यांनी अपिलार्थीस

संपूर्ण माहिती त्यांच्या दिनांक १८-०३-२००९ रोजीच्या पत्राव्दारे पोस्टाने विनामूल्य अपिलार्थीस पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मूळात त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यावरील प्रथम अपील हे चुकीच्या प्राधिकरणाकडे केले होते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती ही व्यापक स्वरुपाची व मोठी अशी होती. अपिलार्थीस आता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज केल्यानंतर दिनांक १८-०३-२००९ रोजी आवश्यक ती माहिती टपालाव्दारे विनामूल्य पुरविली असल्यामुळे आणि अपिलार्थीस त्यांनी पुरविलेली माहिती ही सकृतदर्शनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्यामुळे आणि प्राप्त माहितीवर अपिलार्थीचे आजतागायत कोणतेही अभिप्राय आयोगास प्राप्त झाले नसल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विजय सितारामपंत खारकर, १८, ' पितृकृपा ' आदर्शनगर, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२९०

निर्णय दिनांक ०५-०५-२०१०

१ श्री. निळकंठ भिवनाजी राऊत, : अपिलार्थी
रा. तळणी, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
गट विकास अधिकारी, कार्यालय पंचायत समिती, हदगांव,
तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
गट विकास अधिकारी कार्यालय, पंचायत समिती, हदगांव,
तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी ठेवली असता, सुनावणीसाठी जाणुनबुजून उशिरा पत्र पाठविल्यामुळे आणि त्यांना अपूर्ण माहिती दिली असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे आणि आपल्या मूळ माहितीची मागणी या अपील अर्जाव्दारे कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

' मी दि १८-९-०७ रोजी सोबत जोडलेल्या नमुन्याचे दोन तक्रारी अर्ज दिले होते. त्या अर्जात नमुद मुद्दयांच्या अनुषंगाने बी. डी. ओ. साहेबांनी चौकशी व कार्यवाही केली आहे का ? अतिक्रमणास जबाबदार किवा प्रवृत्त करणारा कोण आहे ? तो जर आपला कर्मचारी असेल तर त्याच्या विरोधात कोणती कार्यवाही केली कि केली जाईल ? वरील सर्व मुद्दयांसह सोबत जोडलेल्या अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या चौकशी व कार्यवाही अहवालाची प्रत देण्यात यावी. '

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतलेला आहे)

तथापि ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव यांच्याकडे यासंदर्भात प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २०-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीतील, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०९-२००७ रोजी केलेल्या दोन तक्रार अर्जावर गट विकास अधिका-याने केलेली कार्यवाही व चौकशी केली असल्यास चौकशी अहवालाची प्रत, या व्यतिरिक्त कोणतीही माहिती जन माहिती अधिका-याकडून देय होत नाही. कारण अपिलार्थीने उर्वरित मुद्दयांव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी व त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अपेक्षित करणारी माहिती विचारली आहे. अशा प्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी कलम २ (च) मधील " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र अपिलार्थीने गट विकास अधिका-याकडे दिनांक १८-०९-२००७ रोजी केलेल्या दोन तक्रार अर्जावर गट विकास अधिका-याने केलेली कार्यवाही, ही माहिती अपिलार्थीस गट विकास अधिका-याकडून देय होत आहे. यासंदर्भात गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १८-०९-२००७ रोजीच्या दोन तक्रार अर्जावर, तक्रार अर्जामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयासंदर्भात ज्या वेगवेगळया प्राधिकरणाशी दिनांक २०-१२-२००७ पर्यंत पत्रव्यवहार केला आहे, या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती आणि अपिलार्थीने त्यांच्या तक्रार अर्जामध्ये नमूद केलेल्या विषयाशी संबंधित अभिलेख्यावर त्यांनी त्यांच्या कार्यालयात दिनांक २०-१२-२००७ पर्यंत केलेल्या टिपणीच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस पुरवाव्यात, जेणेकरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १८-०९-२००७ रोजीच्या केलेल्या तक्रार अर्जावर गट विकास अधिका-याने केलेली कार्यवाही ज्ञात होईल. ही माहिती गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना पुढे आदेशित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन, त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभाव स्पष्ट केला आहे व त्यांनी त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव यांच्यावर

प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच दहा दिवसाच्या आत रजिस्टर्ड टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. निळकंठ भिवनाजी राऊत, रा. तळणी, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी, गट विकास अधिकारी, कार्यालय पंचायत समिती, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, गट विकास अधिकारी कार्यालय, पंचायत समिती, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११५४
निर्णय दिनांकः ०६-०५-२०१०

१. श्रीमती पटवारी शाहेदाबी सय्यदपाशा, : अपिलार्थी
रा.लोहारा,जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्राथमिक आरोग्य वैद्यकीय अधिकारी,
प्राथमिक आरोग्य केंद्र, लोहारा, जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : वैद्यकीय अधिकारी,
प्राथमिक आरोग्य केंद्र, लोहारा, जि. उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली असल्याने आणि दिलेली माहिती सत्यप्रतीमध्ये न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीच्या सत्यस्वरुपातील प्रतीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २०.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण तीन मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - प्राथमिक आरोग्य केंद्र लोहारा येथील शौचालयाच्या बांधकामावर डागडुजी, साफसफाई,बांधकाम परिसर सुशोभिकरण,बागेमध्ये झाडे लावणे आदी कामाच्या मंजूरीसाठी बैठक झाली, त्या बैठकीच्या प्रोसिडींगची सत्यप्रत, बांधकामास व इतर कामासाठी शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान, त्यांच्या पासबुकाची छायाप्रत व ही कामे करण्यासाठी स्थानिक वर्तमानपत्रामधून निविदा दिल्या असल्यास त्या दैनिकातील निविदेच्या छायाप्रती आणि दिनांक - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे यासंदर्भात दि. ०५.०२.२००९ रोजी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.०३.२००९ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ३१.०३.२००९ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २८.०३.२००९ रोजी माहिती दिली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन आणि त्यांच्या अपेक्षेप्रमाणे ती सत्यप्रतीच्या स्वरुपात दिली नसल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. २८.०३.२००९ रोजी त्यांना अपेक्षित असलेली माहिती पुरविली असून त्याप्रित्यर्थ अपिलार्थीची पोचसही त्यांनी आयोगास सादर केली. यामध्ये अपिलार्थीने त्यांना अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहितीचा या माहितीमध्ये समावेश नव्हता. कारण त्यांच्या पूर्वीच्या अधिकाऱ्याने प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये विविध कामे करुन घेत असताना वर्तमानपत्रामध्ये नोटीसद्वारे जाहीर निविदा काढल्या नव्हत्या.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना भाग आहे. असे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे आयोगाने अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती मुद्देनिहाय दिल्याचे आयोगास आढळून आले नाही. तसेच अपिलार्थीस पुरविलेल्या या माहितीमध्ये त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस दिली नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. जर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रातील काही कामांकरिता वर्तमानत्राद्वारे निविदा प्रसिध्द केल्या नसतील तर त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ च्या संदर्भात तसे अपिलार्थीस कळवावयास हवे होते, तथापि या प्रकरणी त्यांनी अशाप्रकारची कृती अपिलार्थीस दि.२८.०३.२००९ रोजी व्यक्तिशः माहिती देताना केलेली नाही. त्यामुळे अपिलार्थीचा, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याचा मुद्दा, येथे सिध्द होत आहे. त्याचबरोबर अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दि. २०.१२.२००८

रोजीच्या अर्जाचे अवलोकन केले असता, यामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात साक्षांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती मागितलेली असल्याचे आयोगास आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून सत्यप्रतींच्या स्वरुपात ही माहिती उपलब्ध होऊ शकणार नाही.

वरील वस्तुस्थिती पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीच्या निदर्शनास, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत वेगळया पत्राद्वारे आणावी.

वरील वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०६-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती पटवारी शाहेदाबी सय्यदपाशा,मु.पो.ता.लोहारा,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,प्राथमिक आरोग्य केंद्र, लोहारा, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११५५
निर्णय दिनांकः ०६-०५-२०१०

१. श्री. विलास दौलतराव आहेर, : अपिलार्थी
रा.परभणी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कुलसचिव,
कार्यालय पशु व मत्स्य विज्ञान, नागपूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कुलसचिव,
कार्यालय पशु व मत्स्य विज्ञान, नागपूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कुलसचिव,
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,
नागपूर.

जन अपिलीय अधिकारी : अधिष्ठाता,
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,
नागपूर.

### निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती त्यांच्या अपेक्षेप्रमाणे न देता ती अपूर्ण देऊन माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली आहे. तसेच मुद्दा क्र.५ ची माहिती तयार केली नाही, असे सांगितले आहे. त्यामुळे माहिती अधिकाऱ्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य ती कारवाई

करावी आणि त्यांना मुद्दा क्र. ४ व ५ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देण्याचे आदेशित करावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या विद्यापीठाच्या दि. ०५.०२.२००७ रोजीच्या जाहीरातीला अनुसरुन विद्यापीठाने प्राध्यापक, शल्य चिकित्साशास्त्र या पदाच्या नेमणूकीसाठी दि. २३.०२.२००८ रोजी घेतलेल्या मुलाखतीसंदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. यापैकी मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०१.०४.२००८ रोजी व मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती दि. २१.०४.२००८ रोजी व्यक्तिशः दिली. मुद्दा क्र. ४ व ५ च्या संदर्भात माहिती देण्याचे त्यांनी अपिलार्थीस, ही माहिती उघड केल्याने व्यापक जनहित साध्य होत नसल्याचे त्यांना वाटल्यावरुन, नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दि. २४.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०५.२००८ रोजी सुनावणी घेतली. या सुनावणीमध्ये त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ व ५ वर त्यांचे अभिप्राय व्यक्त केले परंतु कोणताही विशिष्ट निर्णय दिला नाही. परिणामी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ व ५ शी संबंधित माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहयोगी प्राध्यापक उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ व ५ शी संबंधित माहितीची त्यांना आवश्यकता असल्याचे आयोगास अवगत केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ द्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती मूळात विद्यापीठाकडे उपलब्ध नसल्याने व ती अस्तित्त्वात नसल्याने ते अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५ शी संबंधित माहिती देऊ शकले नाहीत.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या मुलाखतीसाठी उपस्थित राहिलेल्या उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांची यादी उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस 'निवड समितीच्या सदस्यांनी प्रत्येक उमेदवारास दिलेल्या वैयक्तिक गुणांची मूळ प्रत' अपेक्षित असल्याचे दिसून येते. ही माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यासाठी कोणतीही हरकत असू नये, तथापि ही माहिती, त्यांना संबंधित परिक्षक व विद्यापीठ यांच्यामधील विश्वासाश्रित संबंधातून प्राप्त झाली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम १० च्या तरतुदीच्या आधारे असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने संदर्भित केलेल्या मुलाखतीमध्ये निवड समितीच्या प्रत्येक सदस्याने दिलेल्या गुणपत्रिकेमधील सदस्याचे नाव,पदनाम, स्वाक्षरी व अन्य असा, कोणताही स्त्रोत की, ज्याद्वारे सदस्याशी संबंधित इतर माहिती उघड होऊ शकेल, अशी माहिती वगळून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात संदर्भित केलेल्या मुलाखतीमध्ये सर्व समिती सदस्यांनी प्रत्येक विद्यार्थ्यास दिलेल्या मूळ गुणपत्रिकेची छायांकित प्रत अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. निवड समितीतील

सदस्यांच्या स्वाक्षरीचा या माहितीमध्ये समावेश असणार नाही, याची दक्षता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देताना घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०६-०५-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विलास दौलतराव आहेर,गजानननगर, कारेगाव रोड,परभणी-४३१ ४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव,महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,सेमीनरी हिल्स, नागपूर-४४० ००६ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता,महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमीनरी हिल्स, नागपूर-४४० ००६ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११५६
निर्णय दिनांक: ०६-०५-२०१०

१. श्री. गफार खान खाजा खान, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय,औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : प्रादेशिक परिवहन अधिकारी,
औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०७.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो कोणतीही माहिती न दिल्यामुळे व त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १२.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या मोटार वाहन क्र. एमएच-२० एए ७४१७ या वाहनाच्या हस्तांतरणाबाबत काही माहिती खालीलप्रमाणे व्यक्तिशः मागितली होती.

"मोटार वाहन क्र. MH-२०.AA ७४१७ या वाहानचे बाबत ३०/९/०४ रोजी देण्यात आलेल्या पत्राचे अनुषंगाने दिवाणी दावा ९६९१/०४ हा प्रलबीत असताना नमुद गाडीचे हस्तांतरण का करण्यात आले त्यांचे संबधीत सर्व कागदपत्र (२००४ ते २००६)"

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन २००४ ते २००६ असा होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दि. १५.०६.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी त्यांच्या युक्तिवादामध्ये कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. सदर माहिती प्रश्नांकित स्वरुपात विचारली असून अपिलार्थीने विचारलेल्या माहितीशी संबंधित प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच या हस्तांतरण व न्यायालयीन प्रकरणातील नेमक्या कोणत्या कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता आहे, याचा उल्लेख अपिलार्थीने स्पष्टपणे केलेला नाही. अपिलार्थीपासून माहिती दडविण्याचा त्यांचा कोणताही उद्देश नव्हता.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचा दिवाणी दावा प्रलंबित असताना त्यांच्या गाडीचे हस्तांतरण का करण्यात आले, यासंदर्भात सन २००४ ते २००६ या कालावधीतील सर्व कागदपत्रे अशी माहिती मागविली आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी तयार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. आज रोजी सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या प्रकरणाशी संबंधित अभिलेखाच्या सर्व कागदपत्राच्या प्रती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवाव्यात.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०६-०५-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गफार खान खाजा खान,रा.खोकडपुरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११५७
निर्णय दिनांकः ०६-०५-२०१०

१. श्री. गजभारे बबन नागोराव, : अपिलार्थी
रा.भिमघाट, नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड

त्रयस्थ पक्ष : मे.के.टी.कन्स्ट्रक्शन

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास कोणतीही विशिष्ट प्रकारची विनंती न करता त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागणी करणारा जो अर्ज केला होता, त्या अर्जाचाी झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे. यावरुन अपिलार्थीने या अपील अर्जाद्वारे आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचा निष्कर्ष काढण्यास हरकत नसावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १२.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील मे. के.टी.कंस्ट्रक्शन कंपनीतर्फे चालविण्यात येणाऱ्या नांदेड जिल्हयातील हादगाव, कहाळा, चोंडी व विजयनगर बिलोली येथील टोलनाक्यासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शासन व गुत्तेदार यांच्यामध्ये रस्त्याच्या देखभालीसाठी तयार करण्यात आलेली नियमावली, नियमावलीचा तपशील व दरवर्षी शासन व गुत्तेदार यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार केलेल्या संयुक्त वाहन गणती करुन कालावधीसंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा तपशील - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी, ठेकेदारी निश्चित झाल्यापासून ते अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करेपर्यंत, असा होता.

अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. १२.०१.२००९ रोजी प्राप्त झाला. या अर्जास उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बिलोली यांनी दि. १८.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयातर्फे तयार करण्याचे काम चालू असून माहिती संकलीत होताच अपिलार्थीस कळविण्यात येईल, असे कळविले. यानंतर उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी अपिलार्थीस दि. २४.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी न केलेली माहिती पुरविली. या सर्व प्रकाराने व्यथित होऊन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांच्याकडे यासंदर्भात दि. ०३.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०३.२००९ रोजी निर्णय देऊन आपले आदेश दि. ०२.०४.२००९ रोजी पारित केले. या निर्णयाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन अपिलार्थीस आठ दिवसाचे आत माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ०३.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे टपालाने माहिती पुरविली. तथापि अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील केले असल्याच्या कारणास्तव ही माहिती स्वीकारण्याचे नाकारले आणि वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना प्रथमतः खोटी माहती पुरविल्याने आणि जन अपिलीय अधिकारी यांनी विहित केलेल्या कालमर्यादेत जन माहिती अधिकाऱ्याने त्यांना माहिती न पुरविल्याने त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई व्हावी व अपिलार्थीस विनामूल्य माहिती प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्यावेळी पूर्ण झाली होती, त्यावेळी ती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले होते. तथापि अपिलार्थी ही माहिती घेऊन गेले नसल्याने त्यांनी शेवटी अपिलार्थीस ही माहिती दि.०३.०६.२००९ रोजी टपालाने पाठविली, परंतु अपिलार्थीने ही माहिती स्वीकारली नाही. अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांनी कधीही टाळले नाही.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही फारशी स्पष्ट नाही. त्याचबरोबर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेला प्रतिसादही चुकीचा आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयात उपलब्ध नव्हती तर त्यांच्या कार्यालयाच्या जन माहिती अधिकाऱ्याने अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीच्या

माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत, सदर माहिती ज्या कार्यकारी अभियंता/उपअभियंता यांच्याकडे उपलब्ध आहे, त्यांना पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे या प्रकरणी अधिनियमातील तरतुदींच्या दृष्टीने उचित राहिले असते, परंतु संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही आणि अपिलार्थीस वेगवेगळया माहिती अधिकाऱ्याने दि. १८.०२.२००९ व २४.०२.२००९ रोजी वेगवेगळा प्रतिसाद देऊन अपिलार्थीस गोंधळात टाकले. यानंतर अपिलार्थीच्या दि. ०३.०३.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०३.२००९ रोजी अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले परंतु हा निर्णय देताना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती तयार असल्याचे पत्र प्रथमतः पाठवावे, असे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय चुकीचा आहे. कारण मूळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाने माहिती मागितली असता अपिलार्थीस माहिती तयार असल्याचे पत्र पाठविणे आणि नंतर अपिलार्थी ही माहिती त्यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून घेऊन जाण्याची अपेक्षा करणे ही जन अपिलीय अधिकारी यांची अपेक्षा या प्रकरणी सर्वस्वी चुकीची आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देताना अपिलार्थीने ज्या माध्यमाद्वारे (व्यक्तिशः/टपालाद्वारे) त्यांच्या मूळ अर्जात माहिती मागितली आहे, त्या माध्यमाद्वारे अपिलार्थीस माहिती देण्याच्या जन माहिती अधिकारी यांना सूचना देणे उचित राहिले असते. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा निर्णयामुळे अपिलार्थीस वेळेत माहिती तर मिळाली नाहीच, परंतु ती प्राप्त होण्यास विलंब मात्र जरुर लागला. यानंतर जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दि. ०३.०६.२००९ रोजीच्या टपालाद्वारे पूर्ण माहिती पुरविली. तथापि अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील केल्याचे कारणास्तव माहिती स्वीकारण्याचे नाकारले, ही अपिलार्थीकडून झालेली चूक आहे. अशाप्रकारे या प्रकरणी प्रत्येक टप्प्यावर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांच्याकडून काही ना काही अनियमितता झाली असल्याचे आढळून

येत आहे. आता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्यासोबत आणली असून ते ही माहिती अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत देण्यास तयार आहेत. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास्तव एकदा टपालाचा खर्च केला असल्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी विचाराधीन प्रकरणी त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी उपस्थित राहून ती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधितांकडून विनामूल्य हस्तगत करावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज पहिल्या टप्प्यापासून ते अपिलार्थीस अंतिमतः माहिती देण्यापर्यंत चुकीच्या पध्दतीने हाताळल्यामुळे आणि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरवून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे.सबब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. पाटील, सहायक कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, लोहा या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. पाटील, सहायक कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, लोहा या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०६-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गजभारे बबन नागोराव,रा.भिमघाट,मिल एरिया, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११५८
निर्णय दिनांकः ०६-०५-२०१०

१. श्री. पांडुरंग नागोबा भंडारे, : अपिलार्थी
रा. साराळा, ता.पालम, जि.परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पालम, जि.परभणी

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी
प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.),
जिल्हा परिषद, परभणी

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो मिळाली नसल्यामुळे ही माहिती देण्यासाठी त्यांना आदेशित करावे व त्यांच्यावर अधिनियमानुसार दंड आकारणी करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १९.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील शिरपूर, कुर्लेवाडी, कापसी, उमरथडी व सायाळा (पा) या गावामधील दारिद्रयरेषेखालील सन २०००-२००९ या कालावधीतील घरकुल लाभार्थ्यांची

गावनिहाय यादी, अशी माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड टपालाद्वारे मागितली असून या अर्जामध्ये त्यांनी, ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १७.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती या पत्राद्वारे दि. २२.०२.२००९ रोजी टपालाने पाठविली. तथापि ही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दि. ०९.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.०५.२००९ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. सदर निर्णय अपिलार्थीस दि. २३.०६.२००९ रोजी प्रत्यक्षात प्राप्त झाला, तथापि त्यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले होते.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती दि. १७.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे यु.पी.सी.ने पाठविली. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी आवश्यक तो पुरावा आयोगास सादर केला आहे.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे

जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी ती अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १७.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे विनामूल्य व युपीसी द्वारे पाठविली आहे. तथापि ही माहिती अपिलार्थीस अद्यापपावेतो प्राप्त झाली नसल्याचे आढळून आले आहे. आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीची अतिरिक्त प्रत विनामूल्य हस्तांतरित केली. हे पाहता, अपिलार्थीस अपेक्षित माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळ्याने विचार करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०६-०५-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पांडुरंग नागोबा भंडारे,रा. साराळा,पो. केरवाडी, ता.पालम, जि.परभणी-४३१ ७२०

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.),जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११५०

निर्णय दिनांक ०६-०५-२०१०

१ श्री. उत्तम श्रीपतराव थोरात, : अपिलार्थी
मु. पो. ढोरकीन, ता. पैठण, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी, जायकवाडी (उत्तर), पैठण,
जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषी अधिकारी, नाथनगर (उत्तर), पैठण,
जि. औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मंडळ कृषी अधिकारी , ढोरकीन, ता. पैठण, जि. औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, पैठण, जि. औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती देण्यापासून जाणिवपूर्वक वंचित ठेवले, दिनांक २०-०५-२००९ रोजीच्या सुनावणीस अपिलार्थी गैरहजर राहिले म्हणून अपिलार्थीस दिनांक २१-

०५-२००९ रोजी पत्र मिळण्याची तजवीज केली. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व संबंधित जन माहिती अधिकारी यांना जास्तीत जास्त दंड आकारण्यात येऊन अपिलार्थीने विनामूल्य माहिती देण्याची विनंती आयोगास केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०३-२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००७ ते दि. १६-०३-२००९ या कालावधीतील काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - ढोरकीन व कारकीन या गावामध्ये मंजूर शेत तळ्यांची संख्या, त्यापैकी झालेली किती व अपूर्ण किती, हे काम मजुराकडून करुन घेतले की जे. सी. बी. मशिनकडून करुन घेतले त्या शेतकऱ्यांची यादी व मजुरांच्या मस्टरची प्रत, पैठण तालुका कृषी कार्यालयात तालुक्यातील रहिवासी कर्मचाऱ्यांची नावे व ते जन माहिती अधिकरी यांच्या कार्यालयात रुजू झालेला दिनांक, फळबाग अनुदान वाटप केलेल्या ढोरकीन व कारकीन गावाला १००%, ७५% व ५०% झाडे असलेल्या फळबागा अनुदान प्राप्त शेतकऱ्यांची यादी आणि अनुदानाची रक्कम, ठिंबक सिंचन अनुदान ज्या शेतकऱ्यांना वाटप केले आहे त्या शेतकऱ्यांची यादी, व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत या कालावधीमध्ये काढल्या गेलेल्या शेतकऱ्यांच्या सहलीत सहभागी झालेल्या शेतकऱ्यांची वर्षनिहाय यादी व त्यांचे गाव व शेतकऱ्यांच्या सहलीवर झालेला खर्च - या मुद्यांचा समावेश होता.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून यानंतर विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०५-२००९ रोजी सुनावणी ठेवल्याचे अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १५-०५-२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविले. तथापि या सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर

राहिल्याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय होऊ शकला नाही. यानंतर व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी वेळेत तयार करुन ठेवली होती व तसेच ही माहिती घेऊन ते जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी उपस्थित राहिले होते. तथापि या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित न राहिल्याने व या प्रकरणाची सुनावणी न झाल्याने ते अपिलार्थीस ही माहिती व्यक्तिशः हस्तांतरित करु शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास त्यांच्या युक्तिवादामध्ये अंतिमतः असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आज रोजी तयार असून, ते ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी तयार आहेत. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुन ते ही माहिती घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत.

जन अपिलीय अधिकरी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक २०-०५-२००९ रोजी सुनावणी ठेवली असल्याची कल्पना त्यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०५-२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिली होती. सदरचे पत्र अपिलार्थीस दिनांक १८-०५-२००९ रोजी प्राप्त झाले असून, अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये, त्यांच्याकडील सुनावणीचे पत्र अपिलार्थीस २१ तारखेला मिळेल अशी जन अपिलीय अधिकारी यांनी तजवीज केली होती, हे सपशेल खोटे आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपिलाची नोटीस १८ तारखेला प्राप्त झाल्याची पोस्टाच्या पावतीची झेरॉक्स प्रत सादर केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ४ मधील, "ठिंबक सिंचन अनुदान वाटप शेतकऱ्यांची यादी अनुदान वाटप पाहणीनंतरच दिले किंवा कसे" हा भाग वगळता उर्वरित संपूर्ण माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार देय होत आहे. मुद्दा क्रमांक ४ मधील, "अनुदान वाटप पाहणी नंतरच दिले किंवा कसे " या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय अपेक्षिले आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना अशाप्रकारचे प्रश्न विचारणे आणि त्या प्रश्नाचे उत्तर माहिती अधिकाराच्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे अशाप्रकारच्या प्रक्रियांचा समावेश नाही. परिणामी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ मधील या भागाशी संबंधित माहिती अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे. सदर माहिती आयोगाने तपासली असता, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी ही माहिती सकृतदर्शनी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले आहे. याच बरोबर येथे हेही लक्षात घेतले पाहिजे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित राहिल्यासंदर्भात त्यांनी कोणताही पुरावा आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. त्यामुळे पुराव्याअभावी जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात स्वतः कधीही

उपस्थित झाले नाहीत, ग्राह्य धरण्यात येत आहे. तसेच अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी २० तारखेच्या सुनावणीचे पत्र दिनांक २१-०५-२००९ रोजी प्राप्त होईल अशी तजवीज केली, असे म्हटले आहे तथापि अपिलार्थीस २० तारखेच्या सुनावणीचे पत्र दिनांक १८-०५-२००९ रोजी प्राप्त झाल्याचा सबळ पुरावा जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केला आहे. जन माहिती व अपिलीय अधिकाऱ्याच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना देय असलेली माहिती आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर माहितीसाठीच्या अर्जाच्या पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याची पूर्ण जबाबदारी अर्जदाराची असते. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने अशाप्रकारची त्यांची कोणतीही जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडली असल्याचा कोणताही पुरावा आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती सशुल्क प्राप्त करुन घ्यावी लागेल, असे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाच्या आत पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधितांच्याकडून सशुल्क हस्तगत करुन घ्यावी. जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने या प्रकरणी मागणी केलेली माहिती व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर

जास्तीत जास्त दंड आकरण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस असद्‌हेतूने माहिती देण्यास टाळल्याचे या संपूर्ण घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर निःसंशयपणे सिध्द होत नसल्यामुळे, अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची विनंती, आयोग अमान्य करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत सशुल्क व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. उत्तम श्रीपतराव थोरात, मु. पो. ढोरकीन, ता. पैठण, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषी अधिकारी , ढोरकीन, ता. पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११५१

निर्णय दिनांक ०६-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. चंद्रजीत भालचंद्र जाधव,<br>रा. रामकृष्ण कॉलनी, उंबरे कोठा, उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज करेपर्यंत कोणतीही माहिती पुरविली नसल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे,

उस्मानाबाद जिल्हा परिषद अंतर्गत क्रीडा क्षेत्रातील ५% आरक्षणातील प्राथमिक शिक्षण सेवक म्हणून नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची सन २००४-०५ ते २००८-०९ या ५ वर्षाच्या कालावधीशी संबंधित काही माहिती एका विहित ५ कलमी प्रपत्रामध्ये व्यक्तिशः मागितली होती. या प्रपत्रामध्ये- कर्मचाऱ्याचे पूर्ण नाव, क्रीडा प्रकार, राज्य / राष्ट्रीय पातळीवरील क्रीडा नैपूण्य प्रमाणपत्राची सत्यप्रत, सदरील प्रमाणपत्र सक्षम अधिकाऱ्याकडून पडताळणी केल्याचे प्रमाणपत्राची सत्यप्रत व वर्षनिहाय ५ % क्रीडा आरक्षणामधून भरलेल्या पदांची एकूण संख्या - या मुद्यांचा समावेश होता.

यानंतर अपिलार्थीने विहित मुदतीत माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २८-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दिनांक १५-०३-२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. व्ही. जी. यादव, बाल विकास प्रकल्प अधिकारी हे उपस्थित आहेत आणि अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दिनांक ०६-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दिनांक १५-०३-२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या ५ वर्षाच्या माहितीपैकी एकूण ३ वर्षाची

माहिती तयार असल्याचे व सन २००४-०५ व २००५-०६ या दोन वर्षाची माहिती तयार झाली नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एका त्यांनी विहित केलेल्या ५ कलमी प्रपत्रामध्ये माहिती मागविली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने एखाद्या विहित प्रपत्रात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितल्यास त्याच विहित प्रपत्रात अर्जदारास माहिती तयार करुन नंतर ती देणे हे अधिनियमातील तरतुदीमध्ये अभिप्रेत नाही. परंतु या प्रपत्रातील मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडील ज्या कागदपत्रावर उपलब्ध आहे त्या कागदपत्राच्या प्रती मात्र त्यांना अर्जदारास देणे भाग आहे. या प्रकरणी अपिलार्थीने विहित केलेल्या प्रपत्रातील मुद्दे हे अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहेत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या विहित प्रपत्रामध्ये उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांवरील संपूर्ण माहिती, ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, त्यांना द्यावी लागेल. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर ही माहिती प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने हे उत्तरदायित्व योग्य प्रकारे पार पाडल्याचा कोणताही सबळ पुरावा त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर या माहितीचा पाठपुरावा अपिलार्थीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या दिनांक २५-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे केल्याचे आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०३-२००९ रोजी आदेशित करुनही, माहिती न देण्याची कृती त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करीत आहे. या

प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न पुरवून स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (शालेय शिक्षण) यांना या प्रकरणाशी संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात सध्याचे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १८-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, त्यांना वरील कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून, ही माहिती संबंधितांच्यांकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी लागेल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (शालेय शिक्षण) यांना संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. चंद्रजीत भालचंद्र जाधव, रा. रामकृष्ण कॉलनी, उंबरे कोठा, उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (शालेय शिक्षण विभाग), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११५२

निर्णय दिनांक ०६-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. भजनदास साहेबराव गुडे,<br>मु. पो. आवारपिंपरी, ता. परंडा, जि. उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मंडळ कृषी अधिकारी, कृषी कार्यालय, परंडा,<br>जि. उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>तालुका कृषी कार्यालय, परंडा, जि. उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिाकरी : तालुका कृषि अधिकारी, परंडा, जि. उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, या अपिलाच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता ४,०००/- रु. इतके अनुदान मागितले असल्याचे सांगितले. या नंतर परत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी वरिष्ठांच्याकडे अनुदान

मागितले आहे अशा अर्थाचे पत्र त्यांना पाठविले. अपिलार्थीने पाठपुरावा करुनही जन माहिती अधिकारी यांनी जाणिवपूर्वक मुदतीत माहिती देण्याचे टाळले असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००६-०७ ते २००८-०९ या ३ वर्षाच्या कालावधीतील विस्तृत प्रमाणातील काही माहिती एकूण ७ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती. तथापि अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०७-०३-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०३-२००९ रोजी निर्णय देऊन वरिष्ठ कार्यालयाकडून निधी प्राप्त होताच जन माहिती अधिकारी यांना निधी पुरविण्यात येईल व त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनाविलंब त्वरित माहिती द्यावी असे आदेश दिले. हे आदेश देऊनही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही विस्तृत प्रमाणात असल्यामुळे आणि ही माहिती देण्यासाठी त्यांच्याकडे आवश्यक तो निधी उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी निधीच्या कमतरतेची कल्पना

अपिलार्थीस सुरुवातीलाच दिली होती. यानंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीच्या वेळी देखील त्यांनी अपिलार्थीस ही कल्पना दिली होती. यानंतर दिनांक ०१-०१-२०१० रोजी त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दाखविली व त्यावरील आवश्यक त्या कागदपत्राच्या नोंदी अपिलार्थीने त्यांच्याकडे घेतल्या. त्यांनी अपिलार्थीस दाखविलेल्या माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले असून, अपिलार्थीने त्याप्रमाणे त्यांच्याकडे माहिती प्राप्त झाल्याची लेखी कबूली देऊन, त्यांनी दिलेला अर्ज निकाली काढण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली आहे, असे आयोगास अवगत केले व अपिलार्थीच्या या कबूली पत्राची प्रत आयोगास सादर केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस अनुदानाच्या अनुपलब्धतेमुळे आवश्यक ती माहिती विहित मुदतीत पुरवू शकले नाहीत. नंतर अपिलार्थीस त्यांनी आवश्यक ती माहिती दाखविली व अपिलार्थीचे समाधान झाल्याची लेखी कबूली आयोगास सादर केली आहे. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

प्रसंगावशात आयोगास असे आढळून आले आहे की, राज्य शासनाच्या कृषी व वन विभागामध्ये कृषी विभागाकडून अद्यापही त्यांच्याकडील क्षेत्रिय अधिकाऱ्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी परिणामकारक होण्याकरिता आवश्यक तो निधी वितरित केला जात नाही. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे याकडे लक्ष वेधण्यात येत असून त्यांनी येथून पुढे राज्य शासनाच्या कृषी व वन विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती अर्जदारांना पुरविण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे पहावे. मुख्य सचिव यांना या सूचना अधिनियमातील कलम १९ (८) (क) ( चार) मधील तरतुदीप्रमाणे देण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भजनदास साहेबराव गुडे, मु. पो. आवारपिंपरी, ता. परंडा, जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषी अधिकारी, कृषी कार्यालय, परंडा, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, परंडा, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११५३

निर्णय दिनांक ०६-०५-२०१०

१ श्री. सतिश प्रभाकरराव दिवाण, : अपिलार्थी
रा. १, 'शिवप्रसाद', शिक्षक कॉलनी, पाथरी, ता. पाथरी,
जि. परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, परभणी
२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध न करुन दिल्यामुळे आणि माहिती देण्यास टाळाटाळ व विलंब लावल्यामुळे शासकीय माहिती अधिकारी या नात्याने अधीक्षक अभियंता यांनी कार्यकारी अभियंता यांच्यावर नियमानुसार कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतु या सर्व बाबींकडे दुर्लक्ष करुन अधीक्षक अभियंत्यांनी कार्यकारी अभियंत्यांना पाठीशी घालून अपिलार्थीवर अन्याय केला व माहिती अधिकाराची खिल्ली उडविली. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या प्रकरणी नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती एकूण १० मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-११-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात तयार असल्याचे व ही माहिती त्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून हस्तगत करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित न राहता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १२-१२-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील, अपिलार्थीने माहिती घेण्यास नकार दिल्याच्या कारणास्तव फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार करुन ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहतील अशी अपेक्षा केली व माहिती तयार झाल्यावर दिनांक २८-११-२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयातून विनामूल्य हस्तगत करुन घेण्याचे कळविले. तथापि

व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात मागणी केलेली माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी कधीही स्वतः उपस्थित राहिले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी देखील अपिलार्थी अनुपस्थित होते. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना खरोखरीच आवश्यक आहे किंवा कसे याबाबतीत ते संभ्रमीत आहेत. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २०-१२-२००८ रोजी अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जाशी संबंधित संपूर्ण माहिती रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली असता, ही माहिती स्वीकृत करण्याचे अपिलार्थीने नाकारल्यामुळे सदरचे रजिस्टर्ड पाकीट त्यांना पोस्टाकडून परत आले आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी पोस्टाकडून त्यांना परत प्राप्त झालेले व अपिलार्थीने अस्वीकृत केलेले पाकीट आयोगास दाखविले.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे विस्तृत व्याप्ती असलेली माहिती व्यक्तिशः मागितली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर या संदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने हे उत्तरदायित्व कशा प्रकारे पार पाडले आहे याचा कोणताही सबळ पुरावा त्यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी फक्त, ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वारंवार गेल्याचा उल्लेख केला आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादात त्यांनी म्हटल्याप्रमाणे अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात त्यांना आवश्यक ती

माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित राहिले नाहीत. या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, किंवा या संदर्भातील आवश्यक तो सबळ पुरावा त्यांनी आयोगास उपलब्ध करुन न दिल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुन अपिलार्थी ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत, हा मान्य करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती रजिस्टर्ड पोस्टाने देऊ केली असता, अपिलार्थीने ही माहिती न स्वीकारणे म्हणजे त्यांनी मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना आवश्यक नसण्याचे द्योतक आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये कोणत्याही विशिष्ट प्रकारची आयोगास विनंती केली नसून या अर्जामध्ये त्यांनी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे माहिती अधिकार कायद्याची खिल्ली उडवीत असल्याचा उल्लेख केला आहे. तथापि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता वेगवेगळ्या टप्प्यावर सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अधीक्षक अभियंता यांना या प्रकरणी कार्यकारी अभियंता यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे त्यांना अपेक्षित होते. या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अधीक्षक अभियंता हे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी आहेत. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याचे अधिकार अधिनियमामध्ये नाहीत आणि या प्रकरणी कार्यकारी अभियंता यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे आयोगाने कारवाई करावी अशी कोणतीही कृती त्यांच्याकडून घडली असल्याचे आयोगास आढळून न आल्याने आयोगाचे कार्यकारी अभियंता यांच्यावर अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याचे कोणतेही आदेश नाहीत.

या सर्व वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सतिश प्रभाकरराव दिवाण, रा. १, 'शिवप्रसाद', शिक्षक कॉलनी, पाथरी, ता. पाथरी, जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११५९

निर्णय दिनांक ०६-०५-२०१०

१ श्री. विष्णू हरिभाऊ पकवाने, : अपिलार्थी
कमल निवास, यशवंतनगर, विद्यापीठ गेटसमोर, परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, जात पडताळणी
विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती
प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या स्वतःच्या जात प्रमाणपत्र पडताळणी संदर्भात काही माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी प्रकरण क्रमांक १६९६/०४ ची जात पडताळणी झाली किंवा नाही, जात पडताळणी प्रमाणपत्राची सत्यप्रत, नसल्यास त्रुटीचे कारण, जात पडताळणी झाली असल्यास मूळ प्रमाणपत्र कोणत्या कार्यालयास व केव्हा पाठविले - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पीड पोस्टाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०५-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीने त्यांच्याकडे विलंबाने अपील दाखल केल्याने त्यांच्या प्रथम अपील अर्जावर नियमानुसार कार्यवाही करता येत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ जात प्रमाणपत्राची मागणी त्यांच्या युक्तिवादामध्ये करुन, त्यांनी या प्रकरणी मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने सादर केलेले जात पडताळणी प्रमाणपत्र प्रकरण त्यांच्या कार्यालयाकडून गहाळ झाले असून, आता त्यांनी अपिलार्थी-कडून नव्याने प्रस्ताव मागवून घेतला आणि या प्रस्तावाची छाननी त्यांच्या कार्यालयामार्फत चालू आहे व ते या प्रकरणावर येत्या तीन आठवड्यात अंतिम निर्णय घेऊ शकतील. अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देण्याचे कारण जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीस विचारले असता, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेली संचिका त्यांच्या कार्यालयात आढळत नसल्यामुळे, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती उपलब्ध करुन दिली नाही, असे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या-कडे त्यांच्या दिनांक २२-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १, मुद्दा क्रमांक २ मधील .... नसल्यास त्रुटीचे कारण, या मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण अशा प्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येशी विसंगत आहे, मात्र उर्वरित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आता हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत स्पीड पोस्टाव्दारे विनामूल्य पुरवावी व तसेच अपिलार्थीच्या प्रकरणाची सद्यस्थिती अपिलार्थीस याच पत्रामध्ये अवगत करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत स्पीड पोस्टाव्दारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विष्णू हरिभाऊ पकवाने, कमल निवास, यशवंतनगर, विद्यापीठ गेटसमोर, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११६०

निर्णय दिनांक  ०६-०५-२०१०

१ श्री. पटवारी सय्यदपाशा वजीर, : अपिलार्थी

मु. पो. लोहारा, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा जिल्हा भूकंप पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी

कार्यालय, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

त्रयस्थ पक्ष : १. कौसरबी खुद्‌बोद्दीन पटवारी यांचे वारस,

२. बिल्कीसबी खुद्‌बोद्दीन पटवारी यांचे वारस

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या पाच मुद्दयावरील माहितीपैकी, मुद्दा क्रमांक २ ते ५ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने, प्राप्त झालेली माहिती साक्षांकीत करुन न मिळाल्याने व विलंबाने मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे आणि जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार शास्ती लावण्याची कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, भूकंपात मृत व्यक्तींच्या वारसांना मिळणा-या अनुदानासंदर्भात, त्रयस्थ पक्ष मयत कौसरबी खुद्बोद्दीन पटवारी, बिल्कीसबी खुद्बोद्दीन पटवारी यांच्या वारसांना मिळणारे अनुदान कोणाला देण्यात आले, कधी देण्यात आले त्यासाठी कोणते निकष लावण्यात आले, ज्यांना अनुदान प्राप्त झाले त्यांचे सक्शेशन सर्टिफिकेट कोर्टाचे होते का व त्रयस्थ पक्ष वजीर पटवारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सक्शेशन प्रमाणपत्र देऊन देखील त्यांना अनुदानापासून वंचित का ठेवण्यात आले, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा शोध घेणे चालू असल्याचे अपिलार्थीस कळविले, तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती मुदतीत प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०४-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित

माहिती त्यांना दिनांक ०८-०५-२००९ रोजी व मुद्दा क्रमांक ३ ते ५ शी संबंधित माहिती दिनांक ११-०५-२००९ रोजीच्या पत्राव्दारे सशुल्क पुरविली, तथापि प्राप्त माहिती साक्षांकीत करुन न मिळाल्यामुळे आणि मुद्दा क्रमांक २ ते ५ मधील माहितीचा समावेश नसल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष गैरहजर आणि जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती दिनांक ०८-०५-२००९ रोजी व उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती त्यांनी दिनांक ११-०५-२००९ रोजी सशुल्क पुरविली आहे. ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांनी अपिलार्थीस एकूण १४ रुपये इतके शुल्क आकारलेले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ ते ५ शी संबंधित माहिती त्यांना न मिळाल्यामुळे, प्राप्त माहिती साक्षांकीत करुन न मिळाल्यामुळे आणि ती विलंबाने मिळाल्यामुळे व्दितीय अपील केल्याचे आढळून येत आहे. यापैकी पहिल्या कारणाच्या संदर्भात आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ ते ५ शी संबंधित माहितीपैकी मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांना दिनांक ०८-०५-२००९ रोजी, मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती दिनांक ११-०५-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी पुरविली आहे. मुद्दा क्रमांक ४ व ५ शी संबंधित अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्यामुळे, ती मूळात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी

यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीनुसार देणे इतपत सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबद्दलची अथवा निर्णयाबद्दलची कारणे अथवा खुलासे अपेक्षित करणारी माहिती अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना विचारणे आणि अपिलार्थीस निर्णयाचे स्पष्टीकरण जन माहिती अधिका-याने करणे अशा प्रकारच्या प्रक्रियेचा माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये समावेश नाही, या कारणास्तव अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ५ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील करण्याचे एक कारण, त्यांना प्राप्त माहिती साक्षांकीत स्वरुपात न मिळाल्यामुळे, असे दर्शविले आहे. यासंदर्भात अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे साक्षांकीत स्वरुपात माहिती मागितलेलीच नव्हती, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस साक्षांकीत स्वरुपात माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. अपिलार्थीच्या आयोगाकडे व्दितीय अपील करण्यासाठीच्या दुसरे कारणाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाली असल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. आयोगास असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती शोधण्याचे काम त्यांच्या कार्यालयात चालू असल्याचे कळविले आहे. परंतु या पत्रानंतर अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांनी, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करेपर्यंत कोणताही प्रतिसाद दिला नाही. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने व सशुल्क माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी या प्रकरणी दिनांक

०१-०३-२००९ रोजी संपुष्टात येत होता, परंतु प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-०५-२००९ रोजी आणि दिनांक ११-०५-२००९ रोजी म्हणजेच, अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्यासाठीचा कालावधी व्यपगत झाल्यानंतर पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी लावलेल्या विलंबाबाबत, त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, पुढे असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये १४ इतके त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत मनीऑर्डरने परत करावे. अपिलार्थीस सदरचे शुल्क परत करताना पोस्टाच्या कमिशनचा खर्च जन माहिती अधिकारी यांनी सोसावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये १४ इतके त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत, मनीऑर्डरव्दारे परत करावे. या प्रकरणी लागणारा कमिशनचा खर्च जन माहिती अधिकारी यांनी स्वतः सोसावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पटवारी सय्यदपाशा वजीर, मु. पो. लोहारा, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११६१

निर्णय दिनांक ०६-०५-२०१०

१ श्री. शे. सईफोद्दीन शेख महेताब, : अपिलार्थी
मदिनानगर, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,
अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर,
तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना ग्रामविकास अधिकारी, अर्धापूर यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही, त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज करेपर्यंत कोणतीही माहिती दिली नसल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या दिनांक २५-०८-२००८ रोजीच्या अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे इंदिरानगर येथील सार्वजनिक बोअरवेलवर ज्या अतिक्रमण धारकांनी कनेक्शन घेतले आहे त्यांच्यावर ग्रामपंचायतीने कोणती कारवाई केली, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या माध्यमाव्दारे (टपालाव्दारे किंवा व्यक्तिशः) जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हवी आहे, याचा उल्लेख केलेला नाही. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याचे कारण दर्शवून, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०६-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस दिनांक २२-०६-२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले, तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाली, तथापि अनधिकृत नळ जोडणीवर जन माहिती अधिकारी यांच्या-कडून कोणतीही कार्यवाही केली गेली नसल्यामुळे, या माहितीचा त्यांना काहीही उपयोग नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडे अपिलार्थीने माहिती मागितली त्यावेळेस मोठ्या प्रमाणावर कार्यभार असल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत, तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-०७-२००९ रोजी त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे, तथापि या अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना, त्यांना कोणत्या माध्यमाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपेक्षित आहे याचा खुलासा केलेला नाही, त्यामुळे अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करावे लागले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०६-२००९ पर्यंत अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित करुनही, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-०७-२००९ रोजी म्हणजेच, विलंबाने विनामूल्य माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस पुरविण्यात आलेली माहिती ही त्यांच्या मागणीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले आहे, त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्याकरिता आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिका-यास घालून दिलेल्या वेळेचे बंधन त्यांनी न पाळून, आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस १४ दिवसाच्या विलंबाने माहिती दिल्याबद्दल ते अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कार्यवाहीस पात्र होत आहेत. सबब, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊनही त्याचा काहीही उपयोग नाही, असे अभिप्राय व्यक्त केले आहेत. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अनधिकृत नळ जोडणे, काढणे अथवा त्यावर कोणत्याही स्वरुपाची

कारवाई करण्याचे जन माहिती अधिकारी यांना मार्गदर्शन करणे, अशा प्रकारच्या बाबी आयोगाच्या कार्यकक्षेमध्ये समाविष्ट नसल्याने, अपिलार्थीस त्यांच्या या मुद्दयावर जिल्हा परिषदेतील वरिष्ठ प्रशासनाकडून या प्रकरणाची दाद मागवून घ्यावी लागेल, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शे. सईफोद्दीन शेख महेताब, मदिनानगर, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर,

तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२९१

निर्णय दिनांक ०६-०५-२०१०

१ श्री. अनंत एन. कांबळे, : अपिलार्थी

हनुमाननगर, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उपजिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी कार्यालय, सेलू,

तालुका सेलू, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय अधिकारी (महसूल), सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, अपिलार्थी अनंत एन. कांबळे हे दिनांक ०९-०४-२००९ रोजी मृत्यू पावले असून, त्यांच्या या विधानापुष्ट्यर्थ त्यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद, पाथरी यांचे अनंत एन. कांबळे यांचे मृत्यू प्रमाणपत्र क्रमांक २९, दिनांक १९-०४-२००९ आयोगास सादर केले आहे. या प्रकरणी खुद्द अपिलार्थी यांचे दुःखद निधन झाले असल्याचे आयोगास आढळून येत आहे, त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील आता तथ्यहीन होत असल्याने, सदर अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अनंत एन. कांबळे, हनुमाननगर, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२९२

निर्णय दिनांक ०६-०५-२०१०

१ श्री. बालासाहेब मुरलीधर मिसाळ, : अपिलार्थी
मु. जवळा फकिर, पो. दिंद्रुड, तालुका धारुर, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अनधिकृतरित्या चालविण्यात येणा-या वीट भट्टयासंदर्भात आणि त्रयस्थ पक्ष श्री. अभय म्हस्के, श्री. धनंजय मगर यांच्या सेवाविषयक बाबीसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

' मौजे फकीरजवळा येथील १३६, १३७, १३८,१३९ मधील बेकायदेशीररित्या उत्खनन्न करुन शासनाचा महसुल बुडविणा-या सिरसाळा, नित्रुड व उपळी येथील किती वीट भट्टी चालकांना किती रक्कमेच्या नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. असल्यास सदर नोटीसच्या प्रमाणित प्रती उपलब्ध करुन देणे बाबत तत्कालिन नायब तहसीलदार, धारुर अभय मस्के, धनंजय मगर, लिपीक धारुर तहसिल कार्यालय यांचा घेण्यात आला आहे काय ? असल्यास त्याची प्रमाणित प्रत मिळणे बाबत. तसेच नायब तहसीलदार यांचा अकार्यकारी पदावर बदली करण्याबाबत विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी प्रस्ताव मागितला आहे काय ? असल्यास सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाची प्रमाणित प्रत मिळणेबाबत. सदरील प्रकरणी घेण्यात आलेले फोटोची सत्यप्रत मिळणे बाबत. '

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर तसाचा तसा घेतलेला आहे)

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी दिनांक ०१-०९-२००७ ते २६-०८-२००८ असा होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक ०४-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-१०-२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती पुरविण्याची निवासी उपजिल्हाधिकारी, बीड यांना सूचना दिली, तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे व ही माहिती त्यांना उपलब्ध न करुन देणा-या अधिका-याला रुपये २५,००० इतकी शास्ती लावण्याचे आदेश आयोगाने पारीत करावेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांना या प्रकरणाशी संबंधित काहीही माहिती नाही, त्यामुळे त्यांना सुनावणीची मुदत वाढवून देण्यात यावी. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीची ही विनंती आयोग अमान्य करत आहे.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना पूर्णतः देय नाही, कारण यातील काही भागाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलची कारणे व अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) च्या तरतुदीशी अशा प्रकारची माहिती विसंगत असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही, त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांचेकडून अपिलार्थीस मौजे फकीरजवळा येथील १३६, १३७, १३८,१३९ मधील बेकायदेशीररित्या उत्खनन करुन शासनाचा महसुल बुडविणा-या सिरसाळा, नित्रुड व उपळी येथील वीट भट्टी चालकांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे बजावण्यात आलेल्या नोटिसीच्या प्रमाणित प्रती, तत्कालीन नायब तहसीलदार धारुर, अभय मस्के, धनंजय मगर यांच्या जबाबाच्या प्रमाणित प्रती, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना, नायब तहसीलदार यांची अकार्यकारी पदावर बदली करण्याबाबत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने पाठविलेल्या प्रस्तावाची प्रमाणित प्रत आणि या प्रकरणी घेण्यात आलेल्या फोटोची

सत्यप्रत ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. ही माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाव्दारे पुरवावी. या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २६-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनिमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी या कलमामध्ये विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देणे त्यांना अनिवार्य आहे, तथापि या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, बीड यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन, त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे व त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे स्वःतला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब, सचिव (महसूल) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, बीड दिनांक २६-०८-२००८ रोजी व तदनंतर ३० दिवसापर्यंत या पदावर कार्यरत असलेले अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक, ज्यांना अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे, अशा सर्वांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयायामध्ये स्पष्ट केलेली त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, बीड या पदावर दिनांक २६-०८-२००८ रोजी व तदनंतर ३० दिवसापर्यंत या पदावर कार्यरत असलेले अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बालासाहेब मुरलीधर मिसाळ, मु. जवळा फकिर, पो. दिंद्रुड, तालुका धारुर, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११७४
निर्णय दिनांकः ०७-०५-२०१०

१. श्री. सतिश शिवराज सिंदाळकर, : अपिलार्थी
रा.येरोळ, ता.शिरुर अनंतपाळ, जि.लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तलाठी, येरोळ, ता.शिरुर अनंतपाळ, जि.लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, निलंगा, जि.लातूर

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, निलंगा, जि.लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून त्यांनी माहिती अधिकाराखाली मागितलेल्या माहिती संबंधित कार्यालयाकडून त्यांना प्राप्त झाली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १९.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "मौ. येरोळ येथील सोयाबिन अनुदान वाटपाचा तपशील, जमिनीचे क्षेत्र, बागायती, जिरायती,पडीक,सिंचनाखालील", अशी माहिती मागविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सप्टेंबर, २००८ ते जानेवारी, २००९ असा होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज तलाठी कार्यालय, सज्जा येरोळ यांना उद्देशून केला होता, परंतु प्रत्यक्षात त्यांनी तो तहसील कार्यालय,शिरुर अनंतपाळ,जि.लातूर यांच्याकडे सादर केला होता. तहसीलदार यांनी अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार उपविभागीय अधिकारी, निलंगा यांच्याकडे यासंदर्भात दि. १२.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि या प्रकरणी ते जन अपिलीय अधिकारी नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज तहसीलदार, शिरुर अनंतपाळ यांच्याकडे दि. २३.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पाठविला व अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. परंतु यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये अपिलार्थीस बऱ्याच अनियमितता व चुका आढळून आल्या आहेत. या अनियमितता व चुका दुरुस्त करुन त्यांना माहिती प्राप्त व्हावी, अशी त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये अपेक्षा व्यक्त केली.

जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा येरोळ यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने तलाठी, सजा येरोळ यांना उद्देशून दि. १९.०१.२००९ रोजीचा अर्ज प्रथम तहसीलदार, शिरुरअनंतपाळ यांच्याकडे सादर केला होता. तहसीलदार, शिरुर अनंतपाळ यांच्याकडून त्यांना अपिलार्थीचा मूळ अर्ज तहसीलदार यांच्या दि. २८.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी लागलीच दि. २९.०४.२००९ रोजी अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रु.१२२/- इतके त्यांना,

तलाठी कार्यालयात भरण्याचे सूचित केले, त्याप्रमाणे अपिलार्थीने दि. १६.०५.२००९ रोजी शुल्काचा भरणा केल्यानंतर त्यांनी दि. २१.०५.२००९ रोजी पोस्टाने माहिती पाठविली आहे.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) मध्ये विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देणे गरजेचे होते. परंतु त्यांनी अशाप्रकारचा प्रतिसाद दिल्याचे आयोगास या प्रकरणी आढळून येत नाही. अपिलार्थीचा अर्ज तहसीलदार, कार्यालयास दि. १९.०१.२००९ रोजी प्राप्त झालेला आहे. तथापि या अर्जाद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही तहसीलदार, शिरुर अनंतपाळ यांच्याकडे उपलब्ध नसल्याने व ती तलाठी, सजा येरोळ यांच्या कायक्षेत्राशी संबंधित असल्याने तहसीलदार कार्यालयाने अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत, या अर्जाची प्रत संबंधित तलाठी कार्यालय, सजा येरोळ यांच्याकडे पाठविण्याऐवजी, सदर प्रत पाठविण्यास तीन महिने व ९ दिवस इतका विलंब लावला.तलाठी, सजा येरोळ यांच्याकडे अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्वरेने कार्यवाही करुन अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविली. अपिलार्थीस तलाठी, सजा येरोळ यांनी पुरविलेली माहिती ही अपिलार्थीच्या मूळ अर्जामधील माहितीच्या मागणीशी सकृतदर्शनी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले आहे. या प्रकरणी अपिलार्थीने दि.१९.०१.२००९ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती त्यांना दि. २३.०२.२००९ रोजी अगर तत्पूर्वी सशुल्क प्राप्त होणे गरजेचे होते. परंतु प्रत्यक्षात अपिलार्थीस ही माहिती दि. १६.०५.२००९ रोजी या माहितीपोटीचे शुल्क तलाठी कार्यालयास भरल्यानंतर प्राप्त झाली आहे. अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे सशुल्क माहिती देण्याची

मुदत व्यपगत झाल्यानंतर संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क माहिती प्राप्त झालेली आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याची संबंधित अधिकाऱ्याची कृती ही अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी अधिनियमातील कलम ७(६) चा भंग केला आहे. तथापि या विलंबास तलाठी, सजा येरोळ यांना जबाबदार धरल्यास त्यांच्यावर अन्याय होईल, असे आयोगास वाटते. या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यासाठी प्रामुख्याने तहसील कार्यालय, शिरुरअनंतपाळ येथील संबंधित जन माहिती अधिकारी हे जबाबदार असल्याचे आयोगास आढळून आले आहे. सबब तहसीलदार, शिरुर अनंतपाळ यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, तलाठी, सजा येरोळ यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.१२२/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत मनिऑर्डरद्वारे परत करावे. मनिऑर्डर पाठविण्यासाठी येणारा खर्च तहसीलदार,शिरुर अनंतपाळ यांनी सोसावा.

अपिलार्थीच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज तलाठी, सजा येरोळ यांना विलंबाने पाठविण्यासाठी तहसील कार्यालय,शिरुरअनंतपाळ येथील जे कर्मचारी जबाबदार आहेत, त्यांच्यावर तहसीलदार, शिरुर अनंतपाळ यांनी जबाबदारी निश्चित करावी आणि या सर्वांवर जिल्हाधिकारी, लातूर यांना, प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अचूकतेबाबत व सत्यतेबाबत त्यांच्या युक्तिवादामध्ये काही शंका उपस्थित केल्या असून, त्या शंकाचे निरसन करणे त्यांना अपेक्षित असल्याचे आयोगास अवगत केले आहे. यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविल्या गेलेल्या माहितीसंदर्भात जर त्यांचे काही आक्षेप असतील तर या आक्षेपांचे निराकरण त्यांनी महसूल विभागाच्या सक्षम प्राधिकरणाकडून परस्पर करुन घ्यावे .

तलाठी, सजा येरोळ यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्याकडे ज्या स्वरुपात व जशी उपलब्ध आहे, तशीच ती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली आहे. या माहितीमध्ये बदल करण्याची अधिकारिता आयोगास नाही, असे अपिलार्थीच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. तहसीलदार, शिरुर अनंतपाळ यांनी, तलाठी, सजा येरोळ यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.१२२/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच, सात दिवसांच्या आत मनिऑर्डरद्वारे परत करावे. मनिऑर्डर पाठविण्यासाठी येणारा खर्च तहसीलदार,शिरुर अनंतपाळ यांनी सोसावा.

३. जिल्हाधिकारी, लातूर यांना तहसील कार्यालय,शिरुरअनंतपाळ येथील या प्रकरणाशी संबंधित वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे,जबाबदार असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०७-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सतिश शिवराज सिंदाळकर,रा.येरोळ, ता.शिरुर अनंतपाळ, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा येरोळ, ता.शिरुर अनंतपाळ,जि.लातूर यांना

या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, शिरुर अनंतपाळ, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११७५
निर्णय दिनांकः ०७-०५-२०१०

१. श्री. मनोहर चिमाजी चाळक, : अपिलार्थी
राृ.गेवराई, जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तहसील कार्यालय,गेवराई, जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, गेवराई, जि.बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (संगायो),
तहसील कार्यालय,गेवराई,जि.बीड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती त्यांना विहित मुदतीत प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार गेवराई यांच्याकडे दि. ०२.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.०४.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस दि. २५.०५.२००९ रोजी माहिती देण्याचे त्यांनी आश्वासित केले होते. तथापि या दिनांकास कोणतीही माहिती न मिळाल्याने त्यांनी दि. ०२.०६.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास ही बाब आणली, तरी देखील जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने अशी विनंती केली आहे की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी

केलेली माहिती त्यांना आता विनामूल्य प्राप्त व्हावी आणि संदर्भित प्रकरणातील दोषींना प्रतिदिनी रु. २५०/- या प्रमाणे शास्ती लावण्यात येऊन त्यांच्यावर एक महिन्याच्या आत शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २६.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, गेवराई यांच्याकडे 'कुटुंब अर्थसहाय्य योजना' या विषयावर दि. ०१.०१.२००५ ते २६.०२.२००९ या कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिशः मागितली होती.

"दि. ०१.०१.२००५ ते आतापर्यंत एकुण अनुदान किती आले? व प्रत्येक लाभार्थ्याला वाटप झाले  किती? २००५ आतापर्यंत कुटुंब अर्थसहाय्याचे अर्जप्रकरण कीती दाखल झाले व मंजुर किती झाले कुंटुब अर्थसहाय्य यसोजनेला सज्ञान मुलांची अट आहे काय असल्यास व नसल्यास त्याची माहिती देण्यात यावी व आतापर्यंत किती लाभाधारकांना मंजुरी देण्यात आली व किती नांमजुर झाले व नामजुरीचे कारण देण्यात यावे ज्या लाभधारकांनी अणुदाणासाठी अर्ज केलेले आहेत. त्यांच्या अर्जामद्ये काही त्रुटी आहे का त्रुटी असल्यास त्या लाभधारकांना त्रुटी भरण्याकरता कार्यालया मार्फत नोटीस पाठवलेल्या आहेत काय याची माहीती देण्यात यावी. पुर्ण लाभादारकाचे मेडीकल वयाच्या प्रमाणपत्रासहीत मंजुरी व नामंजुरी झेरॉक्स प्रत."

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिला गेल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दि. ०२.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०५.२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी आणि अपिलार्थी हजर होते. यावेळी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २०.०५.२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी तोंडी सूचित केले व

अपिलार्थीचे अपील प्रकरण निर्णयासाठी राखून ठेवले, तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती संबंधितांच्याकडून प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना आजतागायत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. परंतु काल रात्री तहसीलदार, गेवराई यांच्या कार्यालयातून दूरध्वनी आला. त्या दूरध्वनीद्वारे त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती तहसील कार्यालयात उपस्थित राहून घेऊन जाण्याचे त्यांना सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या प्रकरणी माहिती मागतेवेळी श्री. माने नावाचे नायब तहसीलदार जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. सध्या ते पदोन्नतीवर सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद या पदावर बदलून गेले आहेत. त्यांनी त्यावेळी अपिलार्थीस माहिती न देण्याची कारणे त्यांना आता सांगता येणार नाहीत.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी काही भाग अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. कारण अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील या भागाद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबाबतची कारणे व अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती विचारली आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी विसंगत आहे. मात्र त्यांच्या याच अर्जातील - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दि. ०१.०१.२००५ ते २६.०२.२००९ या कालावधीमध्ये प्राप्त झालेले अनुदान, प्रत्येक

लाभार्थ्यास वाटप झालेले अनुदान, जन माहिती अधिकारी यांच्याकडे या कालावधीमध्ये कुटुंब अर्थसहाय्याकरिता दाखल झालेल्या अर्जांची संख्या, या अर्जामधून मंजूर व नामंजूर झालेल्या अर्जाची संख्या व पूर्ण लाभधारकाच्या वयाच्या प्रमाणपत्रासाठी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या मेडीकल सर्टीफिकेटच्या प्रतीसह मंजूरी आदेशाची प्रत - ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्याकरिता या भागातील काही माहिती आज सोबत आणली आहे. परंतु या माहितीमध्ये - पूर्ण लाभधारकाच्या वयाच्या प्रमाणपत्राच्या व मंजूरीच्या आदेशाच्या प्रतीचा समावेश नाही. ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी वीस दिवसांचा कालावधी लागेल, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांना वर स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय असलेली माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून वीस दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर माहितीसाठीच्या अर्जाच्या संदर्भात, सदरचा अर्ज जन माहिती अधिकारी

यांच्याकडे सादर केल्यानंतर त्या अर्जासंदर्भात, पुढील घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्त्व अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने हे उत्तरदायित्त्व योग्य प्रकारे पार पाडले असल्याचा कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केलेला नाही. मात्र जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. ०४.०५.२००९ रोजी दिलेल्या इतिवृत्ताचे अवलोकन केले असता, दि. ०४.०५.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,गेवराई यांनी जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्ष अपिलार्थीस माहिती देण्याकरिता तोंडी सूचना दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. या इतिवृत्तावर संबंधित नायब तहसीलदार व अपिलार्थी या दोघांच्याही स्वाक्षऱ्या आहेत. यावरुन अपिलार्थीस ही माहिती द्यावयाची आहे, हे संबंधित जन माहिती अधिकारी यांना या सुनावणीच्या वेळी म्हणजेच दि. ०४.०५.२००९ रोजी ज्ञात होते, असे दिसून येत आहे. तथापि एवढे असूनही, तहसीलदार, गेवराई यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दि. २०.०५.२००९ पर्यंत माहिती देण्याचे आदेशित केले असूनही संबंधित नायब तहसीलदार यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती आयोगाकडील सुनावणीच्या दिवसापर्यंत दिलेली नाही. याचाच अर्थ असा की, अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे. अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती, त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, गेवराई यांनी सूचना देऊनही त्यांनी ही माहिती अपिलार्थीस न देऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे व त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (महसूल) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (श्री. माने, सध्या सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

प्रसंगावशात, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, प्रत्यक्षात ही माहिती मागण्यासाठी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार अर्ज करण्याची गरज नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४(१)(ख)(बारा) मधील तरतुदीनुसार ही माहिती तहसील कार्यालयाने स्वयंप्रेरणेने घोषित करावयाची,अशा स्वरुपाची आहे. तथापि या प्रकरणी तहसीलदार,गेवराई यांनी अशाप्रकारची कार्यवाही केलेली नाही, ही खरोखरीच दुर्दैवाची बाब आहे, असे येथे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांना वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे देय असलेली माहिती, हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. माने, सध्या सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०५-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मनोहर चिमाजी चाळक,रा.संजय नगर,गेवराई, ता.गेवराई,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (संगायो),तहसील कार्यालय, गेवराई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, गेवराई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११७६
निर्णय दिनांक: ०७-०५-२०१०

१. श्री. काजी अजगरखॉ हयातखॉ, : अपिलार्थी
राखंडाळा, ता.जि.हिंगोली

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तहसील कार्यालय,हिंगोली, जि.हिंगोली

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, हिंगोली

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तहसीलदार, हिंगोली

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, आर.ओ.आर.९/८७ या प्रकरणाशी संबंधित, संदर्भित प्रकरण जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दाखल झाल्यापासून ते अंतिम निकाल निघेपर्यंतची माहिती एकूण पाच मुद्यांद्वारे खालीलप्रमाणे मागितली होती.

"(१) आर.ओ.आर. दाखल झाल्यापासून संपूर्ण प्रोसिडींगची नक्कल,

(२) खारीज झाल्याची व रिस्टो झाल्याची नक्कल,

(३) गैरअर्जदार व साक्षदाराच्या जव्वाबाच्या नक्कला,

(४) अर्जदार व त्याच्या साक्षदाराच्या जव्वाबाच्या नक्कला,

(५) फायनल निरनयाची नक्कल."

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दि. ०७.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.११.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस आठ दिवसांचे आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या नंतरही त्यांना कोणतीही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत . जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडील ज्या प्रकरणाशी संबंधित माहिती मागितली आहे त्या प्रकरणाशी संबंधित नस्ती मूळात त्यांच्याकडे उपलब्धच नाही. त्यांच्याकडे अपिलार्थीने संदर्भित केलेल्या आरओआर क्र.९/८७ अशा शीर्षाची अथवा अशा संदर्भाची कोणतीही नस्ती उपलब्ध नसल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत. परंतु अपिलार्थीस माहिती पुरविण्याच्या उद्देशाने त्यांनी अपिलार्थीस दि. १९.११.२००९ रोजी एक पत्र लिहिले असून या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस तहसील कार्यालयात हजर राहून अभिलेख कक्षातील अभिलेखांचे निरीक्षण करण्याचे सूचित केले होते, परंतु या सूचनेचे अनुपालन अपिलार्थीने न केल्यामुळे अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीने

त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये अथवा नंतर कधीही त्यांना ज्या जमिनीच्या प्रकरणाशी संबंधित माहितीची आवश्यकता आहे, त्या जमिनीचा सर्व्हेनंबर व तसेच त्यांनी मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या संचिकेशी संबंधित कोण पक्षकार आहेत, यासंदर्भात कोणतीही माहिती न पुरविल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांनी कधीही नाकारलेले नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी नाकारलेले नाही, परंतु अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडे त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात मागितलेली पूरक माहिती देखील त्यांनी जन माहिती अधिकारी यांना पुरविली नाही. हे पाहता, अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मूळात अस्तित्त्वात आहे किंवा कसे, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अशा परिस्थितीत आवश्यक त्या कागदपत्रांच्या अभावी व संबंधिताच्या अनुपस्थितीमुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०७-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. काजी अजगरखॉ हयातखॉ,रा.खंडाळा, ता.जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११७०
निर्णय दिनांक ०७-०५-२०१०

१ श्री. मनिष आनंद, : अपिलार्थी
अधिव्याख्याता, पालि ॲण्ड बुध्दिझम विभाग, डॉ.
बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
तहसीलदार, तहसील कार्यालय, सालेकसा, जि.
गोंदिया

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
गोंदिया

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार, तहसील कार्यालय सालेकसा, जि. गोंदिया
जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, सालेकसा, जि. गोंदिया

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०७-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०७-०५-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे व याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील क्रमांक ११७०/२००९ ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या अर्जामध्ये अखेरीस अपिलार्थीने सदर अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती आयोगास केलेली आहे.

अपिलार्थीच्या या पत्राचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर निर्णय देण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ११७०/२००९, दिनांक ०२-०७-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मनिष आनंद, पूल - १/३ अधिव्याख्याता, निवासस्थाने विद्यापीठ परिसर , डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय सालेकसा, जि. गोंदिया यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, सालेकसा, जि. गोंदिया यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११७१

निर्णय दिनांक ०७-०५-२०१०

१ श्री. शर्मा राजेंद्र हरिनारायण, : अपिलार्थी
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
सार्वजनिक बाधकाम विभाग, अलिबाग, जि. रायगड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग
जि. रायगड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग, जि. रायगड

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग, जि. रायगड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता, त्यांनी माहिती न पुरविल्यामुळे, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे रितसर प्रथम अपील

दाखल केले. तथापि त्यांच्याकडून देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी आणि जन माहिती अधिकारी यांच्याविरोधात शिस्तभंगाची कार्यवाही करावी व प्रथम अपिलीय अधिकाऱ्यावर देखील कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २४-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयास दिनांक ०१-०४-२००७ ते ३०-११-२००८ या कालावधीमध्ये कोण कोणत्या शिर्षाखाली किती अनुदान प्राप्त झाले व हे अनुदान कोण कोणत्या कामावर खर्च करण्यात आले त्या कामाच्या नावाची यादी, अशी माहिती नोंदणीकृत टपालाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९ (६) मध्ये विहित केलेल्या मुदतीत निर्णय न दिल्यामुळे, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी व त्यांना वेळेत माहिती न दिल्याबद्दल संबंधितांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहितीची मागणी केली त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते, त्यावेळी श्री. जुंदरे नावाचे उपअभियंता या पदावर कार्यरत होते. त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नाही. तथापि आता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांनी खाजगी कुरियरमार्फत अपिलार्थीस दिनांक ०३-०५-२०१० रोजीच्या पत्राद्वारे विनामूल्य पुरविली आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला निर्णय त्यांनी अपिलार्थीस दिनांक २९-०४-२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत होती. माहितीची व्याप्ती व स्वरुप मर्यादित होते. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या मुदतीमध्ये उपलब्ध करुन देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांना फारशी मोठी अडचण असणे संभवत नाही. आता सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खाजगी कुरियर सेवेमार्फत दिनांक ०३-०५-२०१० रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. सदरच्या माहितीचे आयोगाने अवलोकन केले असता, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी ही माहिती सकृतदर्शनी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. तथापि या

प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-१२-२००८ रोजीच्या मूळ आर्जास मे २०१० पर्यंत कोणताही प्रतिसाद दिला नाही, ही बाब नजरेआड करुन चालणार नाही.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम १९ (६) मधील विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय दिला नाही व परिणामी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिले आहेत. अपिलार्थीस अशाप्रकारे, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित ठेवल्यामुळे, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस. यु. जुंदरे व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे, हे सर्वजण एकत्रितपणे जबाबदार असल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीस, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती न पुरवून या सर्वजणांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. जुंदरे एस. यु., उप कार्यकारी अभियंता (सध्या मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे येथे कार्यरत) व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शर्मा राजेंद्र हरिनारायण, संपादक, नांदेड पोलखोल, एस. पी. ऑफिसच्या मागे, वजिराबाद, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग, जि. रायगड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग, जि. रायगड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११७२

निर्णय दिनांक ०७-०५-२०१०

१ श्री. स. मंजुर अली स. खुर्शीद अली, : अपिलार्थी
रा. बरकतपुरा, अर्धापूर, ता. अर्धापूर, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर,
जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर, जि. नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. पठाण अकबर खॉन पठाण मुस्तफा खाँन यांच्या विषयी खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"ग्रामपंचायत कार्यालय अर्धापूर अंतर्गत असलेल्या नामे पठाण अकबर खाँन पठाण मुस्तफा खाँन या नावाने असलेल्या घर क्र., न. नं. ८ च्या उताऱ्याची नक्कल देणे, तसेच अतिक्रमण केले असल्यास त्या बाबदचा  पूराव  देणे कींवा कोठे कीरायानामाद्वारे अर्धापूरमध्ये रहात असल्यास त्या बाबदचा  पुरावाची सत्यप्रत देणे किंवा पठाण अकबर खाँन पठाण मुस्तफा खाँन यांना आपले ग्रामपंचायत कार्यालय अर्धापूर तर्फे १) ग्रामविकास अधिकारी साहेब यांचे सहीनिसी व येथीलच सरपंच साहेब खुरेशी साहेब यांचे पण सहीनिसी त्यांना रहीवासी प्रमाणपत्र दीलेले आहे काय त्या बाबतची सत्यप्रतीत माहिती देणे ".

(अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतलेला आहे.)

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १७-०३-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले.  अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०५-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व अपिलार्थीस १० दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.  तथापि या कालावधीत माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, अर्धापूर यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी त्यांच्याकडे व्यक्तिशः कधीही उपस्थित झाले नाहीत व त्यांनी जन

अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर त्यांनी दिनांक १०-०५-२००९ रोजी त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यामार्फत अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती देऊ केली असता, अपिलार्थीने ही माहिती घेण्यास नाकारले. त्यामुळे त्यांनी स्वतः अपिलार्थीस दिनांक २८-०४-२०१० रोजी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जामधील काही भागाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरावा मागितला असल्याचे आढळून येत आहे. येथे असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकाऱ्याकडे ज्या स्वरुपात सार्वजनिक माहिती उपलब्ध आहे ती त्याच स्वरुपात देण्याची तरतूद माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये आहे. अर्जदाराने कोणत्याही बाबतीत अथवा त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात अशाप्रकारचा पुरावा मागण्याची तरतूद या अधिनियमामध्ये नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक १०-०५-२००९ रोजी माहिती देऊ केली असता, ही माहिती घेण्याचे अपिलार्थीने नाकारले. या जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोग मान्य करित आहे. तरीही या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २८-०४-२०१० रोजी त्रयस्थ पक्ष श्री. पठाण अकबर खाँन पठाण मुस्तफा खाँन यांना त्यांच्या कार्यालयाने दिलेल्या रहिवासी प्रमाणपत्राच्या प्रती विनामूल्य पुरविल्या आहेत. अपिलार्थीने ही माहिती प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ त्यांची पोचसही देखील जन माहिती अधिकारी यांना दिलेली आहे.

हे पाहता, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर प्रत्यक्षात प्राप्त झाली असल्याचे सिध्द होत असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. स. मंजुर अली स. खुर्शीद अली, रा. बरकतपुरा, अर्धापूर, ता. अर्धापूर, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११७३
निर्णय दिनांक ०७-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शरद गणपत भोकरे,<br>रा. एच. आय. जी. - १, सेक्टर बी - ८२,<br>ठाकरेनगर, एन-२, सिडको, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी, सजा सातारा, जि. औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>तहसील कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०६-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०७-०५-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे व याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील

क्रमांक ११७३/२००९ ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या अर्जामध्ये अखेरीस अपिलार्थीने सदर अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती आयोगास केलेली आहे.

अपिलार्थीच्या या पत्राचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर निर्णय देण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक ११७३/२००९, दिनांक ०१-०६-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शरद गणपत भोकरे, रा. एच. आय. जी. - १, सेक्टर बी - ८२, ठाकरेनगर, एन-२, सिडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा सातारा, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११७७

निर्णय दिनांक ०७-०५-२०१०

१ श्री. जितेंद्र नागोराव इचके, : अपिलार्थी
रमाबाईनगर, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय, गंगाखेड,
तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच तहसीलदार, गंगाखेड यांनी आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २६-०४-२०१० रोजीचे पत्र जे, आयोगास दिनांक ०३-०५-२०१० रोजी प्राप्त झाले ते सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये तहसीलदार, गंगाखेड यांनी अपिलार्थीस माहिती मिळाल्यापुष्ट्यर्थ अपिलार्थीचे त्यांना उद्देशून लिहिलेले दिनांक २३-०४-२०१० रोजीचे पत्र सादर केले आहे. अपिलार्थीने तहसीलदार, गंगाखेड यांना उद्देशून लिहिलेल्या या पत्रामध्ये त्यांना आवश्यक असलेली माहिती दिनांक २३-०४-२०१० रोजी संबंधितांकडून प्राप्त झाली असल्याचे व प्राप्त माहितीने त्यांचे समाधान झाले असल्याचे नमूद केले आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने तहसीलदार, गंगाखेड यांच्याकडे त्यांचा अर्ज निकाली काढण्याची विनंती केली आहे.

तहसीलदार, गंगाखेड यांच्या आयोगास उद्देशून लिहिलेल्या दिनांक २६-०४-२०१० रोजीच्या पत्राव्दारे, अपिलार्थीने तहसीलदार, गंगाखेड यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक २३-०४-२०१० रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती संबंधितांकडून प्राप्त झाली असल्यामुळे, अपिलार्थीच्या आयोगाकडील विचाराधीन अपील अर्जावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन उरत नाही. सबब, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जितेंद्र नागोराव इचके, रमाबाईनगर, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३०३

निर्णय दिनांक ०७-०५-२०१०

१ श्री. बालासाहेब सुदामराव सोळंके, : अपिलार्थी
रा. मोहखेड, तालुका धारुर,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, केज, तालुका
केज, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड

त्रयस्थ पक्ष : श्री. डी. डी. शिनगारे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने, त्यांनी या प्रकरणी मागणी केलेल्या माहितीची त्यांना आता आवश्यकता नसल्याने, त्यांनी आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील ते मागे घेत

असल्याचे नमूद केले आहे. खुद्द अपिलार्थीस त्यांनी या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आता आवश्यकता नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बालासाहेब सुदामराव सोळंके, रा. मोहखेड, तालुका धारुर, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, केज, तालुका केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २३०४/०८, २३०५/०८, २३०६/०८, २३०७/०८, २३०८/०८ व २३०९/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३०४/०८, २३०५/०८, २३०६/०८, २३०७/०८, २३०८/०८ व २३०९/०८

निर्णय दिनांक ०७-०५-२०१०

१ श्री. विलास किसनराव समुद्रे, : अपिलार्थी
व्दारा, कृषि उत्पन्न बाजार समिती, केज, तालुका केज,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ <u>अपील क्रमांक २३०४/२००८</u>
जन माहिती अधिकारी
तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

२ <u>अपील क्रमांक २३०५/२००८</u>
जन माहिती अधिकारी
तथा प्रशासक, कृषि उत्पन्न बाजार समिती, वडवणी,
तालुका वडवणी, जिल्हा बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक निबंधक, सहकारी संस्था, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड

३ <u>अपील क्रमांक २३०६/२००८</u>
जन माहिती अधिकारी
तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, वडवणी /
माजलगांव, जिल्हा बीड

४ <u>अपील क्रमांक २३०७/२००८</u>

जन माहिती अधिकारी

तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, माजलगांव,

तालुका माजलगांव, जिल्हा बीड

५ <u>अपील क्रमांक २३०८/२००८</u>

जन माहिती अधिकारी

तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, वडवणी, तालुका

वडवणी, जिल्हा बीड

६ <u>अपील क्रमांक २३०९/२००८</u>

जन माहिती अधिकारी

तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, माजलगांव,

तालुका माजलगांव, जिल्हा बीड

७ अपील क्रमांक २३०४ ते २३०९/२००८ : प्रतिवादी

जन अपिलीय अधिकारी

तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| त्रयस्थ पक्ष | अपील क्र. २३०४/०८ | : | श्री. देवराव भुजंगराव फुके, श्री. शिवाजी आण्णासाहेब शिंदे |
| | अपील क्र. २३०५/०८ | : | श्री. एस. ए. शिंदे |
| | अपील क्र. २३०६/०८ | : | श्री. डी. बी. फुके, श्री. एस. ए. शिंदे |
| | अपील क्र. २३०७/०८ | : | श्री. डी. बी. फुके, श्री. बालासाहेब सुदामराव सोळुंके, श्री. निर्मळ |
| | अपील क्र. २३०९/०८ | : | श्री. शिवाजी आण्णासाहेब शिंदे |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०६-२००८ रोजी नोंदविलेली पाच स्वतंत्र व्दितीय अपिले आणि दिनांक २५-०८-२००८ रोजी नोंदविलेले एक स्वतंत्र

व्दितीय अपील (अपील क्रमांक २३०८/२००८) अशी एकूण सहा व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी सर्व अपिलांशी संबंधित अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष (अपील क्रमांक २३०७/२००८ शी संबधित श्री. निर्मळ वगळता) हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना या सर्व अपील प्रकरणी आता माहितीची आवश्यकता राहिली नसल्यामुळे, ते ही सर्व अपिले परत घेत आहेत. त्यांच्या या युक्तिवादाच्याप्रीत्यर्थ त्यांनी आयोगास दिनांक ०३-०४-२०१० रोजी लिहिलेल्या पत्रांच्या प्रती सादर केल्या आहेत.

वरील वस्तुस्थिती पाहता, आता अपिलार्थीने विचाराधीन सर्व अपिले परत घेतली असल्यामुळे, ती सर्व अपिले खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २३०४/०८, २३०५/०८, २३०६/०८, २३०७/०८ व २३०९/०८ खारीज करण्यात येत आहेत.
२. अपील क्रमांक २३०८/२००८, दिनांक २५-०८-२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विलास किसनराव समुद्रे, व्दारा, कृषि उत्पन्न बाजार समिती, केज, तालुका केज, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, वडवणी / माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन माहिती अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११७९
निर्णय दिनांक: १०-०५-२०१०

१. श्रीमती शकुंतला चंद्रसेन बोंदर, : अपिलार्थी
रा. कळंब, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तहसील कार्यालय, कळंब, जि. उस्मनाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, भूम, जि.उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल-१),
तहसील कार्यालय, कळंब,जि.उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, कळंब,जि.उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जाची छाननी केली असता, या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने अशाच माहितीकरिता आयोगाकडे वेळोवेळी द्वितीय अपिले सादर केलेली आहेत. अपिलार्थीच्या अशाच प्रकारच्या अन्य एका अपील अर्जावर आयोगाने दि. २२.०४.२०१० रोजी निर्णय दिला आहे. त्याचप्रमाणे आज

रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या पतीस देय असणाऱ्या सेवानिवृत्तीविषयक लाभाच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. सदरची माहिती व त्यांच्या पतीचे सेवानिवृत्ती वेतनविषयक लाभ अपिलार्थीस अदा करण्यात आले आहेत. अपिलार्थीच्या विचाराधीन प्रकरणी मागितलेल्या माहितीचे व आयोगाकडे यापूर्वी दि.२२.०४.२०१० रोजी झालेल्या अपील प्रकरणी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप एकसारखेच असल्याचे दिसून येत आहे. तसेच विचाराधीन अपील प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने या प्रकरणी नव्याने विचार करण्याचे आयोगास कोणतेही प्रयोजन आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १०-०५-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती शकुंतला चंद्रसेन बोंदर,रा.महसूल कॉलनी,कळंब, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१),तहसील कार्यालय, कळंब,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, कळंब,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११८०
निर्णय दिनांक: १०-०५-२०१०

१. श्री. श्रीकिशन विश्वनाथ पवार, : अपिलार्थी
रा. अंबाजोगाई, जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, भूम, जि. उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, भूम, जि.उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार, भूम, जि.उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, भूम, जि.उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०२.२००९रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतरही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दि. १९.०७.२००७ ते ०८.०९.२००८ पर्यंत कोर्टाच्या निकालाच्या प्रतीबरोबर फेर ओढून ऊस अनुदान मिळणेसंदर्भात केलेल्या अर्जांच्या छायाप्रतींची मागणी व्यक्तिशः केली होती. तथापि अपेक्षित माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम

१९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दि. १०.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२५.११.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत माहिती देण्याचे तहसीलदार,भूम तथा जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले व ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वारंवार उपस्थित राहूनही त्यांना अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याचे आयोगास स्पष्ट केले. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीस आयोगाने, ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधी उपस्थित राहिले, यासंदर्भात एखादा पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध आहे काय, अशी विचारणा केली असता त्यास अपिलार्थीने आयोगास नकारार्थी उत्तर दिले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहिती अधिकाराच्या तरतुदीखाली जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केला होता त्यावेळी माहिती अधिकारी म्हणून तत्कालीन तहसीलदार,भूम श्री. राठोड हे कार्यरत होते. त्यांनी अपिलार्थीस, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती न देण्याचे कारण त्यांना आता सांगता येणार नाही. तथापि या प्रकरणी संबंधित तलाठयाने असा खुलासा सादर केला की, अपिलार्थीस ऊस

अनुदान न मिळण्याचे कारण म्हणजे अपिलार्थीची पंचनाम्याच्या वेळेची अनुपस्थिती हे होय. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली त्यांच्या अनुदानाच्या अर्जाची प्रत आता ते अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो कोणतीही माहिती पुरविली नसल्याचे आयोगासमोर मान्य केले.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितलेली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर माहितीसाठीच्या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्त्व हे संबंधित अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे अशाप्रकारचे त्यांचे उत्तरदायित्त्व योग्य प्रकारे पार पाडले असल्याचा कोणताही पुरावा आयोगास सादर केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेळोवेळी उपस्थित राहिले, हा त्यांचा युक्तिवाद आयोग फेटाळून लावत आहे. तथापि या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.११.२००८ रोजी दिलेल्या निर्णयाचे अवलोकन करता असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तर मूळात माहिती दिली नाही, परंतु अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी त्यांचा प्रतिनिधी या सुनावणीसाठी पाठविण्याचे सौजन्य देखील त्यांनी या प्रकरणी दाखविलेले नाही. जन अपिलीय अधिकारी यांचे दि. २५.११.२००८ रोजीचे आदेश जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाले आहेत. परंतु तरीही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याचे सध्याच्या जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन सिध्द होत आहे.त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,भूम, श्री. राठोड डी.एच. (सध्या

तहसीलदार,अहमदपूर,जि.लातूर या पदावर कार्यरत) यांनी असद्हेतूने टाळाटाळ केल्याचे सिध्द होत आहे.या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असूनही, अपिलार्थीस ती देण्याचे टाळून त्यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (महसूल) यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० (२) च्या तरतुदीनुसार करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपरोक्त कालावधीमध्ये हे आदेश निर्गमित झाल्यापासून आठ दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,भूम, श्री. राठोड डी.एच. (सध्या तहसीलदार,अहमदपूर,जि.लातूर या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १०-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्रीकिशन विश्वनाथ पवार,राजा बन्सीलालनगर, अंबाजोगाई, जि. बीड-४३१ ५१७.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. श्री. राठोड डी.एच., तहसीलदार,अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

४. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, भूम, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११८१
निर्णय दिनांकः १०-०५-२०१०

१. श्री. वसंत संपतराव मुंडे, : अपिलार्थी
रा. परळी वै., जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, गंगाखेड, जि.परभणी

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उपविभागीय अधिकारी, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, जन अपिलीय अधिकारी यांनी निकाल देऊनही, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३०.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष,श्री. जी.एन.तापडिया यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये त्यांच्या सर्व खदानीच्या रॉयल्टीपोटी भरणा केलेली रक्कम व बाकी रक्कम, अशी

माहिती रजिस्टर्ड टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी दि.०१.०१.२००६ ते ३१.०८.२००८ असा होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात दि. ११.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदरचा अपील अर्ज जिल्हाधिकारी,परभणी यांना उद्देशून केला होता. जिल्हाधिकारी,परभणी यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडील दि. १८.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे उपविभागीय अधिकारी, परभणी यांच्याकडे पाठविला. तथापि उपविभागीय अधिकारी, परभणी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व  जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीने या प्रकरणी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पोस्टाने पाठविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी तहसीलदार, गंगाखेड यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या विनादिनांकाचे पत्र आयोगास दाखविले व तसेच अपिलार्थीस ही माहिती दि. २१.०४.२०१० रोजी प्राप्त झाल्याचा पुरावा म्हणून रजिस्टर्ड पोस्टाची पावती आयोगासमोर सादर केली. या पावतीवरुन श्री. आबाजी मुंडे नावाच्या व्यक्तीस जन माहिती अधिकारी यांनी पोस्टाद्वारे पाठविलेले कथित माहितीचे पाकीट प्राप्त झाले आहे, एवढाच मुद्दा सिध्द होत आहे.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी

अपिलार्थीने त्यांच्या दि. ३०.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगाखेड यांच्याकडे मागणी केलेली त्रयस्थ पक्षाच्या संदर्भातील माहिती ही, सार्वजनिक स्वरुपाची होती, त्यामुळे ती माहिती अपिलार्थीस उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षास कोणताही प्रत्यवाय नव्हता. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. त्यामुळे अपिलार्थीने स्वत: येऊन जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती घेऊन जावी, अशीही अपेक्षा करण्याचा प्रश्न या प्रकरणी नव्हता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप हे अत्यंत मर्यादित असे आहे. तथापि एवढे असूनही अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास तत्कालीन तहसीलदार,गंगाखेड तथा जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत तर कोणताही प्रतिसाद दिला नाही. तथापि नंतरही अपिलार्थीस जी माहिती त्यांच्या कार्यालयाकडील पत्राद्वारे पाठविल्याचा दावा त्यांचे प्रतिनिधी करीत आहेत, त्या पत्रावर तहसीलदार,गंगाखेड यांच्या कार्यालयाचा क्रमांक व दिनांकाचा देखील उल्लेख नाही. यावरुन तहसीलदार,गंगाखेड यांनी अपिलार्थीस खरोखरीच ही माहिती पाठविली आहे किंवा कसे याबाबत आयोगाच्या मनात संदेह निर्माण होत आहे. सबब तहसीलदार,गंगाखेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दि. ३०.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत रजिस्टर्ड टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस माहिती पुरविताना त्यांच्या कार्यालयाचा जावक क्रमांक व दिनांकाचा उल्लेख त्यांनी या पत्रावर न चुकता करावा.

तहसीलदार,गंगाखेड यांनी आयोगास उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या जा.क्र.२०१०/जमाबंदी/कावि. या पत्रावर तारखेचा उल्लेख नाही. यावरुन तहसीलदार,गंगाखेड यांच्या कार्यालयातील पत्रव्यवहार किती बेजबाबदारपणे चालू आहे, याची कल्पना कोणासही येईल.वरील परिच्छेदात स्पष्ट केलेली वस्तुस्थिती लक्षात घेता, या प्रकरणी तत्कालीन जन माहिती

अधिकारी तथा तहसीलदार,गंगाखेड यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न पुरवून त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे.तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तर या प्रकरणी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतचा अभाव स्पष्ट केलेला आहेच. परंतु सध्याचे जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,गंगाखेड यांनी देखील आयोगाशी आणि अपिलार्थीशी केलेल्या पत्रव्यवहारावरुन ते माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासंदर्भात फारसे गंभीर असावेत, असे आयोगास वाटत नाही. त्यांनी (सध्याचे जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,गंगाखेड) आपल्या अशाप्रकारच्या बेजबाबदार कायशैलीस वेळीच लगाम घालावा, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे आणि सचिव (महसूल) यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगाखेड यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरवून दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात सध्याचे तहसीलदार, गंगाखेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दि. ३०.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत, वर सूचित केल्याप्रमाणे, विनामूल्य व नोंदणीकृत टपालाद्वारे पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाद्वारे पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,गंगाखेड,जि. परभणी (दि.३०.०८.२००८ रोजी व तदनंतर तीस दिवसाच्या कालावधीपर्यंत कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १०-०५-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वसंत संपतराव मुंडे, गौरीकुंज, मार्केट, परळी वै., जि.बीड-४३१ ५१५.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,गंगाखेड,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८०८

निर्णय दिनांक १०-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शामराव नारायणराव नागरगोजे,<br>रा. यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाजवळ, म्यु. घर. नं. १-२-१७०, आनंदनगर, कॅनॉल रोड (द.), बीड, ता. जि. बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, (महसूल), तहसील कार्यालय, पाटोदा, जि. बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पाटोदा, जि. बीड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २६-०९-२००८ रोजीच्या पत्राद्वारे देण्याचे नाकारले. त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०१-११-२००८ रोजी प्रथम अपील केल्यानंतर या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ७ दिवसाच्या

आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ३१-१२-२००८ रोजी माहिती पुरविली. परंतु जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली ही माहिती अपूर्ण असल्यामुळे आणि त्यामध्ये त्यांच्या मूळ अर्जातील ३ मुद्यांसदर्भातील माहितीचा समावेश नसल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, तलाठी, सजा, थेरला, तालुका पाटोदा यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १२३७/- इतके मनीऑर्डरने पाठविले होते. या शुल्काच्या संदर्भात त्यांनी या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ५ मुद्यांद्वारे माहितीची मागणी केली होती. या मुद्यांची माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-११-२००८ रोजी प्रथम अपील केल्यानंतर, प्राप्त झाली. तथापि प्राप्त माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३ व ५ शी संबंधित माहितीचा समावेश नसल्यामुळे, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आणि जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३ व ५ शी संबंधित माहिती मिळालेली नाही, ती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्वरित हवी आहे. आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकाऱ्याने या प्रकरणी माहिती देण्याचे नाकारले

असल्यामुळे, त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची विनंती अपिलार्थीने आयोगाकडे केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती संबंधित तलाठ्याने दिनांक ३१-१२-२००८ रोजी देऊन अपिलार्थीस पूर्वीच्या प्रकरणात त्यांनी मनीऑर्डरद्वारे भरलेले शुल्क रु. १२९९/- इतके त्यांना संबंधित तलाठ्याने दिनांक १९-०३-२०१० रोजी परत केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३ व ५ च्या संदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने, व्दितीय अपील केले आहे आणि ही माहिती त्यांना आजही आवश्यक आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "सदरील तलाठ्याने शासनाकडे उपरोक्त रक्कम जमा केली नसल्यास ती त्यांच्या हातावरच आहे काय? तलाठी या नात्याने त्यास त्यांचे हातावर अशी किती रक्कम ठेवता येते? तसेच ती अशी किती दिवस ठेवता येते? कुठल्या कारणामुळे तलाठी अशी रक्कम हातावर ठेवू शकतो ", अशी माहिती मागविली होती. या मुद्याचे अवलोकन केले असता, या सर्व उपमुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचा खुलासा व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागविल्याचे आयोगास आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबद्दलचे कारण अथवा स्पष्टीकरण अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या कृतीबद्दलचे स्पष्टीकरण अथवा खुलासा देणे अशा प्रकारच्या प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत नाहीत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती उपलब्ध आहे तीच माहिती अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार

देण्याबाबत कार्यवाही करणे इतपत सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ द्वारे, "दिनांक ०१-०७-२००८ रोजी मा. तहसीलदार, पाटोदा यांनी मी दाखल केलेल्या माहिती अधिकारातील अपिलाचा निकाल दिला. सदर आदेशात त्यांनी तलाठी सजा थेरला यांना २४ तासाच्या आत माहिती पुरविण्याचे आणि मनीऑर्डरने स्वीकारलेली फीस शासन जमा करण्याचे आदेश दिले. तहसीलदाराचा हा आदेश संबंधित तलाठ्याला कोणत्या तारखेस पोहचला, याबाबतची माहिती देऊन संबंधित तलाठ्याने रक्कम रु. १२३७/- ही तहसीलदाराच्या आदेशाप्रमाणे शासन जमा केली आहे किंवा नाही, " अशी माहिती मागविली आहे. या माहितीचे अवलोकन केले असता वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे या मुद्यातील अपिलार्थीस तहसीलदाराचा आदेश तलाठ्यास कोणत्या तारखेस पोहचला एवढीच माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. या मुद्याच्या उर्वरित सर्व भागावरील माहिती अपिलार्थीस वरील परिच्छेदात नमूद केलेल्या कारणास्तव जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ५ द्वारे अपिलार्थीने, "तहसीलदारांच्या आदेशाप्रमाणे २४ तासात ही रक्कम तलाठ्याने शासन जमा केली नसल्यास आर्थिक अफरा - तफरीबाबत काही कारवाई करावी लागली काय, या बाबतची माहिती देऊन तलाठ्याने सदरील रक्कम इतके प्रचंड दिवस हातावर ठेवून अर्जदारास माहिती देखील न देऊन अपहार झालेला आहे काय? याबाबतची माहिती द्यावी. तसेच तहसील कार्यालयाने संबंधित तलाठ्यावर याबबतीत काय कार्यवाही केली आहे, याची माहिती द्यावी, " अशी माहिती मागविली आहे. या मुद्याचे अवलोकन केले असता, संबंधित तलाठ्यावर तहसीलदाराने केलेली कार्यवाही हा मुद्दा वगळता अपिलार्थीस वरील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात दिलेल्या स्पष्टीकरणाप्रमाणे, या कथित कार्यवाही व्यतिरिक्त उर्वरित

माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामधील त्यांना अपेक्षित असलेली माहिती आणि प्रत्यक्षात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असलेली माहिती याचे मागील परिच्छेदामध्ये केलेले पृथःकरण पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मधील, तहसीलदाराचा दिनांक ०१-०७-२००८ रोजीचा आदेश संबंधित तलाठ्यास कोणत्या तारखेस पोहचला व मुद्दा क्र. ५ मधील, या प्रकरणी तहसीलदाराने संबंधित तलाठ्यावर कोणती कार्यवाही केली या दोन मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना आता ती अपिलार्थीस शीघ्र टपालाद्वारे पुरवावी लागेल. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार तहसीलदार, पाटोदा यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ५ शी संबंधित वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत शीघ्र टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करुन त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेशित करावे, अशी आयोगास विनंती केली आहे. या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या दिनांक ०५-०९-२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-०९-२००८ रोजी त्यांच्या सद्सदविवेकबुध्दिला स्मरुन उत्तर दिलेले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, पाटोदा यांनी अपिलार्थीस दिनांक २६-०९-२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेले उत्तर याचे आयोगाने अवलोकन केले असता, यावरुन जन माहिती

अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे कोणत्याही असद्‌हेतूने टाळले असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. त्यामुळे अपिलार्थीची, जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची व शिस्तभंग-विषयक कारवाई आदेशित करण्याची विनंती, आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ५ मधील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत शीघ्र टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शामराव नारायणराव नागरगोजे, रा. यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाजवळ, म्यु. घर. नं. १-२-१७०, आनंदनगर, कॅनॉल रोड (द.), बीड, ता. जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, (महसूल), तहसील कार्यालय, पाटोदा, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पाटोदा, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११७८

निर्णय दिनांक १०-०५-२०१०

१ श्री. साळुंके कैलास प्रभाकर, : अपिलार्थी

मु. पो. गोलटगांव, ता. जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. गिरधर नारायण साळुंके

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे गोलटगांव, तालुका जिल्हा औरंगाबाद येथील सर्वे नंबर ३१२

गट क्रमांक ६४७ मधील श्री. गिरधर नारायण साळुंके यांच्या जमिनीचा नकाशा, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस या संदर्भात कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी आपल्या युक्तिवादामध्ये कायम ठेवून, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर नियमाप्रमाणे कारवाई व्हावी, अशी आयोगास विनंती केली. अपिलार्थीने आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांनी माहिती अधिकाराखाली मागणी केलेल्या माहितीची त्यांना एका न्यायालयीन प्रकरणी आवश्यकता होती. जन माहिती अधिकाऱ्याने त्यांना विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे या न्यायालयीन प्रकरणी त्यांची हानी झाली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या कार्यालयाकडे माहितीची मागणी केली होती त्यावेळी, ते या पदावर कार्यरत नव्हते. त्यावेळी जन माहिती अधिकारी म्हणून मुख्यालय सहायक या पदावर असलेले श्री. इक्बाल सलीम हे जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नाही किंवा सदरची बाब वरिष्ठांच्या

निदर्शनास आणून दिली नाही. आजच्या सुनावणीसाठी हजर राहण्याची त्यांना विनंती करुन त्यांनी आयोगाकडील सुनावणीस येण्याचे टाळले आहे. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी आता बरोबर आणली असून, ही माहिती ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यासाठी तयार आहेत. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाकरिता त्यांच्या कार्यालयातील मुख्यालय सहायक श्री. इक्बाल सलीम हे पूर्णतः जबाबदार आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते आता अपिलार्थीस विनामूल्य देण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असून, ती आता जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस विनामूल्य देण्यासाठी तयार आहेत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत स्पीड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न होण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील मुख्यालय सहायक श्री. इक्बाल सलीम हे जबाबदार आहेत. त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नाही आणि या प्रकरणी अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपिलासंदर्भात वरिष्ठांना कोणतीही कल्पना दिली नाही. आयोगास या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यावरील प्रथम अपील अर्ज हे दोन तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांना उद्देशून केले आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सहायक / अधिकारी यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी

तरतूद आहे. हे पाहता, या प्रकरणी श्री. इक्बाल सलीम यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन व तसेच अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची वरिष्ठांना कल्पना न देऊन अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्याच्या प्रक्रियेमध्ये अडथळे आणले आहेत. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब उप संचालक, भूमी अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कर्मचारी श्री. इक्बाल सलीम, मुख्यालय सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत स्पीड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत स्पीड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. उपसंचालक, भूमी अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी श्री. इक्बाल सलीम, मुख्यालय सहायक, औरंगाबाद यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. साळुंके कैलास प्रभाकर, मु. पो. गोलटगांव, ता. जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ उपसंचालक, भूमी अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२९३

निर्णय दिनांक १०-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. ज्ञानदेव विठोबा लाड,<br>रा. तलवाडा, तालुका गेवराई, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>कार्यकारी दंडाधिकारी, तहसील कार्यालय, गेवराई,<br>तालुका गेवराई, जिल्हा बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका<br>गेवराई, जिल्हा बीड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी १५८ पृष्ठाची माहिती देऊन, त्यांच्याकडून माहितीपोटीचे शुल्क रुपये ३८० इतके भरुन घेण्यात आले. त्यांनी मूळ अर्जात मागणी केलेल्या माहितीतील, किती लोकांच्यावर चॅप्टर केसेस केल्या त्याची संख्या जन माहिती अधिकारी यांनी दिली नाही आणि त्यांच्या माहितीची लेखी उत्तरे

आणि संबंधित व्यक्तींना जेलमध्ये पाठविण्याची कारणे, ही माहिती अपिलार्थीस पुरविली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी संचिकाच्या प्रती प्रमाणित करुन दिल्यामुळे, अपिलार्थीस विनाकारण खर्चाचा भूर्दंड बसला, तसेच त्यांना सदरची माहिती तलवाडा सजाच्या तलाठी कार्यालयात काम करणारा इसम श्री. किसन देवरा मत्रे यांच्याकडून दिनांक ०७-०९-२००८ रोजी प्राप्त झाली, या सर्व प्रकरणामध्ये त्यांना मुदतीत माहिती मिळाली नाही. संबंधित व्यक्तींना जेलमध्ये पाठविण्याची कारणे त्यांना समजू शकली नाहीत त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर दिनांक १०-०६-२००८ पासून आजपर्यंत प्रतिदिनी २५० रुपये याप्रमाणे शास्ती लावण्यात यावी आणि अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द एक महिन्याच्या आत शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, तलवाडा पोलीस स्टेशन यांच्याकडे दिनांक ०१-०३-२००८ ते ३१-०३-२००८ या कालावधीमध्ये किती लोकांच्यावर चॅप्टर केसेस दाखल झाल्या त्यांची नावे, फिर्यादींची नावे, त्यापैकी किती लोकांना जामिनावर सोडले, किती लोकांना जेलमध्ये पाठविण्यात आले त्यांची नावे, जेलमध्ये पाठविण्याची कारणे व तसेच संबंधितांनी किती तारखांना हजे-या दिल्या त्या हजेरींच्या पानांच्या प्रमाणीत प्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी केली नसल्याचे कारण दर्शवून, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार तहसीलदार, गेवराई यांच्याकडे दिनांक १५-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०८-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसात माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने

व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडील दिनांक २२-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस ही माहिती सशुल्क पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ ही माहिती अपिलार्थीस दिनांक ०१-०९-२००८ रोजी प्राप्त झाल्याची पोचसही जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास दाखविली. तसेच त्यांनी अपिलार्थीने रुपये ३८० इतके शुल्क चलनाव्दारे भरल्याचे देखील आयोगास अवगत केले. त्यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती मागितली आहे, ती संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली आहे. अपिलार्थीस ही माहिती प्रत्यक्षात दाखविली असता, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यातून जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेतली. अपिलार्थीस त्यांनी एकूण १९० पृष्ठांची माहिती दिली व तसेच अपिलार्थीस साक्षांकीत स्वरुपात माहिती देण्यासाठी त्यांनी कोणताही जादा आकार लावलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती सशुल्क पुरविली आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चकलांबा पोलीस स्टेशनच्या ६४ व गेवराई पोलीस स्टेशनच्या ५२ पानांच्या नकला, अशा एकूण चॅप्टर केसशी संबंधीत

११६ पानांच्या नकला त्यांना मागणी न करताही पुरविल्या आहेत असे नमूद केले आहे. तथापि ही बाब आवश्यक त्या पुराव्याअभावी आज रोजी आयोगासमोर सिध्द होऊ शकली नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून संबंधित व्यक्तींना जेलमध्ये पाठविण्याची कारणे, ही माहिती प्राप्त झाली नाही असे नमूद केले आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करणे इतपत सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांनी घेतलेले निर्णय अथवा त्यांच्या कृतीबद्दलची स्पष्टीकरणे व कृतीबद्दलची कारणे अर्जदारास देणे हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अभिप्रेत नसल्यामुळे, संबधित व्यक्तींना जेलमध्ये पाठविण्याची कारणे, ही माहिती अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ' व्यक्तिशः ' माहितीची मागणी केल्यानंतर, या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्व संबंधित अर्जदाराचे असते. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे हे अपेक्षित उत्तरदायित्व पार पाडल्यासंदर्भात कोणताही सबळ पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही किंवा त्यांचा हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत हे पाहता, अपिलार्थीस मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही हा त्यांचा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे. अर्जदारास प्रमाणित प्रती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही अतिरिक्त शुल्क अपिलार्थीस आकारलेले नाही. अशा प्रकारे अपिलार्थीने ज्या कारणास्तव आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज केला आहे ती सर्व कारणे निकाली निघत असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

<u>**आदेश**</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक १०-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. ज्ञानदेव विठोबा लाड, रा. तलवाडा, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२९४

निर्णय दिनांक १०-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. ज्ञानोबा संतराम साळवे व इतर,<br>व्दारा, श्री. अशोक संतराम साळवे,<br>रॉकेल कॉलनी, पंचायत समितीसमोर, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड,<br>तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), तथा दंडाधिकारी कार्यालय, परभणी | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो तहसीलदार, गंगाखेड यांच्या आदेश क्रमांक ९३/आरओ/आर.सी.आर.

दिनांक १३-११-१९९३ च्या आदेशाची छायांकीत प्रत, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही तहसीलदार, गंगाखेड यांनी दिली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सरकारी जमीन महाराचा हाडोळा, सर्व्हे नंबर ४७ मौजे गंगाखेड यासंदर्भात काही माहिती एकूण दोन मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सरकारी सर्व्हे नंबर ४७ च्या ७/१२ नक्कल व फेरफार क्रमांक २३३८, दिनांक ०१-१२-१९९३ ची सर्व कागदपत्रे - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अथवा व्यक्तिशः अशा दोनही माध्यमाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहीत केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०९-२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित त्यांनी मागणी केलेली माहिती दिनांक २०-०४-२०१० रोजी टपालाव्दारे

पुरविली आहे. ही माहिती अपिलार्थीस दिनांक २७-०४-२०१० रोजी प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीची पोचसही त्यांनी आयोगास सादर केली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १३-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २०-०४-२०१० रोजी म्हणजेच ११ महिन्याच्या विलंबाने प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी सकृतदर्शनी सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत, तथापि या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १३-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस प्राप्त होण्यासाठी एकूण ११ महिन्याचा केलेला विलंब हा तहसीलदार, गंगाखेड यांच्या कार्यालयास निश्चितपणे भूषणावह नाही. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मधील तरतुदींचा भंग करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० (२) च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविण्यासाठी जबाबदार असणा-या तहसीलदार, गंगाखेड व त्यांच्या कार्यालयातील सर्व संबंधित कर्मचा-यांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची जिल्हाधिकारी, परभणी यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जिल्हाधिकारी, परभणी यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी आणि त्यांचे सर्व संबंधित सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१	श्री. ज्ञानोबा संतराम साळवे व इतर, व्दारा, श्री. अशोक संतराम साळवे, रॉकेल कॉलनी, पंचायत समितीसमोर, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२	जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२९५

निर्णय दिनांक १०-०५-२०१०

१ श्री. श्रीनिवास धोंडिराम मुंडे, : अपिलार्थी
मु. पो. पांगरी, तालुका परळी, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी
वैजनाथ, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,
तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

त्रयस्थ पक्ष : श्री. परमेश्वर रंगनाथ गित्ते व श्री. महादेव बंकट मुंडे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०५-२००८ रोजी माहितीसाठीचा अर्ज केला होता, तथापि संबंधितांकडून अपूर्ण माहिती मिळाल्याने, त्यांनी दिनांक ३१-०७-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे

प्रथम अपील केले असता, त्यांनी अद्यापपावेतो कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. परमेश्वर रंगनाथ गित्ते व श्री. महादेव बंकट मुंडे यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००२ ते ३१-०५-२००८ या कालावधीमध्ये, महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम २००२ व केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायद्याअंतर्गत माहिती मिळण्याबाबत केलेल्या अर्जाच्या व तक्रार अर्जाच्या सर्व प्रती आणि माहितीपोटी भरणा केलेले शुल्क, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती अपिलार्थीस पुरविली, तथापि ही माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०८-२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सहायक माहिती अधिकारी श्रीमती परवीन पठाण यांना सूचित केले. श्रीमती परवीन पठाण यांनी दिनांक २३-०८-२००८ रोजी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन दिली. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष गैरहजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस या प्रकरणी दिनांक २१-०६-२००८ व दिनांक २३-०८-२००८ रोजी आवश्यक ती संपूर्ण माहिती विनामूल्य व व्यक्तिशः पुरविली आहे. तथापि प्राप्त माहितीमध्ये श्री. महादेव बंकट मुंडे नावाच्या व्यक्तिने केलेल्या तक्रार अर्जाची प्रत उपलब्ध नसल्याने, अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर समाधान झाले नाही आणि त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. त्यांच्याकडील सर्व अभिलेख्याचा शोध घेतला असता श्री. महादेव बंकट मुंडे या नावाने त्यांच्या कार्यालयात केलेला तक्रार अर्ज त्यांना आढळून आला नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य दिली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न दिल्याचे कारण दर्शवून व्दितीय अपील केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २२-०८-२००८ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १४-०८-२००८ आणि दिनांक २२-०८-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि दोनही सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर होते. या सुनावणीमध्येच जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिका-यास, अपिलार्थीस श्री. परमेश्वर रंगनाथ गित्ते व श्री. महादेव बंकट मुंडे यांनी केलेल्या तक्रार अर्जाच्या प्रती देण्याचे सूचित केले होते. त्याप्रमाणे त्यांनी दुस-या दिवशी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली आहे. मूळात या प्रकरणी अपिलार्थीस ज्या तक्रार अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो अपेक्षित आहे तो तक्रार अर्ज खरोखरच जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध अथवा अस्तित्वात आहे किंवा कसे यासंदर्भात कोणताही पुरावा त्यांनी आयोगास सादर केलेला नाही, तसेच यासंदर्भात आवश्यक तो युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती

अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध संपूर्ण माहिती दिली असल्याचे अनुमान काढण्यात येत आहे. मूळात अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये अपिलीय अधिका-याने त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय दिला नाही असे अपिलाचे कारण म्हणून असत्य कारण दर्शविले आहे. अपिलार्थीच्या वर्तनातील अशा प्रकारची विसंगती व वरील वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. श्रीनिवास धोंडिराम मुंडे, मु. पो. पांगरी, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११८६

निर्णय दिनांक : ११.०५.२०१०

१. श्री. बलभीम लक्ष्मणराव जाहेर पाटील, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सचिव,
शालेय शिक्षण समिती तथा मुख्याध्यापक,
लक्ष्मणराव जाहेर प्रा. शाळा, नामलगाव फाटा, ता.जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्याध्यापक,
श्री.लक्ष्मणराव जाहेर प्रा. शाळा,
नामलगाव फाटा, ता.जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४.०६.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे आणि जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०३.२००९ रोजी सुनावणी घेऊनही लेखी आदेश न काढल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या शाळेशी संबंधित दि. ०१.०४.२००३ ते ३१.१२.२००८ या

कालावधीतील शालेय समितीच्या बैठकीच्या सूचनापत्राची नक्कल, या बैठकीच्या इतिवृत्ताची नक्कल व शाळेच्या गेल्या तीन वर्षाच्या ऑडीटेड बॅलन्स शीटच्या नकला, अशी माहिती शीघ्र टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०९.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या संस्थेच्या तीन वर्षाच्या ऑडीटेड बॅलन्स शीटच्या नकला पुरविल्या परंतु उर्वरित दोन मुद्यावरील माहिती अपिलार्थीस पुरविली नाही. त्यामुळे प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१८.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन कोणताही निर्णय लेखी स्वरुपात पारीत न केल्यामुळे, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर पुनश्च् सुनावणी घेऊन आपले आदेश लिखित स्वरुपात पारीत करणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीच्या दि. १८.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय लिखित स्वरुपात पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीच्या दि.१८.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय लिखित स्वरुपात पारीत करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक ११.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बलभीम लक्ष्मणराव जाहेर पाटील,लक्ष्मण व्हिला,पांगरी रोड,शाहुनगर,बीड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,श्री.लक्ष्मणराव जाहेर प्रा. शाळा, जाहेरनगर, नामलगाव फाटा, ता.जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११८७

निर्णय दिनांक : ११.०५.२०१०

१. श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब, रा.लातूर. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, लातूर. : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा क्रीडा उपसंचालक लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०५.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे आणि अपेक्षित माहिती मिळण्यापासून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वंचित ठेवल्यामुळे, जन अपिलीय अधिकारी यांच्या सुनावणीचा अर्थ शून्य राहिल्यामुळे व त्यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०३.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयास सन २००५-०६ ते २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीच्या संदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१६९/- इतके त्यांना शासकीय कोषागारात चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने सदरचे शुल्क दि. ३०.०१.२००९ रोजी शासकीय कोषागारात भरले. तथापि यानंतर माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०४.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.०२.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २७.०२.२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि अपिलार्थीने त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याच्या कारणास्तव वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दि. २७.०२.२००९ रोजी आवश्यक असलेली माहिती पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याची पोचसही त्यांनी आयोगास सादर केली. यावरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २७.०२.२००९ रोजी प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि.०३.०१.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती,

त्यांनी आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क रु.१६९/- जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. ३०.०१.२००९ रोजी भरल्यानंतर सदरची माहिती त्यांना उशिरात उशिरा दि. ०२.०२.२००९ रोजीपर्यंत प्राप्त होणे अधिनियमातील कलम ७(३)(क) मधील तरतुदीनुसार अनिवार्य होते. परंतु या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून दि.३०.०१.२००९ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क स्वीकारुन त्यांना दि. २७.०२.२००९ रोजी म्हणजेच, सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाल्यानंतर माहिती दिली आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.१६९/- इतके त्यांना परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, लातूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. १६९/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २७.०२.२००९ रोजी त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती दिली असल्यामुळे व प्राप्त माहितीवर अपिलार्थी यांचे कोणतेही अभिप्राय त्यांनी आजतागायत आयोगाकडे नोंदविले नसल्यामुळे, अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी,या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. १६९/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

| | |
|---|---|
| **औरंगाबाद** | **( वि. बा. बोरगे )** |
| **दिनांक ११.०५.२०१०** | **राज्य माहिती आयुक्त** |
| | **खंडपीठ औरंगाबाद** |

प्रत,

१. श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब,नगर परिषद शाळा क्रमांक-९,लातूर-४१३ ५१२.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा,लातूर विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११८८

निर्णय दिनांक : ११.०५.२०१०

१. श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम, : अपिलार्थी
रा. जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक, भूमी अभिलेख, जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक, भूमी अभिलेख, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : शिरस्तेदार,
अधीक्षक भूमी अभिलेख,जालना
यांचे कार्यालय

जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक,
भूमी अभिलेख, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०५.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलीय अधिकाऱ्याच्या निर्णयानुसार माहिती न दिल्यामुळे व संबंधितांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १२.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष, श्री. भि. धो. साबळे, कनिष्ठ लिपीक यांनी नोकरीत भरतीच्या वेळेस पूर्तता केलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रती, स्वातंत्र्यसैनिक यांनी पाल्यासंदर्भात दिलेल्या

शपथपत्राची झेरॉक्स प्रत व स्वातंत्र्यसैनिक पाल्यासंदर्भात पुरावा आणि श्री. साबळे यांच्या मूळ वास्तव्याचा पुरावा, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २४.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती त्यांना पुरविली, तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या प्रकरणी दि. २६.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०४.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती या कालावधीमध्ये प्राप्त न झाल्याने, त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दि. १८.०७.२००९ रोजी विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्यापृष्ठयर्थ अपिलार्थीची पोचसही आयोगास दाखविली. माहिती प्राप्त करुन घेताना अपिलार्थीने त्यांना संपूर्ण माहिती प्राप्त झाल्याची कबूली देऊन विचाराधीन प्रकरण बंद करण्याची अधीक्षक, भूमी अभिलेख यांना विनंती केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना विविध कार्यालयाकडून प्राप्त

करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरवावी लागणार असल्यामुळे त्यांना या प्रकरणी माहिती देण्यास विलंब लागला.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास तथ्यांश आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसतानाही त्यांनी ही माहिती जिल्हाधिकारी कार्यालय व उपसंचालक,भूमी अभिलेख कार्यालय यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती दि. १८.०७.२००९ रोजी अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीस सदरची माहिती ही त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाली असल्याने व संपूर्ण माहिती प्राप्त झाल्याबाबतची पोच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिली असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरी ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे ती अपिलार्थीस उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय नव्हता. त्याप्रमाणे त्यांनी ही माहिती अपिलार्थीस आता विनामूल्य उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम,दाना बाजार, जालना

२. जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार,अधीक्षक भूमी अभिलेख, यांचे कार्यालय जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११८९

निर्णय दिनांक : ११.०५.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. दिनकर हरिश्चंद्रराव सावंत,<br>रा.परभणी. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत पारधवाडी,<br>ता.सोनपेठ,जि.परभणी | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, सोनपेठ,जि.परभणी | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.०५.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाल्याने व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे आणि आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व विलंबाने माहिती दिल्यामुळे व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणतेही आदेश न दिल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी आणि या प्रकरणी प्रथम व द्वितीय अपील करण्यासाठी त्यांचा विनाकारण झालेला खर्च त्यांना परत मिळावा. या प्रकरणी त्यांनी आपल्या द्वितीय अपील अर्जामध्ये या खर्चाचा तपशील देऊन त्यांना या प्रकरणी रु. ६७२/- इतका खर्च झाल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १५.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायत पारधवाडी, अंगणवाडी शाळा, उपळी (बु) तांडा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, उपळी (बु) तांडा या गावाशी संबंधित काही माहिती एकूण सहा मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - ग्रामपंचायत पारधवाडीची स्थापना झाल्याची तारीख, ग्रामपंचायतीचा कारभार सुरु झाल्याची तारीख, या ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या उखळी (बु) तांडा अंगणवाडी शाळा व जिल्हा परिषद, प्राथमिक शाळा, उखळी (बु) तांडा यांच्या फेरची नक्कल, अंगणवाडी शाळा विट बांधकाम व जिल्हा परिषद, प्राथमिक शाळा विट बांधकाम यांची नोंद नमुना नं.८ च्या उताऱ्यात कोणत्या कागदपत्रांच्या आधारे सिटी सर्व्हे नं.९९ व १०० देण्यात येऊन समावेश करण्यात आला याची माहिती, ज्या कागदपत्रांच्या आधारे फेरफार करुन ग्रामपंचायत रजिस्टरमध्ये समाविष्ट करण्यात आले, त्या कागदपत्रांच्या नकला, उखळी (बु) तांडा येथे बांधलेल्या किचन शेडचे बांधकाम कोणी केले, कोणाच्या मार्फत केले, कोठे केले, कोणत्या सर्व्हेनंबरमध्ये केले, किचन शेडचे मालक कोणते शासकीय कार्यालय आहे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उखळी (बु) तांडयासमोर सन २००७ साली पाडण्यात आलेला हापसा कोणत्या सर्व्हेनंबरमध्ये पाडण्यात आला व या शाळेमध्ये असलेल्या पाण्याच्या हौदाचे बांधकाम कोणी केले, कोणाच्यामार्फत केले, कधी केले, कोणत्या सर्व्हेनंबरमध्ये केले व पाण्याच्या हौदाचे मालक कोणते शासकीय कार्यालय आहे आणि पाण्याच्या हौदाचे बांधकामाच्या अंदाजपत्रकाच्या कागदपत्राची प्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सोनपेठ यांच्याकडे दि. ०३.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.

२४.०२.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत मुद्दा क्र. १,४ व ६ शी संबंधित माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले.यानंतर जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दि. २४.०२.२००९ रोजी माहिती पुरविली. तथापि ही माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन, त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी दि. २४.०२.२००९ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या सहाही मुद्यांवरील माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. परंतु या अर्जातील मुद्दा क्र. २ व ६ शी संबंधित माहिती ही, सर्वसाधारण परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे संभवत नाही. कारण कुठल्याही जमिनीच्या फेरची नक्कल ही संबंधित गावाच्या तलाठयाकडे त्यांच्याकडील ७/१२ च्या व फेरच्या अभिलेख्यामध्ये उपलब्ध असणे अपेक्षित आहे. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ द्वारे त्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उखळी (बु) तांडा येथील पाण्याच्या हौदाच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकाची प्रत संबंधित ग्रामसेवकाकडे मागितली आहे, तथापि सदर बांधकाम जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागातर्फे झाले असल्याने ही माहिती जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडे असणे शक्य आहे. अशा वेळी संबंधित ग्रामसेवक तथा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत संबंधित सार्वजनिक

प्राधिकरणाकडे, अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत, पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस अधिनियमातील कलम ६ (३)(एक) मधील तरतुदीप्रमाणे त्यांना देणे अभिप्रेत होते. तथापि संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची कृती न केल्यामुळे आता त्यांना ही माहिती संबंधित यंत्रणेकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस पुढील आदेशात विहित केलेल्या कालावधीमध्ये विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती व अपिलार्थीस प्रत्यक्षपणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती दिलेली नाही.या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देताना ग्रामपंचायत पारधवाडीची स्थापना कधी झाली, "याची माहिती ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध नाही", अशी निरर्थक माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. वास्तविक पाहता, कोणत्याही ग्रामपंचायतीची स्थापना शासनाच्या अधिसूचनेशिवाय होत नाही. अशी वस्तुस्थिती असताना व अशा वेळी शासनाकडून प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेची प्रत अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देणे त्यांना अनिवार्य असताना, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती कशाप्रकारे देता येईल, असे कोणतेही प्रयत्न न करता ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस सरळ कळविले आहे. ही जन माहिती अधिकारी यांची कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. अपिलार्थीच्या या मुद्यावर ग्रामपंचायत, पारधवाडीची स्थापना शासनाच्या ज्या अधिसूचनेद्वारे झाली, त्या अधिसूचनेची प्रत जन माहिती अधिकारी यांनी आता अपिलार्थीस पुरवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती संबंधित तलाठयाकडे उपलब्ध असल्यामुळे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ शी संबंधित माहिती संबंधित तलाठयाकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरवावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ बाबत जन माहिती व

अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, दर चार वर्षांनी प्रत्येक ग्राम पंचायत समितीमार्फत करण्यात येत असलेल्या कराच्या फेर आकारणीच्या प्रक्रियेमध्ये पंचनामा केला जात असतो, त्याप्रमाणे संदर्भित शाळेच्या बांधकामासंदर्भात त्यांच्याकडील नमुना नं.८ मध्ये नोंद घेतली आहे. असे करत असताना त्यांनी या ठिकाणच्या बांधकामाचा पंचनामा करुन नंतर त्या पंचनाम्याच्या आधारे त्यांनी त्यांच्याकडील नमुना नं.८ मध्ये नोंद घेतलेली आहे. जन माहिती अधिकारी यांना आता या पंचनाम्याची प्रत अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात माहिती देताना द्यावी लागेल. अशाच प्रकारची कृती अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ च्या संदर्भात अपिलार्थीस माहिती देताना जन माहिती अधिकारी यांच्याकडून झाली आहे. जरी या मुद्याशी संबंधित माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने अर्ज करतेवेळी उपलब्ध नव्हती, परंतु या मुद्यावर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडे न पाठविल्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना या मुद्यावरील माहिती संबंधित विभागाकडून प्रथमतः प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली व अद्यापपावेतो अपिलार्थीस द्यावयाची राहिलेले माहिती याचे वरील परिच्छेदामध्ये केलेले पृथक्करण पाहता व तसेच अपिलार्थीस द्यावयाच्या उर्वरित माहितीची व्याप्ती पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्देनिहाय माहिती, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी, असे त्यांना येथे आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी

यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत असल्याने व आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण मुद्देनिहाय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच,पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिनकर हरिश्चंद्रराव सावंत,'पुष्पक', दत्त नगर, जिंतुर रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत पारधवाडी, ता.सोनपेठ,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सोनपेठ,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११९०

निर्णय दिनांक : ११.०५.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. पाटील रामकृष्ण त्र्यंबकराव,<br>रा.वजीरखेडा, ता. भोकरदन, जि. जालना. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, जालना | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, जालना | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.०५.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील करताना माहितीसाठीचा अर्ज वापरला असल्याने अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील करण्याचे कारण आयोगास समजू शकत नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या वैयक्तिक मान्यतेच्या व नेमणूकीच्या संदर्भात त्यांच्या स्वतःशी व त्रयस्थ पक्ष, श्री. शिंदे गोविंद गुंडेराव यांच्याशी संबंधित कागदपत्रांची सन २००४-०५ या कालावधीशी संबंधित माहिती टपालाद्वारे मागितली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने, त्यांनी अधिनियमातील कलम

१९(१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे दि. ०६.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. त्यांनी सदरचे अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड टपालाद्वारे पाठविले होते. परंतु या अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, जालना यांच्याकडून कोणताही निर्णय पारीत न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०५.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी संपूर्ण माहिती यापूर्वीच पुरविली आहे.तथापि आयोगाने त्यांच्या विधानापृष्ठयर्थ जन माहिती अधिकारी यांच्याकडे पुरावा मागितला असता, सदर प्रकरणाची नस्ती गहाळ झाल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले व तसेच पुढे असेही स्पष्ट केले की, अपिलार्थीचा दि. ०६.०४.२००९ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या कार्यालयास प्राप्त न झाल्याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी झालेली नाही.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०६.०४.२००९ रोजीचा अपील अर्ज त्यांच्याकडे रजिस्टर्ड टपालाने पाठविला असून या पृष्ठयर्थ त्यांनी रजिस्टर्ड टपालाची पोस्टाच्या पावतीची प्रत आयोगास सादर केली असल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती पुरविली हे सिध्द करण्याकरिता कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील, त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती ही, सार्वजनिक स्वरुपाची

असल्यामुळे ती उघड करण्यास त्रयस्थ पक्षास कोणताही प्रत्यवाय असू नये. या सर्व बाबी पाहता, जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०६.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि.०६.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, जालना (तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री. रमेश तांडगे,सध्या उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),जि.प.जालना या पदावर कार्यरत) यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस अधिनियमातील कलम २०(२) मधील तरतुदीप्रमाणे शिक्षण संचालक,पुणे यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मुळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण मुद्देनिहाय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे पुरवावी.

३. शिक्षण संचालक,पुणे यांना संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.),जि.प.जालना (श्री. तांगडे, सध्या उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.जालना) यांच्यावर प्रचलित सेवा-

नियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११.०५.२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पाटील रामकृष्ण त्र्यंबकराव, मु.वजीरखेडा, पो. पिंपळगाव (को.) ता. भोकरदन, जि. जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय,मध्यवर्ती इमारत,१७,डॉ.आंबेडकर मार्ग,ससून हॉस्पीटलजवळ,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११८२

निर्णय दिनांक ११-०५-२०१०

१ श्री. चंद्रकांत रंगनाथ काळे, : अपिलार्थी

रा. २१, चैतन्य गुरुनगर, सिडको, एन ८, एफ ४, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका,

औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका,

औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप अभियंता (नगररचना), महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून "विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी रेडिरिकनरनुसार नुकसान भरपाई द्यावी या आदेशाची माहिती व कागदपत्रे" अशी त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दिनांक १२-०१-२००९ या लोकशाही दिनी महानगरपालिकेमध्ये झालेल्या सुनावणीच्या वेळी विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या जमिनीप्रकरणी दिलेल्या निर्णयाची प्रत, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज सहायक संचालक, नगररचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना उद्देशून केला होता. या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०४-२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीच्या प्रकरणासंदर्भात अपिलार्थीस दिनांक ३०-०५-२००९ रोजी पत्र दिले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये संदर्भीत केलेल्या मिळकतीचा ताबा आल्यानंतर भूसंपादनासंदर्भातचा मोबदला अदा करण्याविषयी कार्यवाही केली जाईल, असे, अपिलार्थीस आश्वासित केले. तथापि या पत्रातील मजकुराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे, असा युक्तिवाद आयोगासमोर केला. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, दिनांक १२-०१-२००९ या लोकशाही दिनी विभागीय आयुक्त श्री. बंड यांनी अपिलार्थीच्या तक्रार अर्जावर "प्लॉट धारकास रेडिरेकनरनुसार नुकसान भरपाई द्यावी" असा आदेश दिला आहे. दिनांक ०२-

०२-२००९ रोजीच्या  मा. आयुक्त यांच्या आदेशाच्या प्रतीची मागणी त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने हे भूखंड औरंगाबाद नगरपालिका क्षेत्रात नारळीबाग या परिसरामध्ये पूर्वी खरेदी केले होते.  तथापि या भूखंडावर काही लोकांनी अतिक्रमण करुन बांधकाम केले. दरम्यानच्या काळात महानगरपालिकेने सदरचे भूखंड ज्या सर्वे नंबर मध्ये आहेत तो सर्वे नबंर क्रिडांगण म्हणून आरक्षीत केला.  जरी महानगरपालिकेने हे भूखंड आरक्षित केले असले तरीही या जमिनीचा ताबा प्रत्यक्षात महानगरपालिकेने अद्यापपावेतो घेतलेला नसल्यामुळे अपिलार्थीस अपेक्षित असलेली त्यांच्या भूखंडाची रक्कम महानगरपालिका अदा करु शकत नाही.  ही वस्तुस्थिती अपिलार्थीस या पूर्वी वेळोवेळी कळविलेली आहे.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस महानगर-पालिकेच्या दिनांक १२-०१-२००९ रोजीच्या विभागीय लोकशाही दिनी विभागीय आयुक्तांनी दिलेल्या निर्णयाची प्रत हवी असल्याचे दिसून येत आहे.  तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडे विभागीय आयुक्तांच्या अशाप्रकारच्या अशा आदेशाची कोणतीही प्रत प्राप्त झालेली नाही.  त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी दिनांक १२-०१-२००९ रोजी झालेल्या लोकशाही दिनाच्या बैठकीच्या इतिवृत्ताची एक प्रत अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी व त्याबरोबर अपिलार्थीच्या प्रकरणाची सद्य:स्थिती अपिलार्थीस कळवावी.

या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या दिनांक २६-०२-२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत केलेली नाही.  अपिलार्थीच्या मूळ अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही न करुन संबंधितांनी आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे

त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी आणि त्यांचे सर्व सहायक, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

प्रसंगावशात, अपिलार्थीच्या या प्रकरणीच्या त्यांच्या मूळ गाऱ्हाण्याच्या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात त्यांनी विहित मुदतीत कार्यवाही करणे इतपत सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. आयोगाची कार्यकक्षादेखील, अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांना अधिनियमाच्या तरतुदीअंतर्गत उपलब्ध करुन देण्यासंदर्भात निर्णय घेणे, इतपतच सीमित आहे. अर्जदाराच्या माहितीशी संबंधित मूळ गाऱ्हाण्यावर न्यायनिवाडा करुन त्यासंदर्भात आदेश पारित करणे अशा प्रकारची कार्यवाही आयोगाकडून माहिती अधिकार अधिनियम तरतुदीअंतर्गत अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीने त्यांचे मूळ गाऱ्हाणे सोडविण्यासाठी न्यायालयाकडे दाद मागणे उचित राहिल, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी आणि या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. चंद्रकांत रंगनाथ काळे, २१, चैतन्य गुरुनगर, सिडको, एन ८, एफ ४, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (नगररचना), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११८३

निर्णय दिनांक ११-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. राजू नानाभाऊ रोकडे,<br>रा. वाळूज महानगर योजना क्र. १, देवगिरी नगर, एम. आय. जी. डी. १४/२, सिडको, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>कार्यालय - कामगार उपायुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>कार्यालय - कामगार उपायुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत्यक्षात | : | जन माहिती अधिकारी | : | सरकारी कामगार अधिकारी, कामगार उपायुक्त यांचे कार्यालय, औरंगाबाद |
| | | जन अपिलीय अधिकारी | : | सहायक कामगार आयुक्त, कामगार उपायुक्त यांचे कार्यालय, औरंगाबाद |
| | | त्रयस्थ पक्ष | : | मे. घनश्याम ॲटो पार्टस्, प्रा. लि. |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागितली असता त्यांना अपेक्षित माहिती न मिळाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले, तथापि यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना सुनावणीची नोटीस देऊनही सुनावणीमध्ये त्यांचा जबाब न नोंदविता त्यांच्या रजिस्टरवर सह्या घेतल्या आणि माहिती देतो असे खोटे आश्वासन दिले. परंतु त्यांना माहिती न दिल्यामुळे व त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही, म्हणून त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. घनश्याम ॲटो पार्टस् प्रा. लि., बी. ४३ एम. आय. डी. सी. वाळूज, औरंगाबाद यांच्या कंपनीतील कामगार आस्थापनेच्या संदर्भात काही माहिती एकूण ४ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी हा संबंधित संस्थेची नोंदणी झाल्यापासून ते दिनांक ०६-०२-२००९ असा होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कंपनीतील आस्थापनेवर कामाला असलेले कायमस्वरुपी कामगार, तात्पुरते कामगार व ठेकेदारामार्फत कामाला लागलेले कामगार यांची यादी, या कामगारांपैकी किती कामगारांचा संपूर्ण पगार देण्यात आलेला आहे, किती कामगारांचा संपूर्ण पगार देण्यात आलेला नाही त्यांची यादी, या कामगारापैकी किती कामगार कायमस्वरुपी कामगार आहेत व किती तात्पुरते आहेत व किती ठेकेदारामार्फत आहेत याची यादी, वरील कामगारापैकी किती कामगारांना भविष्य निर्वाह निधी, मासिक सुट्ट्या, कामगारांच्या धार्मिकतेप्रमाणे दिवाळी बोनस वगैरे मिळते त्यांची यादी आणि या सर्व कामगारांना कंपनीची नोंदणी झाल्यापासून दिनांक ०६-०२-२००९ पर्यंत किती मासिक पगार देण्यात आलेला आहे व आज रोजी देण्यात आलेला पगार यांची कामगारनिहाय यादी - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २७-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी स्वतः आदेश पारित न करता त्यांच्याकडील अभिलेख्यामध्ये दिनांक १३-०४-२००९ रोजी अपिलार्थीचा अर्ज घनश्याम ॲटो पार्टस् प्रा. लि.यांच्याकडे पाठवावा असा अभिप्राय नोंदवून हे प्रकरण नस्तीबंद केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्याकडे जी माहिती उपलब्ध होती ती माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०२-२००९ रोजी पुरविली असून, त्यांच्या कार्यालयाकडे त्रयस्थ पक्षाचे कामगारांचे मासिक वेतन अथवा बोनस इत्यादी संदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती जतन करुन ठेवली जात नाही किंवा ती कोणत्याही प्रकारे उपलब्ध असणे संभवत नाही. त्यांच्या कार्यकक्षा आयोगास सांगताना जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, कामगारांना मिळणारे वेतन हे किमान वेतन कायद्यातील तरतुदीच्याप्रमाणे पाहण्यापुरतेच त्यांचे त्रयस्थ पक्षावर नियंत्रण असते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात मागणी केलेली सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही. तथापि वेगवेगळ्या कामगार कायद्यानुसार, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील ज्या बाबीवर जन माहिती अधिकारी यांचे नियंत्रण आहे त्या बाबींशी संबंधित, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना त्रयस्थ पक्षाकडून ती प्राप्त करुन घेऊन तदनंतर ती अपिलार्थीस पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी वेगवेगळ्या कामगार कायद्यातील तरतुदीनुसार त्रयस्थ पक्षाच्या ज्या प्रकारच्या अभिलेख्यावर त्यांचे सरळ नियंत्रण आहे त्या अभिलेख्यातील अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत ती त्रयस्थ पक्षाकडून प्राप्त करुन घेऊन तदनंतर अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजू नानाभाऊ रोकडे, वाळूज महानगर योजना क्र. १, देवगिरी नगर, एम. आय. जी. डी. १४/२, सिडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, कामगार उपायुक्त यांचे कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक कामगार आयुक्त, कामगार उपायुक्त यांचे कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११८४

निर्णय दिनांक ११-०५-२०१०

१ श्री. नितीन माणिकराव देशमुख, : अपिलार्थी
द्वारा, ॲड. झरीकर, नारायण चाळ, परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती आणि अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. पुरुषोत्तम मल्हारराव देशपांडे यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ०८-०४-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून या प्रकरणी आवश्यक असलेली माहिती विनामूल्य व घरपोच प्राप्त झाली असल्यामुळे त्यांचे

आयोगाकडे केलेले विचाराधीन द्वितीय अपील निकाली काढण्याची व सुनावणी रद्द करण्याची विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे त्यांच्या द्वितीय अपील अर्जासंदर्भात केलेली ही विनंती आयोग मान्य करीत असून, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नितीन माणिकराव देशमुख, द्वारा, ॲड. झरीकर, नारायण चाळ, परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११८५

निर्णय दिनांक ११-०५-२०१०

१ श्री. गणेश साहेबराव लांडगे, : अपिलार्थी

रा. पंचशिल नगर (मंजरथ रोड), माजलगांव, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

तालुका फलोत्पादन अधिकारी, तालुका फलरोप वाटीका

कार्यालय, माजलगांव, जि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

उपविभागीय कृषी अधिकारी, माजलगांव, जि. बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत सुनावणी घेतली नाही. यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेण्याची वेळोवेळी विनंती करुनही त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय होऊ न शकल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील

आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जाद्वारे त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०५-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, महाराष्ट्र शासनाकडून माजलगांव तालुक्याकरिता देण्यात आलेल्या रोपनिवारा लोखंडी शेडच्यासंदर्भातील निधीसंदर्भात सन २००४ ते २००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये- लोखंडी शेडसाठी लागणारे साहित्य कोणाकडून खरेदी करण्यात आले, खरेदी साहित्याची पावती व त्याचा तपशील, शासनाकडून २००८-०९ या वर्षासाठी या कामाकरिता प्राप्त झालेला निधी, शेडसाठी लागणारी रक्कम व उभारणीवर झालेला खर्च व खर्चाची पावती व तपशील, लोखंडी शेडचे काम ज्या ठेकेदारामार्फत करण्यात आले त्या ठेकेदाराच्या रजिस्ट्रेशनची प्रत, त्याची श्रेणी, निविदा मंजुरीची प्रत, निविदेची जाहिरात ज्या दैनिकात प्रसिध्द करण्यात आली त्या जाहिरातीची प्रत, सन २००४ ते २००८ या वर्षामध्ये मंजूर झालेल्या लोखंडी शेडची संख्या, त्याकरिता मंजूर झालेला निधी, मंजूर निविदेची प्रत व लोखंडी शेडच्या सन २००७ ते २००९ पर्यंतच्या कामाच्या अंदाजपत्रकाची झेरॉक्स प्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाद्वारे मागितली होती व ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे या अर्जामध्ये त्यांनी नमूद केले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले व तदनंतर दिनांक ०२-०५-२००९, ११-०५-२००९ व २१-०५-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचा या सुनावणीच्या संदर्भात स्मरणपत्राद्वारे पाठपुरावा केला. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या

प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेतली नसल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. बी. एस. सिरसाट कृषी पर्यवेक्षक हे उपस्थित आणि जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती मागविली असता, त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलाच्या सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला, तरीही त्यांना ही माहिती मिळाली नाही, त्यामुळे त्यांनी आयोगाकडे सदरचे अपील केले आहे. त्यांनी या प्रकरणी दिनांक ०५-०३-२००९ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. आपल्या युक्तिवादाच्या अखेरीस त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर नियमाप्रमाणे कारवाई करण्यात यावी, अशी आयोगास विनंती केली.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी तथा तालुका फलोत्पादन अधिकारी, माजलगांव यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०५-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक ०६-०५-२००९ रोजी पुरविली आहे. तथापि या माहितीने अपिलार्थीचे समाधान झालेले नाही. यावर अपिलार्थीने असे स्पष्ट केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी या प्रकरणी ज्या लोखंडी शेडची खरेदी केली आहे त्या लोखंडाच्या खरेदीची पावती, संबंधित ठेकेदाराच्या निविदेची प्रत त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती

अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा पूर्णपणे समावेश नाही. उपलब्ध कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भीत केलेले काम त्यांनी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडून करुन घेतलेले आहे. या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, शासनाच्या उद्योग विभागाने अशाप्रकारची कामे निविदा न बोलाविता लघु उद्योग विकास महामंडळाकडे सोपविण्याचे निर्णय पारित केले आहेत. या शासन निर्णयाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी या संदर्भात अपिलार्थीस पुरविणे संयुक्तिक होते अथवा ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसेल तर वरिष्ठांच्या कोणत्या पत्रान्वये त्यांनी सदरचे काम महाराष्ट्र लघु उद्योग महामंडळाला दिले, या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस या प्रकरणी देणे गरजेचे होते. परंतु त्यांनी अशाप्रकारची माहिती अपिलार्थीस दिली नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. याचबरोबर महाराष्ट्र लघु उद्योग विकास या महामंडळाची शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नोंदणीकृत ठेकेदार म्हणून नोंद झाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या नोंदीची प्रत आता जन माहिती अधिकारी यांना संबंधित महामंडळाकडून प्राप्त करुन घेऊन त्यांना ती ठेकेदाराच्या नोंदणीची प्रत म्हणून अपिलार्थीस पुरवावी लागेल. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ द्वारे मागणी केलेल्या जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या बांधकामाच्या अंदाजपत्रकाच्या प्रती संदर्भात अपिलार्थीस त्यांनी असे कळविले आहे की, शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार त्यांनी हे काम लघु उद्योग विकास महामंडळाकडून करुन घेतले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली ही माहिती त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी विसंगत आहे. लघु उद्योग विकास महामंडळास काम करण्याचे आदेश देताना त्या कामाच्या अंदाजपत्रकाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे गरजेचे आहे. कोणत्याही अंदाजपत्रकाशिवाय लघु उद्योग विकास महामंडळास काम करण्याचे आदेश जन माहिती अधिकारी यांनी देणे ही बाब

तर्क सुसंगत व पटण्यासारखी नाही. या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी कोणत्याही बाबीचे अंदाजपत्रक केलेले नाही, अशी माहिती दिली आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी परत एकदा तपासून पहावी व अपिलार्थीस, त्यांनी महामंडळास दिलेले काम ज्या कागदपत्राच्या / अंदाजपत्रकाच्या आधारे दिले आहे त्या कागदपत्राची प्रत अपिलार्थीस पुरवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व प्रत्यक्षात त्यांना देण्यात आलेल्या माहितीचे वरील परिच्छेदात केलेले पृथक्करण पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेली अपिलार्थीस देय असलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०३-२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक ०४-०४-२००९ रोजी अगर तत्पूर्वी प्रथम प्रतिसाद देणे अपेक्षित होते. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जास प्रथमतः ३१ दिवसाच्या विलंबाने प्रथम प्रतिसाद देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल, आयुक्त (कृषी) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. पी. सी. देशमुख, तालुका फलोत्पादन अधिकारी, माजलगाव यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त (कृषी) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. पी. सी. देशमुख, तालुका फलोत्पादन अधिकारी, माजलगाव यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ११-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गणेश साहेबराव लांडगे, रा. पंचशिल नगर (मंजरथ रोड), माजलगांव, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका फलोत्पादन अधिकारी, तालुका फलरोप वाटीका कार्यालय, माजलगांव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, माजलगांव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११९१

निर्णय दिनांक ११-०५-२०१०

१ श्री. तुकाराम श्रीपती शिंदे, : अपिलार्थी
मु. पो. खेड, तालुका जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ,
सार्वजनिक बांधकाम खाते, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती नष्ट करुन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली. माहिती देण्यासाठी अनावश्यक पत्रव्यवहार करुन व अधिकाराचा गैरवापर करुन विलंब लावल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, नोंदणीकृत टपालाव्दारे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण सात मुद्दयाव्दारे मागितली होती. तथापि ही माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने, त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २८-०४-२००९ रोजीच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या पत्राव्दारे, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, उस्मानाबाद यांच्याकडून घेण्याचे सूचित केले. तथापि या आदेशा-नंतरही अपिलार्थीस संपूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो संपूर्ण माहिती प्राप्त झालेली नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील पत्र क्रमांक ४२८, दिनांक २४-०८-२००७, पत्र क्रमांक ४२९, दिनांक ०४-०८-२००७, पत्र क्रमांक ४७५, दिनांक २९-०८-२००७ च्या प्रती मिळालेल्या नाहीत, तसेच त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती देखील त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अप्राप्त आहे. याचबरोबर त्यांच्या मूळ अर्जासोबतच्या पुरवणी अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३ व ४ शी संबंधित माहितीही त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो अप्राप्त आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०६-२००९ रोजी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पुरविली असून, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्याकडे पत्र क्रमांक ४२८, दिनांक २४-०८-२००७, पत्र क्रमांक ४२९, दिनांक ०४-०८-२००७ च्या प्रती आता उपलब्ध आहेत. ही माहिती त्यांनी एकदा अपिलार्थीस पुरविली आहे, तथापि ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्याकरिता ते तयार आहेत. उर्वरित माहितीच्या प्रतीसंदर्भात त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या या कागदपत्राच्या प्रती त्यांच्या अभिलेख्यातून गहाळ झालेल्या आहेत, त्यामुळे ती माहिती त्यांना आता अपिलार्थीस देता येणे शक्य नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मधील अपिलार्थीने मागणी केलेल्या अपूर्वा इलेक्ट्रीकल्स, उस्मानाबाद यांच्याशी त्यांच्या कार्यालयाने केलेच्या पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांना अपिलार्थीस, या मुद्दयावरील कालावधीचा उल्लेख नसल्यामुळे, त्या पुरविता आल्या नाहीत. अपिलार्थीस त्यांनी दिनांक २०-०६-२००९ रोजी त्यांच्याकडील सर्व उपलब्ध माहिती दिलेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील पत्र क्रमांक ४२८, दिनांक २४-०८-२००७ आणि पत्र क्रमांक ४२९, दिनांक ०४-०८-२००७ च्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाव्दारे पुरवाव्यात. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहितीच्यासंदर्भात आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी नेमकी हीच माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील अभिलेख्यावरुन गहाळ झाली असून ती कशी गहाळ झाली, याचा त्यांनी या प्रकरणी कसोशीने शोध घ्यावा व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी आणि तसेच सदरचे अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचा-याची होती, त्या कर्मचा-यावर त्यांनी फौजदारी वा प्रशासकीय स्वरुपाची

कारवाई करुन, सदरची कारवाई पूर्ण झाल्यानंतर त्याची प्रत अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी. या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या दिनांक १९-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देण्याचे कारण जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी सदरचे प्रकरण न्यायालयात दाखल झाले असल्याकारणाने त्यांना ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत उपलब्ध करुन देता आली नाही, असे सांगितले. तथापि त्यांचा हा युक्तिवाद आयोग अमान्य करीत आहे. जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर, त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे संबंधित न्यायालयाकडे पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती न करुन, स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, मुंबई यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मधील पत्र क्रमांक ४२८, दिनांक २४-०८-२००७ व पत्र क्रमांक ४२९, दिनांक ०४-०८-२००७ च्या प्रती हे आदेश निर्गमीत होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाव्दारे पुरवाव्यात.

३.	मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, मुंबई यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक 	११-०५-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१	श्री. तुकाराम श्रीपती शिंदे, मु. पो. खेड, तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२	जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, सार्वजनिक बांधकाम खाते, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, रेशनिंग कंपाऊंड, तिसरा माळा, चेंबूर, रामकृष्ण चेबूंरकर मार्ग, प्रशासकीय इमारत, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११९२

निर्णय दिनांक ११-०५-२०१०

१ श्रीमती सारजाबाई भ्र. कोंडिबा वाघमारे, : अपिलार्थी
व्दारा, श्री. प्रदीप घाटे,
घ. क्र. एन. डी. ४२/पी १/२७/५, हडको, नवीन नांदेड,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-१०-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जाची कोणतीही दखल न घेता निर्णय न दिल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाव्दारे त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष कोंडिबा मरीबा वाघमारे सहशिक्षक, कन्या प्राथमिक शाळा, नायगांव यांच्या कुटूंब निवृत्ती वेतनासंदर्भात, काही माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्रयस्थ पक्षाचे कुटूंब निवृत्ती वेतन मान्य न करण्याची कारणे काय ? तांत्रिक अडचण असल्यास तात्पूरते कुटूंब निवृत्ती वेतन मान्य करण्याची तरतूद आहे काय ? त्रयस्थ पक्षाच्या विरुध्द खाते चौकशी सुरु केल्याच्या आदेशाची प्रत व मृत्यूनंतर सेवेतून निलंबीत करता येते काय ? याबाबतच्या शासनाच्या आदेशाच्या प्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे यासंदर्भात दिनांक ०६-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगा-समोर उपस्थित नाही. आयोगाकडील सुनावणीसाठीची नोटीस जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाली असल्याची धारणा त्यांनी आयोगाकडे दिनांक ०७-०५-२०१० रोजी दूरध्वनीवरुन पक्की केली आहे, तथापि एवढे असूनही संबंधित जन माहिती अधिकारी हे आज आयोगासमोर उपस्थित नाहीत, याची सखेद नोंद आयोगाने घेतली आहे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या चार मुद्दयावरील माहितीपैकी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात देय होत नाही. कारण अपिलार्थीने या मुद्दयांव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलची कारणे व त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये, अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्याच्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे इतपत सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबद्दलची स्पष्टीकरणे अथवा एखाद्या निर्णयाबद्दलची कारणे अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दलचे स्पष्टीकरण अर्जदारास करणे, अशा प्रकारच्या प्रश्नोत्तराच्या प्रक्रियेचा समावेश माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये नाही, त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्रमांक १ व २ आणि मुद्दा क्रमांक ४ मधील, ' मृत्यूनंतर सेवेतून निलंबीत करता येते काय ? ' या मुद्दयावरील माहिती देय होत नाही. याच अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मधील त्रयस्थ पक्षाच्याविरुध्द चौकशी सुरु केलेल्या आदेशाची प्रत आणि मृत्यूनंतर सेवेतून निलंबीत करण्यासंदर्भातील शासनाच्या आदेशाची व नियमाची प्रत, ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अद्यापपावेतो या मुद्दयावरील ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली असल्याचे आयोगास आढळून येत नाही. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ मधील, वर स्पष्ट केल्याप्रमाणे शासनाच्या

आदेशाची व नियमांची प्रत अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत शीघ्र टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना प्राप्त झाला आहे, तथापि एवढे असूनही, त्यांनी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागितली असताना देखील या अर्जास अधिनियमातील कलम ७ (१) मधील तरतुदीप्रमाणे प्रतिसाद देण्याचे कोणतेही सौजन्य दाखविले नाही आणि अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवले आहे. त्यांनी आपल्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वत:ला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब, सचिव (शालेय शिक्षण) यांना या प्रकरणाशी संबंधित उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड (या पदावर दिनांक ११-०२-२००९ रोजी व तदनंतर तीस दिवसापर्यंत कार्यरत असलेले अधिकारी) व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, अशा सर्वांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व मुद्दा क्रमांक ४ मधील, वरील निर्णयामधील स्पष्ट केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत शीघ्र टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (शालेय शिक्षण) यांना संबंधित उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड (दिनांक ११-०२-२००९ रोजी व तदनंतर तीस दिवसापर्यंत कार्यरत असलेले अधिकारी) व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती सारजाबाई भ्र. कोंडिबा वाघमारे, व्दारा, श्री. प्रदीप घाटे, घ. क्र. एन. डी. ४२/पी १/२७/५, हडको, नवीन नांदेड, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (शालेय शिक्षण), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११९३

निर्णय दिनांक ११-०५-२०१०

१ श्री. मोरे लिंबाजी शेषेराव, : अपिलार्थी
व्दारा, लेंडगे संतोष रावसाहेब,
सोनवणे कॉम्प्लेक्स, सन्मित्र कॉलनी, वर्कशॉप, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
शिवाजी हायस्कूल, दाताळा, तालुका कंधार, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्याध्यापक, शिवाजी हायस्कूल, दाताळा, तालुका कंधार, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व असमाधानकारक माहिती दिली असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या शाळेशी संबंधित काही माहिती, शाळा स्थापनेपासून ते दिनांक १८-१२-२००८ या कालावधीशी संबंधित, एकूण दोन मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कर्मचारी उपस्थितीपटांच्या झेरॉक्स प्रती, सर्व कर्मचा-यांच्या मूळ सेवा पुस्तकांच्या झेरॉक्स प्रती, कर्मचा-यांच्या रजा नोंदीच्या प्रती, कर्मचा-यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेच्या प्रती, कर्मचा-यांच्या नियुक्ती आदेश व कायम नियुक्ती आदेशाच्या प्रती आणि शासनाकडून मिळणा-या शिष्यवृत्तीच्या धनादेशाच्या व वाटपाच्या झेरॉक्स प्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे, त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०४-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले, तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी गैरहजर व अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी पूर्ण माहिती पुरविली आहे, तथापि अपिलार्थीस त्यांनी पुरविलेली माहिती आज त्यांच्याकडे उपलब्ध नाही आणि

आता ते अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दोन महिन्याच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील करताना, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व असमाधानकारक माहिती मिळाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज केला असल्याचे नमूद केले आहे, तथापि आज रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही, असा छातीठोकपणे आयोगासमोर युक्तिवाद केला. अपिलार्थीने, त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०१-०५-२००९ रोजी काही माहिती दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. परंतु अपिलार्थीस मुद्देनिहाय माहिती देण्याऐवजी जन माहिती अधिकारी यांनी प्रत्येक मुद्दयावर त्यांच्या शाळेचे प्रमाणपत्र दिले आहे. उदा. त्यांच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या रजेच्या संदर्भात माहिती देताना त्यांनी त्यांच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-याची सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षात बाराच्यावर एकही जास्तीची रजा घेतली नसल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे, सेवापुस्तकासंदर्भात सर्व कर्मचा-यांच्या सेवापुस्तिका शाळेने अद्ययावत ठेवल्या असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रमाणपत्र दिले आहे, शिष्यवृत्तीच्यासंदर्भातही अपिलार्थीस माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या शाळेमार्फत नियमानुसार शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात येत असल्याचे प्रमाणपत्र पुरविले आहे. अशा प्रकारे, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये सर्व कागदपत्राच्या छायांकीत प्रतीची मागणी केली असता, ती माहिती देण्याच्याऐवजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील सर्व मुद्दयाशी संबंधित प्रमाणपत्रे देण्याचा खटाटोप या प्रकरणी केल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांची ही अपिलार्थीस

माहिती देण्याची पध्दत सर्वथा गैर व चुकीची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी-नुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देताना अशा प्रकारची कृती केल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी, शासनाकडून मिळणा-या शिष्यवृत्तीच्या धनादेशाच्यासंदर्भात व वाटपासंदर्भात माहिती मागताना अपिलार्थीने या माहितीशी संबंधित कालावधीचा उल्लेख त्यांच्या मूळ अर्जामध्ये केलेला नाही, त्यामुळे या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. मात्र, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेतील कर्मचा-यांच्या संदर्भात मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरी, तिचे सार्वजनिक स्वरुप पाहता, ती माहिती अपिलार्थीस उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षास कोणताही प्रत्यवाय असू नये.

वरील वस्तुस्थिती पाहता, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवाजी हायस्कूल, दाताळा, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील, त्यांच्या शाळेतील कर्मचा-यासंदर्भात मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. या कालावधीमध्ये अपिलार्थी यांनी मुख्याध्यापक, शिवाजी हायस्कूल, दाताळा, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांच्या कार्यालयातून, हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसाच्या आत

कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्याध्यापक, शिवाजी हायस्कूल, दाताळा, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोरे लिंबाजी शेषेराव, व्दारा, लेंडगे संतोष रावसाहेब, सोनवणे कॉम्प्लेक्स, सन्मित्र कॉलनी, वर्कशॉप, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवाजी हायस्कूल, दाताळा, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२९६

निर्णय दिनांक ११-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बद्रिनारायण रामेश्वर उपरे,<br>जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे, म्हाडा कॉलनी ऑ. नं. २७, जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जाव्दारे

अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे या अर्जामध्ये नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जालना तालुक्यातील ०१ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८ या कालावधीमध्ये कोणकोणत्या गावात पाझर तलावाची कामे करण्यात आली, त्या गावांची नावे व या पाझर तलावावरील मजुरांच्या मस्टरच्या छायांकीत प्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४२,७३५ इतके त्यांना चलनाव्दारे बँकेत भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांनी उपविभागीय अधिका-यास त्यांच्या दिनांक १७-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे, अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती व त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीच्या शुल्काची कल्पनाही दिली. यानंतर त्यांनी परत अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०४-०५-२०१० रोजीच्या पत्राव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती देण्याची तयारी दर्शविली होती. परंतु अपिलार्थीने अद्यापपावेतो त्यांच्याकडे, अपिलार्थीस देण्यासाठी तयार असलेली माहिती घेऊन जाण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे व ही माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर या अर्जाच्या संदर्भात पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्व हे संबंधित अर्जदाराचे असते. अशा प्रकारचे उत्तरदायित्व या प्रकरणी अपिलार्थीने योग्य प्रकारे पार पाडल्याचा कोणताही सबळ पुरावा आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही टप्प्यावर नाकारलेले नाही, त्यामुळे अपिलार्थीस अजूनही जर या माहितीची आवश्यकता असेल तर ते ही माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क उपलब्ध

करुन घेऊ शकतात. अशा प्रकारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे न भरल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम ७ (५) च्या तरतुदीप्रमाणे अभिप्रेत असलेले त्यांचे कर्तव्य पार न पाडल्यामुळे, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाली नसल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य माहिती देण्याचे कोणतेही कारण या संपूर्ण घटनाक्रमामध्ये उद्‌भवत असल्याचे आयोगास आढळून येत नाही. ही वस्तुस्थिती पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बद्रिनारायण रामेश्वर उपरे, जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे, म्हाडा कॉलनी ऑ. नं. २७, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२९७

निर्णय दिनांक ११-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने,<br>अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद | : | प्रतिवादी |

त्रयस्थ पक्ष : श्री. के. एन. अंबेकर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, श्री. के. एन. अंबेकर, तलाठी यांच्यासंदर्भात एकूण दोन मुद्दयाव्दारे काही माहिती वेगवेगळ्या कालावधीशी संबंधित मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्रयस्थ पक्ष श्री. के. एन. अंबेकर, तलाठी सजा चौका येथील दिनांक ११-०३-१९७५ ते ३१-०७-१९८१ चौका येथे कार्यरत असताना त्यांनी केलेल्या सरकारी वसूलीची रक्कम व तिचा

बँकेत भरणा केल्याबद्दल आणि तलाठी, सजा फुलंब्री यांनी दिनांक ०१-०८-१९८१ ते ३०-०६-१९८६ व तलाठी, सजा माळीवाडा यांनी दिनांक ०१-०७-१९८६ ते ०८-०६-१९९४ पर्यंतच्या कालावधीमध्ये लेखापरीक्षण केल्याबद्दल माहिती व दिनांक ०४-१०-१९९९ रोजी दिलेल्या अर्जाबद्दल वरिष्ठांनी घेतलेल्या निर्णयाची माहिती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०३-२००८ रोजी निर्णय देऊन, तहसीलदार, औरंगाबाद व फुलंब्री यांना त्यांच्या कार्यालयातील नमुना नंबर ८ ड च्या, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या कालावधीशी संबंधित प्रती, आठ दिवसाच्या आत देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०५-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे नमूद केले.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयामध्ये, त्यांनी बराच शोध घेऊनही उपलब्ध झाली नसल्याचे आयोगास अवगत केले. तसेच या प्रकरणाशी

संबंधित तलाठी श्री. के. एन. अंबेकर हे नियत वयोमानानुसार आता शासकीय सेवेतून सन २००९ मध्ये सेवानिवृत्त झाले असल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात, त्यांनी बराच शोध घेऊनही उपलब्ध न होऊ शकल्याबाबत आयोगास अवगत केले आहे. तथापि ही माहिती ज्या त्रयस्थ पक्षासंदर्भात आहे व ज्यांच्याकडे उपलब्ध असावयास हवी होती त्या तलाठ्याने त्यांचा नियमित पदभार कोणासही हस्तांतरीत न करता, ते तलाठी शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत, त्यामुळे अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून एखाद्या विशिष्ट कालावधीची माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश देता येत नाहीत, तथापि अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे उपस्थित केलेल्या या प्रकरणाची जन माहिती अधिकारी यांनी गांभीर्याने दखल घेऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या कार्यालयातील ज्या अधिका-यावर / कर्मचा-यावर होती, त्या कर्मचा-यावर आवश्यकतेप्रमाणे प्रशासकीय अथवा फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करावी व या बाबतीत अपिलार्थीस अवगत करावे असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. ही कार्यवाही त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत करायाची आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-०५-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.